# शब्द रुची

सप्टेंबर २०१५
मूल्य १० रु.
पृष्ठसंख्या ४०





॥ग्रंथाली॥

## पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे



सुषमा बर्वे लिखित 'उघडे लिफाफे' पुस्तक प्रकाशनसमयी सायली ढमढेरे, सुहिता थत्ते, डॉ. वसुधा कामत, सुहास बर्वे, लेखिका सुषमा बर्वे, डॉ. मीनल मोहाडीकर आणि दिनकर गांगल




प्रा. आशा राणे लिखित 'रस्त्यावरील मुले : संघर्ष हमारा फाउंडेशनचा' पुस्तक प्रकाशनसमयी अजित आचार्य, दत्ता कामथे, अरुण खोरे, डॉ. रमेश पोतदार, लेखिका प्रा. आशा राणे




एकता पटेल लिखित 'गौरीकुंड १.५ कि.मी.' पुस्तक प्रकाशनसमयी पी.जी. शाह, रजनीकांत पटेल, एन.पी. पटेल, सचिन खेडेकर, लेखिका एकता पटेल, डॉ. मिलिंद चितळे, के.सी. लॉर्ड, समीर पांड्ये, सुभाष ठाकर आणि कुमार नवाथे



१७ वे बीएमएम अधिवेशन लॉस एंजेलिस येथे पुस्तक प्रकाशन सोहळा अच्युत गोडबोले यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यासमयी डॉ. गजानन सबनीस, डॉ. लतिका भानुशाली, डॉ. अनंत लाभसेटवार, विद्या हर्डीकर सप्रे, अशोक सप्रे आणि आदी मान्यवर मंडळी

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**सप्टेंबर २०१५, वर्ष तिसरे**
**अंक पाचवा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
अतिथी संपादक : **आल्हाद गोडबोले**
मुखपृष्ठ : **पुंडलिक वझे**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

## अनुक्रम

'साहित्याकडून सांस्कृतिक क्रांतीकडे'/४
**आल्हाद गोडबोले**

भांड बाबा, भांड!/१०
**संजय पवार**

उदाहरणार्थ (भालचंद्रराव!) नेमाडे/१२
**राजेंद्र साठे**

पदापेक्षा कर्तृत्व
वादातीत असावे/१४
**मकरंद साठे**

सोशल मिडिया नावाच्या
'चावडी'वरील चर्चा/१६

बेजबाबदार सहीबहाद्दर/२०
**राजेश कुलकर्णी**

**१७ वे बीएमएम अधिवेशन**
**एक अनुभव**/२२

भारताचा खरा शत्रू कोण?/२५
**डॉ. अनंत लाभसेटवार**

जयवंत चुनेकर म्हणजे मराठीची
आस्था असलेला अभ्यासक/२८

**ग्रंथपाने – २९ ते ३३**
मैत्रेय प्रकाशन
मौज प्रकाशन
लोकवाङ्मय प्रकाशन
रोहन प्रकाशन
पद्मगंधा प्रकाशन


## संपादकीय...

ज्ञानपीठ आणि महाराष्ट्रभूषण पुरस्कार, तसेच साहित्य संस्कृती आणि विश्वकोश मंडळावरील नेमणुका यानिमित्ताने मराठी साहित्यिक वर्तुळ गेले काही दिवस उलटसुलट चर्चेने भिरभिरत राहिले. या वावटळींचा धुरळा खाली बसत असला, तरी त्याचा आढावा घेताना काही निरीक्षणे आणि मते नोंदविणे आवश्यक वाटले. 'शब्द रुची'च्या या अंकात ती काही लेखकांनी नोंदविली, तसेच 'सोशल मिडिया'वरील विधानांचीही दखल सोबत घेतली आहे. मराठी साहित्यजगतात आता वादविवादापेक्षा जातीय आणि व्यक्तिगत उखाळ्यापाखाळ्या, अभिरुची सोडून खालच्या पातळीवर केली जाणारी शेरेबाजी यांचे प्रमाण वाढत असल्याचे यानिमित्ताने जाणवले. त्याचबरोबर तथाकथित उच्चवर्णियांच्या वादात दलितवर्गाचा आवाज उमटत नसल्याचे आणि त्यांच्या बाजूने फारसे कुणी बोलतही नसल्याचे जाणवले. साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रात हा वर्ग पुन्हा गावकुसाबाहेर ढकलला जावा, हे चांगले चिन्ह नाही.

# 'साहित्याकडून सांस्कृतिक क्रांतीकडे'

## आल्हाद गोडबोले

**क्रांती बंदुकीच्या नळीतूनच होते, असे मानणाऱ्या माओ झेडॉन्गला चीनमध्ये हिंसक मार्गानेच साम्यवादी राजवटीप्रमाणे सांस्कृतिक क्रांती घडवून आणायची होती. याउलट अहिंसेवर तेवढाच ठाम विश्वास असलेल्या महात्मा गांधींनी भारतातून इंग्रजांना हाकलून स्वातंत्र्य आणले. पुढे महाराष्ट्रातील नथुराम गोडसे या बंडखोर तरुणाने गांधीजींवर गोळ्या झाडून त्यांची हत्त्या केली आणि त्याच महाराष्ट्रात ग्रंथालये उद्ध्वस्त करणे, पत्रकारावर हल्ले करणे, घर जाळायला मोर्चा काढणे, नाटके बंद पाडणे, दाभोलकर-पानसरे (आणि जे धारवाड 'संयुक्त महाराष्ट्रा'त सामील करण्याची आपली मागणी होती, तेथील डॉ. एम. एम. कलबुर्गी) यांचा आवाज बंद करणे, खुनाचे उदात्तीकरण करणे अशा मार्गांनी 'सांस्कृतिक क्रांती' गेल्या काही वर्षांत फोफावू लागली. 'दाभोलकर-पानसरे-कलबुर्गी यांच्या मारेकऱ्यांशी नथूरामची तुलना करू नका, नथूरामने समोरून गोळ्या घातल्या होत्या' असे समर्थन एका 'विचारवंतां'नी नुकतेच केले आहे. म्हणजे 'सांस्कृतिक क्रांती' यशस्वी झाली, तर उदाहरणार्थ, आधीच्या संस्कृतीतील पहिल्या क्रमांकाचे साहित्यिक भालचंद्र नेमाडे यांना हटवून तेथे नथूरामचा पुतळा उभा करणार का? आणि दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस कधीच न सापडलेल्या / न सापडणाऱ्या मारेकऱ्यांना?**



**प्रस्थापिताविरुद्ध बंडाचे निशाण उभारून नेमाडे लेखक झाले होते. पुरस्कार 'लाटून' लेखकाचे 'लेखकराव' कसे होतात, हेही नेमाडे यांनी पूर्वीच लिहिले होते. पण त्यांच्याच नकळत ते स्वतः 'लेखकराव' होण्याच्या वाटेकडे वळले आणि त्यांचा प्रवास ज्ञानपीठ मिळवण्यापर्यंत आला.**

पुरस्कार-पारितोषके, निवड-नेमणुका यांना वादाचा शापच असतो. कारण अमुक पुरस्कार किंवा तमुक नेमणूक म्हणजे स्पर्धेतील पहिला क्रमांक अशी बहुतेकजणांची समजूत असते आणि ती साहजिक असते. कारण आपल्यावर संस्कारच तसे झालेले असतात. मग दुसऱ्याला 'डावलले गेल्या'ची, तर तिसऱ्याला 'अन्याया'ची भावना छळते. त्यावर जो-तो आपापल्या पद्धतीने उपाय शोधतो.

***

एका स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ होता. शाळा अगदी छोट्या मुलांची. मुलेही छोटीच, पण पालक, शिक्षक त्यांना मोठे बनवण्यासाठी धडपडत होते. म्हणून ही स्पर्धा. पहिल्या तिघांना बक्षीस देण्यासाठी तीन कमी-अधिक उंचीच्या पातळीच्या स्टँडपाशी - पोडियमजवळ बोलावण्यात आले. पहिला पटकन पहिल्या क्रमांकाच्या कट्ट्यावर जाऊन उभा राहिला. दुसरा हिरमुसला होता. तिसरा तर रडायलाच लागला. 'मी पण पहिला, मी नाही खाली उभा राहणार' - आली का पंचाईत. त्यांच्या नकारांमुळे कार्यक्रम खोळंबला. काय करावे? एक शिक्षिका पुढे झाली. तिने सांगितले, 'आपण तिघांना वेगवेगळे बक्षीस देऊ. पहिल्याला देऊन झाले की, पोडियमवरचे क्रम बदलून एक नंबरवर 'दोन' चिकटवून लावू आणि त्याला बक्षीस देऊ. तसेच तिसऱ्याला.' झाले, निघाला तोडगा. दुसऱ्या क्रमांकाच्या विजेत्याचे आई-वडीलही खूष झाले.

आता तिसऱ्याला बक्षीस देण्यासाठी पोडियमची रचना बदलणार, एवढ्यात त्याची आई त्याला घेऊन पुढे आली. काही बदल करू नका, म्हणाली. जमिनीवर गुडघे टेकून मुलाशी बोलू लागली. 'बाळ, तुला पहिला क्रमांक हवाय ना? मग पोडियम लहान नको करूस. तू मोठा हो. उंच उडीच्या शर्यतीत तुझी उडी

सगळ्यात उंच जाईपर्यंत सराव कर. पहिला येशील, तेव्हाच बक्षीस घे.'

आईची शिकवण त्याला पटली. तिसरे बक्षीस कमी उंचीवर उभे राहूनच त्याने स्वीकारले आणि हसत गेला.

पुरस्कार, नेमणुकांकडे पाहण्याचे दृष्टिकोनही असे निरनिराळे असतात.

***

ही 'बोधकथा' आठवण्याचे कारण, मराठी साहित्य जगतात गेल्या काही दिवसात उठलेली (चहाच्या पेल्यातील) वादळे !

एक, भालचंद्र नेमाडे यांना ज्ञानपीठ पुरस्कार.

दोन, ब. मो. तथा बाबासाहेब पुरंदरे यांना 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार.


तीन, साहित्य संस्कृती मंडळावर बाबा भांड तर विश्वकोश मंडळावर दिलीप करंबेळकर यांची नेमणूक.

फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टीट्युट पुण्यात असल्याने आणि पुणे हे 'संयुक्त महाराष्ट्रा'तील असल्याने त्यावरील गजेंद्र चौहान यांची वादग्रस्त नेमणूकसुद्धा विचारात घ्यायला हवी. पण तो विषय राजकारण्यांनी 'साहित्य, संस्कृती, सभ्यता' वगैरेच्या पलीकडे नेऊन ठेवला असल्याने, किंबहुना साहित्य-संस्कृतीशी त्याचा आता काही संबंध उरला नसल्याने, तूर्त बाजूला ठेवू. पण, उर्वरित तीन वादांत 'यशस्वी' स्पर्धक कोण, दुसरा-तिसरा कोण, शहाणे-समजूतदार स्पर्धक कोण, शिक्षक कोण आणि कोणत्या टोप्या कुणाला बसतात, हे वाचकांनीच ठरवावे.

***

ज्ञानपीठ पुरस्काराचा पहिला मान मिळालेले मराठी साहित्यिक म्हणजे वि. स. खांडेकर. त्यावेळी लेखकाबरोबरच त्याचे लक्षणीय पुस्तक विचारात घेतले जाई. खांडेकरांच्या 'ययाती' कादंबरीला हा मान मिळाला.

खांडेकरांच्या 'जीवनासाठी कला' आणि ना. सी. फडक्यांच्या 'कलेसाठी कला' या वादाच्या पार्श्वभूमीवर हा पुरस्कार मिळाला होता आणि एका अर्थाने 'जीवनासाठी कला' या स्पर्धेत पहिला पुरस्कार जिंकून गेली होती.



**ब.मो. तथा बाबासाहेब पुरंदरे यांना देण्यात आलेला महाराष्ट्रभूषण हा पुरस्कार सरकारी असल्यामुळे तो सत्ताधाऱ्यांच्या पसंतीचाच असणार होता. १५-१५ वर्षे सत्तेत असलेल्यांनी असे पुरस्कार देताना नीर-क्षीरविवेक बाळगला होता आणि त्यात कसलाही अभिनिवेश किंवा पक्षीय हिताचा वास नव्हता, असा कुणाचा दावा असेल, तर त्यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही.**

प्रथेप्रमाणे काही साहित्यिक, विचारवंत आदींना ही निवड पसंत पडली नव्हती. प्रसिद्ध नाटककार प्रा. गो. पु. देशपांडे यांनी त्यावर जाहीर टीका केली, पण फार उशिरा आणि तीही दिल्लीत. अर्थात माध्यमांनी हा वाद उचलून मुंबईत आणला आणि काही काळ धुमसत ठेवला. तरी पण एक वस्तुस्थिती मान्य करावी लागते की, दलित साहित्याची चळवळ तर अजून उभीही राहिली नव्हती आणि अगदी 'साठोत्तरी कालखंड' वगैरे विचारात घेतले तरी मराठी साहित्यात, १९७३-७४ या काळात, वि. स. खांडेकर यांच्याहून अधिक उंचीचा लेखक नरसिंह रावांसारख्या विद्वान राजकारण्याला दिसतही नव्हता.

दुसरे मानकरी ठरले वि. वा. शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज. वर्ष १९८७. अर्थात दुर्गा भागवतांपासून नामदेव ढसाळपर्यंत अनेक मराठी साहित्यिकांची दखल घेतली जात नसल्याचा सूर तेव्हाही उमटत होताच, पण 'तात्यां'चा 'नटसम्राट' आणि दिवसेंदिवस 'पिकत गेलेली' त्यांची कविता यांचे मराठी मनावरील गारुड या पुरस्काराला वादाच्या भोवऱ्यापासून लांब ठेवू शकले.

२००३ चे ज्ञानपीठ गोविंद विनायक तथा विंदा करंदीकर यांना जाहीर झाले, तेव्हा मराठी माणसाला तो आपल्या भाषेतील 'श्रीमंत योगी'चा गौरव वाटला. विंदांनी त्याआधीच १५ वर्षे लिखाण थांबविले होते. पण सुदैवाने 'अष्टदर्शने'ला प्रकाशनाचा प्रकाश उशिरा लाभला आणि पुरस्कार देऊ इच्छिणाऱ्या भारतीय ज्ञानपीठ ट्रस्टच्या दृष्टीने तो पथ्यावर पडला. अर्थात दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकांच्या फळीवर उभ्या असलेल्या, किंवा असे म्हणू की, पहिला क्रमांक 'डावलला' गेलेल्या काही साहित्यिकांना तो रुचला नव्हता.

खुल्या अर्थव्यवस्थेच्या काळात, १९९१ पासून सारे काही खुल्लमखुल्ला होऊ लागल्यापासून पुरस्कार हेही देण्याऐवजी / मिळण्याऐवजी 'मिळवण्याची बाब' झाले आहेत, हे नाकारण्याचे कारण नाही. पण ज्ञानपीठ हा सरकारी पुरस्कार नसून एका ट्रस्टमार्फत दिला जाणारा पुरस्कार आहे आणि बहुतांशी ट्रस्ट 'ट्रस्टवर्दी' राहिलेले नसले तरी ज्ञानपीठ ट्रस्टने आपली गुणवत्ता दीर्घकाळ टिकवून ठेवल्याने हा पुरस्कार अजून तरी आपल्या देशातील सर्वोच्च मानाचा, प्रतिष्ठेचा मानला जातो. तरीसुद्धा एखादा नाराज साहित्यिक त्याविरुद्ध बोलला

तर आपण ते समजून घेऊ शकतो.

विंदांना ज्ञानपीठ जाहीर झाले, त्यावेळी 'लोकसत्ता'त असतानाची एक आठवण सांगावीशी वाटते. या पुरस्काराबद्दल मराठी साहित्य क्षेत्रातून उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त होत असताना एका सहकाऱ्याने विजय तेंडुलकरांशी संपर्क साधला. वास्तविक तेंडुलकर स्वतः या पुरस्काराचे एक स्पर्धक, किंबहुना 'पात्र उमेदवार' म्हणता येतील. १९९८ मध्ये गिरीश कर्नाड यांना हा पुरस्कार मिळाला तेव्हा विजय तेंडुलकरांसारख्या प्रतिभावंत नाटककाराला आपल्याआधी तो मिळायला हवा होता, अशी खंत कर्नाडांनी व्यक्त केली होती. साहजिकच तेंडुलकरांनी काहीही भाष्य करायला नकार दिला, हे समजू शकते. पण ते त्यापुढे गेले. 'कसला पुरस्कार? ज्ञानपीठ? असले पुरस्कार हल्ली कुणालाही मिळतात. मला त्यावर काहीच बोलायचे नाही' ही त्यांची प्रतिक्रिया प्रसिद्ध केली नाही. कारण ती केवळ वाद ओढविणारी ठरली असती, असे नाही, तर औचित्य सांभाळणारी नव्हती. अर्थात वाद झाला असता तर तेंडुलकरांनी तो शिंगांवर घेतला असता, हा भाग निराळा ! असो.

भालचंद्र नेमाडे हे या अर्धशतकातील श्रेष्ठ साहित्यिक मानले जातात. त्यांची 'कोसला' कादंबरी विलक्षण गाजली. 'कोसला'पासूनच नेमाडे यांचा दबदबा एवढा वाढत गेला की, त्यांच्याविरुद्ध मत नोंदविताना कुणीही विचारच करावा. पण नेमाडे यांच्या स्वतःच्याच भूमिका पुढेपुढे वादग्रस्त होत गेल्या, याचे कारण त्या 'वादग्रस्त' होतील, याची जाणीव मोठी असे आणि आणि भूमिकांपेक्षा त्या वादग्रस्त करण्याच्या हेतूने, तशाच पद्धतीने मांडल्या गेल्या.

साहित्य अकादमीचा पुरस्कार 'कोसला'ला लाभला असता तर साहित्यरसिकांना आवडलेही असते. पण अकादमीच्या 'लौकिका'नुसार तो मिळाला १९९१ मध्ये; तोही 'टीकास्वयंवर'ला. (साहित्य अकादमीने गो. नी. दांडेकर, त्र्यं. वि. सरदेशमुख, विश्राम बेडेकर, आनंद यादव, गंगाधर गाडगीळ, श्री. ना. पेंडसे अशा बहुतेक सर्वच मोठ्या साहित्यिकांना त्यांच्या 'मैलाच्या दगडां'ऐवजी उतरणीच्या काळात 'जीवन गौरव छाप' पद्धतीने पुरस्कार 'देऊन' टाकलेले आहेत, पण तो या लेखाचा विषय नाही.) तर साहित्य अकादमीचे पुरस्कार १९५५ मध्ये सुरु झाल्यापासून 'टीका' या साहित्यप्रकाराला मराठीत मिळालेला हा पहिला मान. वास्तविक हे स्वतंत्र ग्रंथलेखन नसून समीक्षात्मक लिखाणाचा, मुलाखतींचा संग्रह आहे. अन्य एखाद्या समीक्षकाला अशा संग्रहाबद्दल अकादमीने पुरस्कार दिला असता तर नेमाडपंथीयांनीच कदाचित त्यावर टीका केली असती. त्यामुळे झाले हे छान झाले.

प्रस्थापिताविरुद्ध बंडाचे निशाण उभारून नेमाडे लेखक झाले होते. पुरस्कार 'लाटून' लेखकाचे 'लेखकराव' कसे होतात, हेही नेमाडे यांनी पूर्वीच लिहिले होते. पण त्यांच्याच नकळत ते स्वतः 'लेखकराव' होण्याच्या वाटेकडे वळले आणि त्यांचा प्रवास ज्ञानपीठ मिळवण्यापर्यंत आला.

नेमाडे यांना स्वतःला वादाच्या भोवऱ्यात, केंद्रस्थानी राहायला आवडते. त्यामुळे ज्ञानपीठ पुरस्कारानंतरही काही ना काही कारणाने उद्भवलेल्या वादांच्या झिम्मा-फुगड्या नेमाडे यांच्याभोवती घुमत राहिल्या.

साहित्य वर्तुळातील या वादांना वादापेक्षा वावटळ म्हणणे अधिक योग्य ठरेल. मुंबई-पुणेकरांना वावटळी फारशा माहित नसतात. त्या अल्पजीवी असतात. वावटळ येते, भोवऱ्यासारखी गरगरून धुरळा उडवते, वाऱ्याबरोबर सरकून निघून जाते. मराठी जगातील वावटळी अशा हंगामी असतात. त्यातून खरोखरीच काही वाद-विवाद, तात्त्विक चर्चा व्हावी आणि भविष्याला दिशा देणारे काही निघावे, अशी कुणाची इच्छा नसते. अनेकदा त्या हुल्लडबाजीच्या पातळीवर उठवल्या जातात. म्हणूनच ज्ञानपीठ पुरस्कार, महाराष्ट्रभूषण पुरस्कार, साहित्य संस्कृती आणि विश्वकोश मंडळावरील नेमणुका यावरून उठलेल्या वावटळी दादर किंवा वांद्र्याच्या बाजूला भरकटत गेल्या तरी आश्चर्य वाटत नाही. तर मुद्दा हा की, वावटळीचे केंद्र महाराष्ट्रभूषण पुरस्काराकडे सरकले तरी स्वाक्षरी मोहिमेच्या निमित्ताने नेमाडे पुन्हा त्यात अग्रस्थानी आलेच. माध्यमांतून, विशेषतः 'सोशल मिडिया'त या विषयावर एवढी चिखलफेक झालेली आहे की, ती उगाळण्यातही काही हशील नाही. पण...

***

महाराष्ट्रभूषण पुरस्काराच्या वादात राजकारणी उतरल्यामुळे ही वादावादी राजकीय – त्यापेक्षाही जातीय आणि सामाजिक दुर्गंधीच्या पातळीवर गेली. सोशल मिडीयाच्या तर कचराकुंड्या बनल्या. यानिमित्ताने व्यक्त झालेली मते आणि उपटलेले वाद इतक्या गलिच्छपणे, वैयक्तिक, प्रसंगी हीन पातळीवर, चव्हाट्यावर आणले गेले की, त्यात भूमिका म्हणून आपले काही मत मांडण्याचे धाडस करण्यापेक्षा मौन पाळणे अनेकांनी पसंत केले.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वाटचालीतील हे गंभीर वळण ठरावे. परमतसहिष्णुता हा सांस्कृतिक प्रगल्भतेसाठी अत्यावश्यक गुण असतो. मुळात दुसऱ्याला बोलू दिले पाहिजे. त्याचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. डोळे वटारून, धाक घालून, धमकावून, आमिष दाखवून, बळाचा वापर करून किंवा थेट डोक्यात गोळी घालून आवाज बंद करणे यात पुरुषार्थ काहीच नसतो. आपल्याला न पटणारा आवाज वैचारिक खंडनानेच बंद करता आला पाहिजे. दुबळ्यांना तो करता येत नाही, म्हणून ते हिंसाचाराचा मार्ग अवलंबतात. आवाज बंद करण्याचा उपाय सभ्य बुरख्यामागून केलेला असो वा खुनासारखा हिणकस, दोन्ही समाजासाठी मारकच असतात.

महाराष्ट्राला मोठा, अभिमानास्पद सांस्कृतिक वारसा लाभला आहे, असे आपण मानतो. 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' हे आपण शिकतो, पण आचरणात आणताना वादाऐवजी चिखलफेक करू लागतो. सामाजिक भल्यासाठी चिखल किंवा गरळ अंगावर घ्यायलाही अनेकजण तयार असतात. तेंडुलकर, नेमाडे यांच्या बंडखोरीला म्हणूनच दाद मिळते. पण अशी बंडखोरीही 'सिलेक्टिव्ह'

म्हणजे पक्षपाताच्या किंवा हिंसक पातळीवर उतरू न देण्याचे भान ठेवावे लागते. नरेंद्र मोदी यांच्याबद्दल कितीही विरोधी मत असायला हरकत नाही. त्यांच्या हिंदुत्ववादी, सुप्त हुकुमशाही वृत्तीबद्दल जाहीर भूमिका घ्यायलाही हरकत नाही. पण 'माझ्या हातात कुणी पिस्तुल दिले, तर मी मोदींना गोळ्या घालीन' असे जाहीर वक्तव्य समर्थनीय ठरू शकत नाही.

***

मुद्दा हा की, पुरंदरे यांना महाराष्ट्रभूषण देण्याच्या निर्णयाविषयी वेगवेगळी मते असू शकतात. लोकशाहीत ती जाहीरपणे मांडण्याचा अधिकार प्रत्येकाला असतो. पण इथे एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी होती की, हा पुरस्कार सरकारी असल्यामुळे तो सत्ताधाऱ्यांच्या पसंतीचाच असणार होता. १५-१५ वर्षे सत्तेत असलेल्यांनी असे पुरस्कार देताना नीर-क्षीरविवेक बाळगला होता आणि त्यात कसलाही अभिनिवेश किंवा पक्षीय हिताचा वास नव्हता, असा कुणाचा दावा असेल, तर त्यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. इतिहासाची थडगी उकरायची का आणि किती, हाच फक्त प्रश्न उरेल. त्यामुळे उद्या कुणाला तो विनायक मेटे यांना अथवा आधुनिक धर्मवीरांना द्यायचा असेल, तर बहुमत मिळवून सत्तेवर येण्याचा आणि हवी त्याला खिरापत वाटण्याचा पर्याय मोकळा आहे. नाहीतरी आपण सारे पुरस्कार आणि निवड-नेमणुकांना भुईसपाट पातळीवर आणून ठेवले आहेच.



**तर्कतीर्थांच्या काळात घडवायला घेतलेला हा 'जगन्नाथाचा रथ' महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवानंतर वस्तुसंग्रहालयातील 'खटारा' म्हणून प्रदर्शनीय अवस्थेपर्यंत पोहोचला. या रथावर किती मखरी बसविल्या, अंबारी चढविल्या, ते नव्याने अध्यक्षपदी नेमलेले दिलीप करंबेळकर यांनीच एखाद्या खंडात प्रसिद्ध करावे.**

स्पर्धेत तीनच स्पर्धक असतील तर, तिघांनाही एकाच पातळीवर उभे करून 'अरे, तूच पहिला' असे म्हणून तिघांच्याही गळयात पदके अडकवण्याचा पर्याय आघाड्यांच्या राजकारणात असतो, तसा तो साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रातही आणता येईल. किंबहुना आणला आहेच. उदाहरणार्थ, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्यासारखा विद्वान असेपर्यंत साहित्य संस्कृती आणि विश्वकोश अशा दोन स्वतंत्र मंडळांची आवश्यकता वाटत नव्हती. पण महाराष्ट्राचे वय वाढत गेले, तसे विद्वत्तेचे झरे आटत गेले; भलतीकडेच धरणे उभी राहू लागली आणि आपापल्या भागात कालवे वाहू लागले. तर्कतीर्थांची जागा घेऊ शकणारे प्रकांडपंडित फारसे उरले नाहीत, जे काही होते ते सरकारी अनास्थेमुळे अशा पदांकडे पाठ फिरवू लागले. मग कामापेक्षा हुजरेगिरी करणाऱ्या, स्तुतिपाठक साहित्यिकांना सत्ताधारी जवळ करू लागले. त्यांचे रमणे भरवले जाऊ लागले. त्यांना तनखे दिले गेले. उडी मारण्याची कुवत नसलेल्या अर्धवट शहाण्यांना खांद्यावर घेऊन उंच खुर्च्यांवर नेऊन ठेवले गेले आणि सवंगांची वर्णी लावण्यासाठी मंडळांच्या विभाजनाचे सोपे मार्ग आघाडी सरकारे चोखाळू लागले. आता साहित्य संस्कृती मंडळाचेही विभाजन करून राज्य सांस्कृतिक विकास मंडळ आणि राज्य मराठी साहित्य अकादमी स्थापन करण्याचा घाट घातला जातो आहे. ते करताना वासरांतील लंगड्या गायींना गोठ्यांमध्ये अडकवून ठेवण्याचे पाप घडू नये, एवढीच सामान्य माणसाची अपेक्षा असेल.

***

साहित्य संस्कृती आणि विश्वकोश ही दोन मंडळे महाराष्ट्राचे पहिले मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या कल्पकतेची देणगी आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली १९ नोव्हेंबर १९६० रोजी स्थापन झालेल्या साहित्य संस्कृती मंडळाचाच एक प्रकल्प म्हणून विश्वकोश निर्मिती हाती घेण्यात आली. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या धर्तीवर वीस खंडांचा विश्वकोश उभा करण्याची कल्पना शेकडो निरलस अभ्यासक, तर्कतीर्थांसारखा 'गिरिधारी' आणि त्यांच्या पाठीशी उभे राहणारे सत्ताधारी असेपर्यंत नेटाने साकारत राहिली. हजार-दीड हजार पृष्ठांचा एकेक खंड तयार करण्यामागे शेकडो अभ्यासकांना दहा-दहा वर्षे काम करावे लागले असेल. तरीही १९७६ मध्ये पहिला खंड आणि १९८९ मध्ये १४वा खंड प्रकाशित झाला.

तर्कतीर्थांच्या हयातीत वर्षाला एक खंड या विलक्षण गतीने चाललेल्या या महान कार्याला नव्वदनंतरच्या दशकात खीळ बसली, याचे कारण राज्यातील अस्थिरता, राजकीय बदल, खजिन्यातील खडखडाट आणि पाठोपाठ आलेली सत्ताधाऱ्यांची अनास्था. २७ मे १९९४ रोजी तर्कतीर्थांचे अचानक निधन झाल्यावर मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे यांची अध्यक्षपदावर नेमणूक करण्यात आली. तर्कतीर्थांच्या कारकिर्दीत तयार झालेला १५वा खंड छपाईला गेलेला होताच, तो रेगे यांनी पुढच्याच वर्षी प्रसिद्ध केला आणि प्रस्तावनेत तसा उल्लेख करून त्याचे श्रेय तर्कतीर्थांना दिले. रेगे यांच्या कारकिर्दीत (४ जून १९९४ ते २८ डिसेंबर २०००) १६वा खंड (१९९९) प्रकाशित झाला. त्यानंतर मात्र विश्वकोश प्रकल्पाच्या वाट्याला

आली ती निव्वळ फरफट आणि उपेक्षा. शिवसेना-भारतीय जनता पक्ष युतीच्या काळात अडगळीत गेलेल्या या प्रकल्पावर काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीने कोळीष्टके रचण्याचे काम केले आणि दैवदुर्विलास असा की, पुन्हा भाजप-सेना युती सत्तेवर आल्यावर या प्रकल्पावरची धूळ झटकली जाणार की, हजार वर्षांनंतर उत्खनन करणाऱ्या अभ्यासकांच्या 'सोयीसाठी' तो गाडून टाकला जाणार, असा सवाल साहित्य-संस्कृतीच्या वर्तुळात विचारला जाऊ लागला आहे.

अ. र. अंतुले मुख्यमंत्रीपदी आल्यावर त्यांनी साहित्य-संस्कृती मंडळाचे विभाजन करून विश्वकोश मंडळ वेगळा केला. सुरेन्द्र बारलिंगे यांच्या अध्यक्षतेखाली वेगळ्या पण काहीतरी अर्थपूर्ण वाटेने गेलेल्या साहित्य-संस्कृती मंडळाकडे वळण्यापूर्वी विश्वकोशासंबंधी एक-दोन नोंदी आवश्यक आहेत.

विलासराव देशमुख यांच्या नेतृत्त्वाखालील आघाडी सरकारने प्रा. रा. ग. जाधव यांची १६ जानेवारी २००१ रोजी विश्वकोश मंडळावर नेमणूक केल्यावर तर्कतीर्थ आणि रेगे यांचा वारसा पुढे चालू राहील, अशी आशा वाटत असतानाच सरकारी यंत्रणेने त्यावर बोळा फिरवला. मुळात मर्यादित केलेला विश्वकोश प्रकल्प पेलण्याची क्षमता जाधव सरांमध्ये नक्की होती, मात्र कुणाचाच पायपोस कुणाच्या पायात नसलेल्या 'बिघाडी'च्या राजवटीत जाधव यांना काम करणे अशक्य झाले आणि १० फेब्रुवारी २००३ रोजी कंटाळून त्यांनी ही जबाबदारी सोडून दिली. तब्बल पाच-सहा महिने विश्वकोश मंडळाला कुणी वालीच नव्हता. पण सुदैवाने डॉ. श्रीकांत जिचकार यांच्यासारखा विद्वान अध्यक्ष लाभला (२१ जुलै २००३). आघाडी सरकारने उभे केलेले अडथळे ओलांडण्याची कसरत सांभाळत त्यांनी मंडळाचे गाडे बऱ्यापैकी हलविले. मात्र २ जून २००४ रोजी त्यांचे अचानक अपघाती निधन झाले आणि विश्वकोश पुन्हा अनाथ झाला. रखडलेल्या १७व्या खंडाचे काम त्यांच्या कारकिर्दीत पूर्ण झाले तरी छपाई यंत्रणेपाशी हे घोडे रखडले आणि ९ डिसेंबर २००५ रोजी अध्यक्षपदावर नेमलेल्या विजया वाड यांच्या कारकिर्दीत २००७ मध्ये तो प्रकाशित झाला. अठरा वर्षांत अवघे तीन खंड प्रकाशित होण्याचे 'श्रेय' आघाडी-बिघाडी आणि युती राजवटींना तसेच शोभेच्या वस्तूंची कळा आलेल्या मंडळांना द्यावे लागेल.

थोडक्यात सांगायचे तर, तर्कतीर्थांच्या काळात घडवायला घेतलेला हा 'जगन्नाथाचा रथ' महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवानंतर वस्तुसंग्रहालयातील 'खटारा' म्हणून प्रदर्शनीय अवस्थेपर्यंत पोहोचला. तीन-तीन वर्षांच्या तीन मुदती मिळालेल्या विजया वाड यांनी या रथावर किती मखरी बसविल्या, अंबारी चढविल्या, झूल पांघरली, ते नव्याने अध्यक्षपदी नेमलेले दिलीप करंबेळकर यांनीच एखाद्या खंडात प्रसिद्ध करावे.

***

साहित्य आणि संस्कृती या संकल्पनेबद्दल प्रसिद्ध लेखक श्याम मनोहर यांनी म्हटले आहे की, 'नीट जगणे आणि जाणणे या माणसाच्या दोन ओढी असतात. नीट जगण्यासाठी समाजात जी व्यवस्था असते, तिला सभ्यता म्हणता येईल. सभ्यतेत शाळा, महाविद्यालये, ग्रंथालये, ग्रंथ अशी जाणण्याची व्यवस्था असते. तिथे मानवजातीला आधीच ज्ञात झालेले जाणून घेता येते. अज्ञातातले शोधणे या माणसाच्या ओढीला संस्कृती म्हणता येईल.'

सुरेन्द्र बारलिंगे, य. दि. फडके, द. मा. मिरासदार, मधु मंगेश कर्णिक यांनी अध्यक्षपद भूषविताना आपापल्या परीने 'साहित्य आणि संस्कृती' यांना आकार दिला. पण महाराष्ट्रात या दोन्हींना मोडीत घालण्याची चढाओढ लागलेली आहे. या मंडळाच्या अध्यक्षपदावर नव्याने नेमण्यात आलेले साकेत प्रकाशनाचे बाबा भांड त्या गारद्यांच्या गर्दीत सामील होणार की, साहित्य-संस्कृतींचे रक्षण करण्यासाठी 'मराठवाडी बाणा' दाखविणार, हे त्यांच्या कारकिर्दीत दिसेलच.

मराठी भाषा विकास समितीचे अध्यक्षपद यंदाच पार पडलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्यावर सोपविण्याचा सुज्ञपणा मात्र शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी दाखविला. डॉ. मोरे यांची नेमणूक वादातीत असली तरी त्यांचा काही लाभ सरकारी यंत्रणा करून घेणार का, हा खरा प्रश्न आहे. पण, तूर्त या तिघांना शुभेच्छा देण्याचा सुसंस्कृतपणा मराठी माणसाने दाखविलेला बरा.

***

नेमाडे आणि पुरंदरे यांच्या तुलनेत वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या, साप्ताहिके, नियतकालिके आणि त्यापेक्षाही फेसबुक-व्हॉट्सॲपसारख्या 'सोशल' मीडियात भांड, करंबेळकर यांच्या नेमणुका अल्पशा 'वावटळग्रस्त' ठरल्या. कारण-

१) मराठी माणसाला धूळ उडवण्याचा कंटाळा आला असावा.


२) 'कशाला उगाच टीका करून रोष ओढवून घ्या, उद्या आपलीही कुठल्या तरी समितीवर नेमणूक करवून घेण्याचा मागील दरवाजा किलकिला ठेवलेला बरा' असे साहित्यिक आणि 'टीकाकारां'ना वाटत असावे.

३) नेमाडे किंवा पुरंदरे यांच्यावर राळ उडवली तरी आपले कपडे स्वच्छ राहू शकतात, पण 'संस्कृती'सारख्या नाजुक, हळव्या जागेवर जखम वगैरे केली गेली तर 'नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे, एम. एम. कलबुर्गी यांच्यानंतर आता तुमचा नंबर' असा संदेश मिळायचा आणि कोण, कधी गोळी घालून जाईल, सरकारला सुद्धा कळायचे नाही...!

**- आल्हाद गोडबोले**
५०१, श्रीरामेश्वर भवन, समता नगर,
पोखरण रस्ता क्र. १, रेमण्डसमोर,
ठाणे (प) ४००६०६
भ्रमणध्वनी - ९५९४५४४८८८
alhadgodbole@gmail.com

**२ नवी पुस्तकं**...एक आहे निखळ आनंद देणारं
तर दुसरं आहे आपलं विचार-विश्व व्यापक करणारं !

रोहन प्रकाशन | घराला समृद्ध करणारी पुस्तकं





बालपणापासून आजपर्यंत भेटलेले
निसर्गातील 'सगे-सोयरे' आणि
त्यांच्याशी जडलेला भावबंध...

## 'ते' आणि मी

लेखिका
**शकुंतला पुंडे**

किंमत रु.२०० • **सवलतीत रु.१६०**
(पृष्ठं : १९६)




रुढी-परंपरांची चौकट मोडून
स्वत:चं क्षितिज शोधणाऱ्या
तीन पिढ्या

## 'ती'चं अवकाश

संपादन : **लीला गुलाटी, जसोधरा बागची**
अनुवाद : **मीना वैशंपायन**

किंमत रु.२५० • **सवलतीत रु.२००**
(पृष्ठं : ३१२)

रोहन प्रकाशन

धवलगिरी अपार्टमेंट्स, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

◆ सर्व पुस्तक विक्रेते
◆ ग्रंथ प्रदर्शनं ◆ FLIPKART
◆ ONLINE STORES येथे उपलब्ध

Online खरेदी व अधिक माहितीसाठी **www.rohanprakashan.com**

# भांड बाबा, भांड!

## संजय पवार



**खरं तर बाबा भांडाचा पिंड मुळीच उजवा नाही. तरीही त्यांच्या नियुक्तीची, त्यानंतर उद्‌भवलेल्या वादगांची, मंत्रिमहोदय अजिबात विचलित न होता आपल्या निर्णयाशी कायम राहत जी दखल घेताहेत ती प्रश्न प्रतिष्ठेचा झाला म्हणून की खरंच त्यांना बाबा भांड (यांचीच) नेमणूक करायचीय?**

यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिकीकरणात लक्ष घातलं आणि अनेक साहित्य मंडळं, विश्वकोश, साहित्य, चित्रपट पुरस्कार पाठ्यपुस्तक निर्मिती अशा अनेक साहित्य/कला या संदर्भात संस्थात्मक काम निर्माण झाले.

त्याकाळी साहित्यिक सरकारी/निमसरकारी नोकरी अथवा प्राध्यापकी करत (सध्या प्राध्यापकीत हा टक्का जवळपास १०० टक्के झालाय. दिवाळी अंक अथवा मासिकात लेखन हा त्यांना दिवाळी बोनस असे. शिवाय १९६० नंतर स्वतंत्र महाराष्ट्र नुकताच बाळसं धरू लागला होता. त्यामुळे सरकारशी दोन हात करण्याइतकं ना सरकार दमनकारी होतं ना साहित्यिक बंडखोर! तेव्हा साठोत्तरी बंडखोरी साहित्यिकात आपसात चालली होती. त्यांची केंद्रं भटवाडी, गिरगाव आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर पूर्व येथे होती.

अशा काळात 'सरकारी कमिटी'वर नेमले जाणे हे भूषणावह मानले जाई. त्याही काळात हुजऱ्यांची कमी नव्हती. पण तरीही राजकारणी आणि साहित्यिकातला सुसंस्कृतपणा बऱ्यापैकी शिल्लक होता. शिवाय राज्य मराठ्यांचे, प्रशासन आणि सांस्कृतिकीकरण ब्राह्मण-सारस्वतांचे असा एक म्युचुअल भेद ठरवून सुखैनैव नांदत होता!

साठोत्तरी बंडखोर या सरकारी कमिट्या, पारितोषिके, त्यावरचे सदस्य यांची यथेच्छ रेवडी उडवत असत. त्यातलेच नंतर यातले लाभार्थी झाले हा राज्यकर्त्यांचा की काळाचा महिमा यावर परिसंवाद होऊ शकतो.

महाराष्ट्रातल्या साहित्यिकांनी सरकारशी दोन हात करण्याचा जाहीर पवित्रा घेतला आणिबाणीत. त्यावेळी कराडला दुर्गाबाईंनी यशवंतरावांना प्रेक्षकात कसे बसायला लावले याच्या प्रेरक कहाण्या आजही सांगितल्या जातात. त्यानंतर (बहुधा) अंतुले मुख्यमंत्री असताना जे.पी. आंदोलनावरील विनय हर्डीकरांचे 'जनांचा प्रवाह चालला' हे पुस्तक पुरस्काराच्या यादीतून वगळण्यास सांगितल्याने परिक्षकांनी राजीनामे दिले, साहित्यिकांनी पुरस्कारावर बहिष्कार टाकला याचा परमोच्च बिंदू म्हणजे अकोल्याला गो.नी. दांडेकर अध्यक्ष असलेल्या साहित्य संमेलनाला मंत्र्यांच्या उपस्थितीला घेतलेली हरकत. त्यातून त्यावेळचे चौफेर संपादक माधवराव गडकरी यांच्या नेतृत्वाखाली पहिले समांतर साहित्य संमेलन मालतीबाई बेडेकरांच्या हस्ते दणक्यात पार पडले. सरकारी मदतीला 'लाथ' मारायच्या भावनातिरेकातून 'साहित्यकोश' म्हणजेच संमेलन निधी जमवायची आत्मसन्मानी घोषणाही झाली.

पण काळाच्या ओघात दुर्गाबाईंचे वारसदार हरले आणि त्यांनी अत्यंत सन्मानाने, किंबहुना त्यांच्याकडे पदर पसरत यशवंतरावांच्या वारसदारांना प्रेक्षकांतून व्यासपीठावर आणले. नुसते आणलेच नाही तर त्यांच्या स्वागताध्यक्षाखाली साहित्यिक व साहित्यबाह्य हौसमजा पुरवून घेतल्या. आजही घेताहेत. हे सर्व दुर्गाबाई, माधवराव, मालतीबाई यांना 'याचि देही याचि डोळा' पहावेही लागले.

एकदा सरकारशी दोन हात करायची मुख्य भूमिका बदलल्याने सरकारला समित्या, पुरस्कार, यासाठी कशाची म्हणून कमतरता पडली नाही ती आजतागायत.

उलट मंत्री, आमदार, खासदार, पक्षाध्यक्ष यांच्या हस्ते

पुस्तकांची प्रकाशने होऊ लागली! यात शरद पवार, सुशिलकुमार शिंदे, विलासराव देशमुख यांच्या 'हस्तांना' बऱ्यापैकी मागणी. नंतरच्या काळात बाळासाहेब ठाकरे. आता उद्धव ठाकरे, नितीन गडकरी हे अग्रेसर तर किशोरीबाई आमोणकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन चक्क राज ठाकरे यांनी केलं. त्या समारंभात राज ठाकरेंनी 'मला का बोलावलं माहीत नाही. कदाचित तुमच्या आणि आमच्या क्षेत्रात 'घराणी' महत्त्वाची म्हणून असेल कदाचित. 'राग'ही दोघांत कॉमन पण तुमचा वेगळा, आमचा वेगळा. पण आमच्याकडे घराणी सख्खी लागतात; चुलत नाही!' अशी व्यथा समस्त चुलत राजकारण्यांच्या वतीने मांडली.

पत्रकार हल्ली बाय डिफॉल्ट साहित्यिक असतातच. (तेंडुलकर, अरुण साधूंचा जमाना गेला) त्यांचं तर राजकारण्यांशिवाय पान हलत नाही.

हे असे साहित्यिक, पत्रकार मग 'साहेबांच्या' दरबारात 'सहज' हजेरी लावतात किंवा साहेब सकाळीच कसे बोलावून घेतात हे इतरांना खाजगीत सांगतात. काहीण 'वरमाय'सारखे हीच समिती, हेच मंडळ, सदस्य नको, अध्यक्षपद द्या असा हट्ट करून बसतात. तर काही हस्ते/परहस्ते आपला बायोडाटा पोहचवतात. राज्य बदलले, राज्यकर्ते बदलले तरी राजकारणी, साहित्यिक, पत्रकार यातले 'नाते' बदलत नाही. बदलतो फक्त रंग. यातले बरेचसे पाण्यासारखे प्रवाही असतात. त्यात जो रंग मिसळाल तो ते धारण करतात.

फार कमी लोक असतात ज्यांच्याकडे ही पदं सन्मानाने, कुठल्याही मध्यस्थीविना, रंग वगैरे न बघता येतात. पण ही गोष्ट विरळाच. अशी माणसं विनम्रतेने ही पदं नाकारतात. पण आता काळही बदलला आणि माणसेही.

महाराष्ट्रात नवं सरकार आलं, नवं मंत्रिमंडळ, नवे मंत्री आले. राजकीय परिभाषेत बोलायचं तर हे सरकार उजव्या विचारसरणीचं आहे. केंद्रातही त्यांचंच सरकार आहे. तेही पूर्ण बहुमतात. बरं हा उजवा विचार असा तसा नाही तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आहे. त्यामुळे केंद्र सरकारने तर आधीचं जे जे (त्यांच्या भाषेत) स्युडो सेक्युलर ते ते ३६० अंश फिरवून 'भगव्या' रंगात रंगवून काढायला सुरुवात केली. त्यातून पाठ्यपुस्तके, आयआयटी, एफटीआय, जेएनयू अशा संस्थावरच्या नेमणुका अजेंडा रेटणाऱ्याच राहिल्या. राजकीयदृष्ट्या यात चुकीचं काहीच नाही पण स्मृती इराणी, बात्रा, गजेंद्र चौहान यांच्या पात्रतेचाच मुद्दा उभा राहिला. त्यांचे अवाजवी उजवे हट्ट, धोरणं ही विवादास्पद ठरली. त्यातून प्रसंगी माघार घ्यावी लागली. आसारामबापूंना पाठ्यपुस्तकात आणून कपाळमोक्ष झाला.



**महाराष्ट्रात नवं सरकार आलं, नेमणुकात त्यांनी आपला 'कोटा' भरलाच. पण सोबत बाबा भांड, सदानंद मोरे, वसंत आबाजी डहाके अशी उजवीकडून डावीकडे झुकलेली किंवा डावीकडून उजवीकडेही तटस्थपणे पाहणारी माणसेही निवडली. त्यात बाबा भांड हे नाव भांडणास कारणीभूत ठरले!**

हे लोण महाराष्ट्रातही आलं. एफटीआयचे कौन्सिलिंग बॉडी सदस्य, साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, हे त्यात प्रामुख्याने. सेना-भाजप युतीत प्रथमच भाजपने सेनेवर राजकीय आघाडी घेतल्याने हे सरकार तांत्रिकदृष्ट्या 'महायुतीचे' सरकार आहे. पण त्याचा चेहरामोहरा आणि कारभार शतप्रतिशत भाजपाचा आहे. त्यात भाजपचे सर्वात उत्साही, प्रसिद्धीसन्मुख आणि स्वपक्षासोबत विरोधकात मैत्रीपूर्ण संबंध असलेले, शेटजी-भटजींच्या पक्षात क्षत्रिय असलेले विनोद तावडे हे सांस्कृतिक मंत्री असल्याने शिवाय शिक्षणमंत्री असल्यानेही 'नेमणुका' हा प्रांत त्यांच्याकडे अधिक आला.

या नेमणुकात त्यांनी आपला 'कोटा' भरलाच. पण सोबत बाबा भांड, सदानंद मोरे, वसंत आबाजी डहाके अशी उजवीकडून डावीकडे झुकलेली किंवा डावीकडून उजवीकडेही तटस्थपणे पाहणारी माणसेही निवडली. त्यात बाबा भांड हे नाव भांडणास कारणीभूत ठरले! खरं तर बाबा भांडाचा पिंड मुळीच उजवा नाही. तरीही त्यांच्या नियुक्तीची, त्यानंतर उद्भवलेल्या वादगांची, मंत्रिमहोदय अजिबात विचलित न होता आपल्या निर्णयाशी कायम राहत जी दखल घेताहेत ती प्रश्न प्रतिष्ठेचा झाला म्हणून की खरंच त्यांना बाबा भांड (यांचीच) नेमणूक करायचीय?

काहींनी होकार/नकार कळवलेत. डॉ. मोरेंनी तर काम देखील सुरू केले. नेमाडेंनी जसे 'महाराष्ट्र भूषण'वर थेट मत दिलं तसं आता डॉ. मोरेंनीही 'औरंगाबाद'च्या नामांतरावर औरंगजेबाचा भाऊ दारा कुशहो याला मैदानात उतरवलाय!

थोडक्यात काय तर या नेमणुका, त्यावरचे वादंग चहाच्या पेल्यातली वादळं किंवा तोतयांची बंड ठरावीत. यातून राजकारण्यांचा चेहरा दिसण्यापेक्षा, विचारवंत, साहित्यिक, पत्रकार यांचाच 'राजकीय' चेहरा प्रामुख्याने दिसतो. यावर आता खरं तर 'हमाम में सब नंगे' अशी स्थिती आहे.

याबाबतीत उजव्या-डाव्यांपेक्षा काँग्रेसवाले अधिक हुशार. त्यांचं या संदर्भात एकच वाक्य असतं- त्यांना काय लागतं हे आम्हाला चांगलं माहितीय!


**– संजय पवार**

witingwala@gmail.com

# उदाहरणार्थ (भालचंद्रराव!) नेमाडे

## राजेंद्र साठे

पुरस्कार मिळणे वा स्वीकारणे हे एकेकाळी भालचंद्र नेमाडे यांच्यासाठी त्याज्य होते. 'लेखकाचा लेखकराव का होतो' या त्यांच्या गाजलेल्या लेखामध्ये त्यांनी या भूमिकेचा हिरीरीने पुरस्कार केला होता. प्रस्थापित व्यवहारापासून लेखक नावाच्या प्राण्याने लांब राहावे असे तेव्हा नेमाडे यांचे मत होते. असे न करून जे लोक या व्यवहारात गुंतत जातात त्यांचे लेखकराव होत जातात आणि त्यांच्या आदिम कलावंतपणाला बाधा येते असे त्यांचे म्हणणे होते. हा आदिम कलावंतपणा जपणे हे सूत्र बराच काळ त्यांच्या कादंबऱ्यांमध्ये उपस्थित आहे. किंबहुना त्यांच्या चाहत्यांना या सूत्राचीच भूल पडलेली आहे. पण काळाच्या ओघात खुद्द नेमाडे यांनी क्रमाक्रमाने आपल्यातील विशुध्द ध्येयवाद कमी करीत नेला आहे. त्यातून त्यांच्याच भाषेत सांगायचे तर त्यांचा आता लेखकराव झाला आहे. अलिकडेच छगन भुजबळ यांच्या हस्ते त्यांनी पुण्यात महात्मा फुले पुरस्काराची पगडी घालून घेतली. त्यावेळी ते भुजबळ यांच्याविषयी आदराने बोलले. त्याहीपूर्वी एका टीव्ही वाहिनीच्या पुरस्कार कार्यक्रमातही ते आनंदाने सहभागी झालेले दिसले. त्यांच्या कोसलाचा नायक पांडुरंग सांगवीकर कादंबरीच्या शेवटी पालकांनी उभ्या केलेल्या खुंट्यावर येऊन उभा राहण्याच्या मनःस्थितीत येतो. तेव्हा ती एका बंडखोर नायकाची शोकांतिका होते. बंडखोरीची ही अपयशी अखेर पाहून काही तरुणांनी आत्महत्या केल्याचीही वदंता होती. पण त्या बंडखोर नायकाला घडवणाऱ्या बंडखोर लेखकाची कहाणी मात्र सुखात्मिका होऊ घातली आहे. प्राध्यापक डॉक्टर भालचंद्र नेमाडे यांना साहित्यातील सर्वोच्च मानला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार मिळणे हा या सुखात्मिकेचा कळस म्हणता येईल.



**काळाच्या ओघात खुद्द नेमाडे यांनी क्रमाक्रमाने आपल्यातील विशुध्द ध्येयवाद कमी करीत नेला आहे. कोसलाचा बंडखोर नायक घडवणाऱ्या बंडखोर लेखकाची कहाणी मात्र सुखात्मिका होऊ घातली आहे. प्राध्यापक डॉक्टर भालचंद्र नेमाडे यांना साहित्यातील सर्वोच्च मानला जाणारा ज्ञानपीठ पुरस्कार मिळणे हा या सुखात्मिकेचा कळस म्हणता येईल.**

एकेकाळी ज्ञानपीठ पुरस्कार हा लेखकाच्या एखाद्या कलाकृतीला दिला जाई. जसे की वि.स. खांडेकरांना तो ययातीसाठी मिळाला होता. तो निकष लावला असता तरी नेमाड्यांच्या कोसलाला तो मिळू शकला असता. यात योगायोगाची गोष्ट अशी की, फार वर्षांपूर्वी जेव्हा वाचकांच्या आवडत्या पुस्तकांबाबत कौल घेण्यात आला तेव्हा ययाती प्रथम तर कोसला दुसऱ्या क्रमांकावर होते. उघडच, ययाती आणि कोसला वाचणारे वाचकांचे दोन स्वतंत्र गट अस्तित्वात असणार. असो. पण सध्या हा पुरस्कार लेखकाच्या समग्र कामगिरीला दिला जातो. त्यानुसार तो कोसला ते हिंदू या नेमाड्यांच्या पूर्ण लेखनाला दिला गेला आहे असे समजायला हरकत नाही. सध्याच्या हिंदुत्ववादी मंडळींपैकी कोणी त्यांच्या कादंबरीचे हिंदू हे नाव वाचून त्यांची निवड केली नसेल अशी आशा आहे.

नेमाडे यांच्या कादंबरीतले नायक आणि खुद्द नेमाडे यांचे व्यक्तिमत्त्व गेल्या चाळीस-पन्नास वर्षात महाराष्ट्रात एकमेकात मिसळून गेले आहे. नेमाडे यांनी मौज-सत्यकथा शैलीच्या व्यक्तिवादी, रंजनवादी, मनोव्यापारांचे अवडंबर माजवणाऱ्या साहित्याचा धिक्कार केला. ते आणि त्यांचे धिक्कारवादी मित्र हे तेव्हा मुख्य प्रवाहाच्या

परिघावर होते. लीळाचरित्र सांगणारे चक्रधर, तुकाराम, महात्मा फुले, आंबेडकर अशांची एक बंडखोर, अब्राह्मणी पण अस्सल मराठी परंपरेचे आपण पाईक आहोत असे या धिक्कारवाद्यांनी मानले. सत्यकथा परंपरा ही उपटसुंभ आणि पाश्चात्य आधुनिकतेची (मॉडर्निझमची) भ्रष्ट नक्कल असल्याचे त्यांचे म्हणणे होते. नेमाडे यांनी तशी जोरकस टीका केली. नंतर ती टीकास्वयंवरमध्ये संकलित करण्यात आली. पण त्यांचे महत्त्वाचे वैशिष्टय हे की, काय बरोबर नाही हे सांगता सांगता काय असायला पाहिजे हे त्यांनी स्वतः कादंबऱ्या लिहून दाखवले. पुढच्या पिढीत उत्तम कादंबरीकार निर्माण होतील इतका बंदोबस्त मी कादंबऱ्या लिहून करणार आहे हे त्यांचे एका मुलाखतीतील वक्तव्य बरेच गाजले. ते अतिशियोक्त नव्हते. त्यांच्या कादंबऱ्यांनी आणि मेलडीमधील कवितांनी खरोखरच अनेक तरुण लेखक-कवींना प्रेरणा दिली आहे. आपल्या जगण्याशी प्रामाणिक राहून इथल्या मातीतील लिखाण करणारे अनेक साहित्यिक आज नेमाडे यांचे ऋण मानतात. या सर्वांना मराठी साहित्यात नेमाडपंथी अशी संज्ञा मिळाली आहे. किंबहुना, बारोमासवाल्या सदानंद देशमुखांपासून ते अधांतर नाटक लिहिणारे जयंत पवार किंवा अरुण काळेपासून ते प्रवीण बांदेकरांपर्यंतचे अनेक कवी असा एक विस्तृत साहित्यपट मराठीत जागृत राहिला आहे त्याचे काही श्रेय हे नेमाडे यांचे आहे. नेमाडे यांच्या समकालीन अनेक महत्वाचे लेखक कवी त्यांच्या बंडखोर कंपूत होते. भाऊ पाध्ये, अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, अशोक शहाणे अशा काहींची नावे खुद्द नेमाडे अनेकदा घेतात. भाऊ वा कोलटकर हे आपल्याहून सरस होते असे नेमाड्यांनी वेळोवेळी म्हटले आहे. पण या सर्वांहूनही अधिक प्रसिध्दी आणि यश नेमाडे यांना मिळाले. कोसला तर चार-पाच पिढ्या टिकून राहिली. त्या मानाने भाऊ पाध्ये यांची वासूनाका वा राडा ही आजच्या काळात मागे पडली. प्रस्थापित नेहमीच यशाला सलाम करतात. नेमाडे यांना मिळालेले ज्ञानपीठ हा नेमाड्यांच्या साहित्यिक यशाला सन्मान आहे. पण त्याच वेळी पूर्वी परिघावर असलेली एक बंडखोरी आता साहित्यिक वर्तुळाच्या मध्यबिंदूच्या जवळ सरकली असल्याचे हे निदर्शक मानता येईल. या माजी परीघवाल्यांचे यशस्वी नेते म्हणून नेमाडे यांच्या या गौरवाकडे पाहता येईल.

**नेमाडे यांच्या समकालीन अनेक महत्वाचे लेखक कवी त्यांच्या बंडखोर कंपूत होते. भाऊ पाध्ये, अरुण कोलटकर, दिलीप चित्रे, अशोक शहाणे अशा काहींची नावे खुद्द नेमाडे अनेकदा घेतात. भाऊ वा कोलटकर हे आपल्याहून सरस होते असे नेमाड्यांनी वेळोवेळी म्हटले आहे. पण या सर्वांहूनही अधिक प्रसिध्दी आणि यश नेमाडे यांना मिळाले. मराठी परंपरेला थोर ठरवण्याचा त्यांचा आग्रह हा अनेकांना शिवसेनासदृश राजकारणाला पूरक वाटलेला आहे. सध्या देशात हिंदुत्वाच्या नावाने गुंडांच्या टोळ्यांनी हैदोस घातलेला आहे. शिवाय देशाचे मध्यवर्ती राजकारणही काबीज केले आहे. नेमाडे आपल्या हिंदूविषयक विधानातून या राजकारणाला तडाखा हाणू शकले तर ते अत्यंत उपयोगी ठरेल.**

नेमाडे यांच्या लिखाणाबाबत विविध प्रकारची टीका करता येऊ शकते. कोसलानंतरच्या कादंबऱ्या म्हणजे निव्वळ डायऱ्या असल्याचे त्यांच्या मित्रांनीही म्हटले आहे. त्यांचे टीकास्वयंवरमधील समीक्षात्मक लेख हे छाछूगिरी आहे असे अरुण टिकेकरांनी म्हटले होते. नेमाडे हे इंग्रजी साहित्यातील संदर्भ योग्य रीतीने देत नाहीत अशी टीकाही झाली आहे. तरीही गंभीर सर्जनशील लिखाण हा दर्जा त्यांनी कधीही सोडलेला नाही हे त्यांचे टीकाकारही मान्य करतील. शिवाय त्यातील बंडखोरीचे सूत्र हे वाचकांना चांगल्या रीतीने उचकवणारे किंवा प्रोव्होक करणारे आहे. कोणत्याही उत्तम कलाकृतींचे ते एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कोणत्याही भाषेतील सर्जनशील परिसर अशा उचकवाउचकवीमुळेच जिवंत राहत असतो.

या देशातील हिंदू परंपरेबाबत नेमाडे यांना काही महत्वाचे विधान करायचे आहे. त्यासाठीची प्रस्तावना त्यांनी त्यांनी हिंदू नावाच्या कादंबरीत केली आहे. तिचे आणखी तीन भाग अपेक्षित आहेत. खरे तर, नेमाडे यांना काय म्हणायचे आहे याची थोडीफार कल्पना त्यांच्या वाचकांना आहे. देशीवाद नावाच्या संकल्पनेच्या निमित्ताने ती आली आहे. पण नेमाडे आपल्या कल्पनेचा विस्तार कसा करतात याची सर्वांना उत्सुकता आहे. याची कलात्मक मांडणी हा एक भाग झाला. तेच अलिकडे सातत्याने सांगतात त्याप्रमाणे ते एक मोठे आव्हान आहे. पण आपला विचारव्यूह संकुचितवाद्यांना उपयोगी पडणार नाही हे पाहणे हे त्याहूनही मोठे कठीण आहे. मराठीच्या प्रसारासाठी हुकुमशाही मार्ग वापरावे लागले तरी योग्यच आहेत अशा आशयाची वादग्रस्त विधाने नेमाडे यांनी पूर्वी केली आहेत. मराठी परंपरेला थोर ठरवण्याचा त्यांचा आग्रह हा अनेकांना शिवसेनासदृश राजकारणाला पूरक वाटलेला आहे. सध्या देशात हिंदुत्वाच्या नावाने गुंडांच्या टोळ्यांनी हैदोस घातलेला आहे. शिवाय देशाचे मध्यवर्ती राजकारणही काबीज केले आहे नेमाडे आपल्या हिंदूविषयक विधानातून या राजकारणाला तडाखा हाणू शकले तर ते अत्यंत उपयोगी ठरेल. ज्ञानपीठाच्या निमित्ताने लाभलेली एक व्यापक मान्यता आणि प्राप्त झालेली नवी प्रतिष्ठा यामुळे नेमाडे यांचा हा तडाखा फार प्रभावी ठरेल. नेमाडे तो देऊ शकतात का आणि कशा रीतीने देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल. तोपर्यंत, उदाहरणार्थ, त्यांचे अभिनंदन.

**– राजेंद्र साठे**

satherajendra@gmail.com

# पदापेक्षा कर्तृत्व वादातीत असावे

## मकरंद साठे

साहित्य संस्कृती, विश्वकोश यासारख्या ज्या सांस्कृतिक किंवा शैक्षणिक संस्था असतात, त्या शक्यतो सर्व राज्यसत्तेच्याच असाव्यात, त्या प्रायव्हेट असू नयेत. कारण प्रायव्हेटली कुणीही काहीही करू शकेल. साहित्य महामंडळ किंवा शैक्षणिक संस्थासुद्धा शक्यतो राज्य शासनाच्याच असाव्यात. परंतु आपल्याकडं गोंधळ असा होतो की, या संस्था राज्यसत्तेच्या किंवा राज्याच्या आहेत, म्हणजे त्या सरकारच्या आहेत, असं समजलं जातं. सरकार म्हणजे गव्हर्नमेंट आणि राज्य म्हणजे स्टेट याच्यामध्ये फरक केला जात नाही. या संस्था स्टेटच्या असतात, राज्याच्या असतात, सरकारच्या नसतात. त्यामुळं बदलत्या सरकारांनी, त्या आपल्या सरकारच्या किंवा पक्षाच्या मालकीच्या आहेत, असं समजणं चुकीचं आहे. त्याच्यामुळं अर्थातच जर खरोखरच त्या राज्याच्या (स्टेट) मालकीच्या झाल्या असत्या तर त्यासाठी काही स्पष्ट नियमावल्या, पायंडे करायला पाहिजेत.

अशा संस्थांच्या चालवण्याविषयी नि त्यांच्यावरील माणसांच्या निवडणुकीविषयी किंवा नेमणुकीविषयी काही स्वतंत्र ऑटोनॉमस बॉडी तयार केल्या गेल्या पाहिजेत, त्या त्या क्षेत्रातल्या खूप काम केलेल्या व्यक्तींच्या. जसं सरकार बदलेल किंवा लोकं बदलतील, तसा बदल या संस्थांमध्ये त्या त्या व्यक्तींच्या निकषांनुसार, त्या त्या सरकारच्या निकषांनुसार आणि त्या त्या सरकारच्या आयडियॉलॉजीनुसार (तत्त्वप्रणालीनुसार) हाही होणार आणि तो होत राहिला पाहिजे. किंबहुना ते स्वागतार्हच आहे. म्हणजे काँग्रेसचं राज्य असलं तर काँग्रेसच्या आयडियॉलॉजीचे लोक येतील, बीजेपीचं राज्य असलं तर बीजेपीच्या आयडियॉलॉजीचे लोकं येतील. परंतु हे म्हणत असताना एका लोकशाही देशामध्ये, आधुनिक आणि विविधतेनं भरलेल्या भारतासारख्या देशामध्ये कुठल्याही पक्षाची आयडियॉलॉजी किंवा कुठल्याही सरकारची आयडियॉलॉजी मुळात मूलभूत लोकशाही तत्त्व मान्य करणारी असली पाहिजे. म्हणजे त्यांनी समता आणि स्वातंत्र्य हे निखालसपणं मान्य केलं पाहिजे. ते कुठल्याही एका विशिष्ट धर्म, पंथ, जातीचे कैवार घेणारे नसले पाहिजेत. थोडक्यात ते हिंदुत्ववादी नसले पाहिजेत. याचा अर्थ हिंदुत्ववादी वा ब्राह्मणवादी वा मराठावादी नसले पाहिजेत. हे मान्य केल्यानंतर जो आयडियॉलॉजीतला फरक उरेल तो मूलभूत समता आणि स्वातंत्र्य मान्य करणारा असेल आणि तो अवश्य व्हावा. त्यांनी या संस्था प्रवाही राहतील. त्यांच्यात साचलेपणा राहणार नाही.



**आधुनिक आणि विविधतेनं भरलेल्या भारतासारख्या देशामध्ये कुठल्याही पक्षाची आयडियॉलॉजी किंवा कुठल्याही सरकारची आयडियॉलॉजी मुळात मूलभूत लोकशाही तत्त्व मान्य करणारी असली पाहिजे. म्हणजे त्यांनी समता आणि स्वातंत्र्य हे निखालसपणं मान्य केलं पाहिजे. ते कुठल्याही एका विशिष्ट धर्म, पंथ, जातीचे कैवार घेणारे नसले पाहिजेत. थोडक्यात ते हिंदुत्ववादी नसले पाहिजेत. हे मान्य केल्यानंतर जो आयडियॉलॉजीतला फरक उरेल तो मूलभूत समता आणि स्वातंत्र्य मान्य करणारा असेल आणि तो अवश्य व्हावा. त्यांनी या संस्था प्रवाही राहतील. त्यांच्यात साचलेपणा राहणार नाही.**

या संस्थावर नेमणूक होणारी मंडळी ही एखाद्या विशिष्ट आयडियॉलॉजीची असोत वा नसोत, त्या क्षेत्रातलं त्यांचं कर्तृत्व शंकास्पद नसावं. ठोस असावं. त्यामुळं त्यांच्या मतांविषयी किंवा त्यांच्या आयडियॉलॉजीविषयी मतभिन्नता असू शकतील. परंतु त्या क्षेत्रातल्या त्यांच्या कर्तृत्वाविषयी मात्र मतभिन्नता असू नयेत.

अशा व्यक्तींचा कार्यकाल हा मर्यादित असावा. आपल्याकडं एखाद्या सांस्कृतिक, साहित्यिक, शैक्षणिक अथवा क्रीडा मंडळांवर एकदा नेमणूक झाली की, त्या नेमणुका वर्षानुवर्षे चालू राहतात, असं आढळून येतं. त्यांचा कालखंड हा त्या त्या मंडळाच्या कार्यानुसार त्या माणसाला आपल्या मतांचा प्रभाव टाकता येईल, इतका जरूर असावा. परंतु तो साधारणपणे तीन ते पाच वर्षांच्या मर्यादेपलिकडं नसावा.

या मंडळांवर काम करणाऱ्या व्यक्ती भ्रष्ट नसाव्यात. किंबहुना त्यांच्यावर कुठल्याही भ्रष्टाचाराचा आरोपसुद्धा नसावा. अशा आरोपाचं निराकरण होईपर्यंत त्यांनी अशा संस्थांचे पदाधिकार घेऊ नयेत.

(शब्दांकन : राधिका कुंटे)

**– मकरंद साठे** (भ्रमणध्वनी : ९८२२०४२१७२)


## डॉ. रा. चिं. ढेरे यांचे महान ग्रंथ



महाराष्ट्राच्या शैव विचारधारांवर श्रीपर्वताचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष पण अत्यंत गाढ परिणाम आहे. श्रीपर्वताच्या छायेत महाराष्ट्रातल्या धार्मिक-सांस्कृतिक इतिहासातले काही महत्त्वाचे दुवे या ग्रंथात नव्याने उलगडले आहेत आणि काही कूट रहस्यांवरही नवा प्रकाश टाकला आहे.

**श्रीपर्वताच्या छायेत**

किंमत ₹ ३१०



गाणपत्य, जैन आणि मुकुंदराज ह्या तीन परंपरातील ग्रंथकारांचा आणि ग्रंथकृतींचा मागोवा घेणारा ग्रंथ.
प्राचीन मराठी साहित्याच्या सामर्थ्याची, सौंदर्याची आणि भक्तिभावनेच्या अखंड सूत्राची जाणीव करून देणारा ग्रंथ.

**त्रिविधा**

प्राचीन मराठीच्या तीन साहित्यधारा

किंमत ₹ २००



मराठीतील नामदेव आणि नामदेव परिवार यांच्याविषयीच्या साहित्यात भर घालतानाच 'जनी'चे लौकिक व वाङ्मयीन चरित्र तर नागरीचे आत्मकथन.

**श्रीनामदेव जनी आणि नागरी**

किंमत ₹ १३०

१९ पुस्तकांची एकत्रित
किंमत ₹ ५०३०
सवलतीत ₹ ३७७०

सर्व पुस्तकांवर २०% सवलत

**श्रीतुळजाभवानी** — किंमत ₹ ६००

**करवीरनिवासिनी श्रीमहालक्ष्मी** — किंमत ₹ ४५०

**लज्जागौरी** — किंमत ₹ ३००

**श्रीवेंकटेश्वर आणि श्रीकालहस्तीश्वर** — किंमत ₹ ४००

**श्रीविठ्ठल: एक महासमन्वय** — किंमत ₹ ४००

**नाथ संप्रदायाचा इतिहास** — किंमत ₹ २८०

**दत्त संप्रदायाचा इतिहास** — किंमत ₹ २६०

**दक्षिणेचा लोकदेव श्रीखंडोबा** — किंमत ₹ २००

**लोकदैवतांचे विश्व** — किंमत ₹ २३०

**संत, लोक आणि अभिजन** — किंमत ₹ २५०

**भारतीय रंगभूमीच्या शोधात** — किंमत ₹ २५०

**मुसलमान मराठी संतकवी** — किंमत ₹ १७०

**लोकसंस्कृतीचे उपासक** — किंमत ₹ २१०

**लोकसाहित्य शोध आणि समीक्षा** — किंमत ₹ १७०

**आज्ञापत्र** — किंमत ₹ १४०

**श्रीआनंदनायकी** — किंमत ₹ ८०

**पद्मगंधा प्रकाशन**
१९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० www.padmagandha.com
फोन : (०२०) २४४५०२६० मो. : ७३५०८३९१७६ E-mail : p.padmagandha@gmail.com

# सोशल मिडिया नावाच्या 'चावडी'वरील चर्चा




**फेसबुक, व्हॉटस्‌ॲप, ट्विटर आदी 'सोशल मिडिया'वर गेले अनेक दिवस चाललेल्या शाब्दिक लढाईतील काही निवडक विधाने आणि उतारे–**

### स्त्रीच्या आत्मसन्मानाचा प्रश्न

पुरंदरे यांना पुरस्कार देण्यास विरोध हा जिजाऊंच्या चारित्र्यहननाशी संबंधित विषय होता. त्याहीपुढे जाऊन स्त्रीच्या आत्मसन्मानाशी संबंधित होता, हा आशय कुणी लक्षातच घेतला नाही. आतापर्यंत बारा ब्राह्मण व्यक्तींना महाराष्ट्रभूषण पुरस्कार दिला, तेव्हा कुठे विरोध झाला? पुरंदरेंना विरोध होताच जातीयवादाचा कांगावा करण्यात आला. खरेतर कांगावा करणारेच जातीयवादी आहेत.

– विजय चोरमारे

### ना ब्राह्मण; ना मराठा

स्वत:ला महाराष्ट्राचा जाणता राजा म्हणवून घेणाऱ्या एका राजकीय पुढाऱ्याने गेली पंचवीस वर्षे महाराष्ट्रातल्या सांस्कृतिक व साहित्यिक वर्तुळावर आपले साम्राज्य प्रस्थापित केले आहे. साहित्य परिषद किंवा नाट्य परिषदेच्या विश्वस्त मंडळावर हे गृहस्थ स्वत: असतात किंवा आपले पित्ते आणून ठेवतात. दरवर्षी मराठी नाट्यसंमेलन व साहित्य संमेलन कुठे व्हावे, त्याचे अध्यक्ष कुणी असावे, स्वागताध्यक्ष कुणी व्हावे याचे सगळे निर्णय हे साहेब घेतात. राज्यातले सर्व महत्वाचे पुरस्कार कुणाला दिले जावेत याचे निर्देश हे साहेब देतात. सत्ता कुणाचीही असो, सांस्कृतिक क्षेत्रातील सारी पदे त्यांच्याकडूनच ओके करून घ्यावीत असे गेली पंचवीस वर्षे महाराष्ट्रात बिनघोर चालू आहे.

राष्ट्रवादाच्या नावावर जातीय राजकारण करणाऱ्या दोन पक्षात डावे उजवे करणे अवघड. पण मग मी अनुभवापेक्षा नवशिक्यांच्या मागे उभे राहणे पसंत करीन. साहेबांच्या इच्छांना सुरुंग लावून महाराष्ट्रभूषण पुढे रेटणाऱ्या फडवणीस आणि तावडे या राजकीय नेत्यांचे अभिनंदन!

वा! आपण तर बुवा खुश आहोत. आपण ब्राम्हण नाही आणि मराठाही नाही या गोष्टीचा काय अभिमान वाटतोय आज!

(या पोस्टमध्ये मी या नेत्याचे नाव घेतले नाही. 'He who cannot be named' च्या चालीवर.)

– मुरली खैरनार

### 'देशी' जेम्स लेन

''......तर, पुरंदरे प्रकरणातून शिकायचा बहुजनीय धडा असा ..

मला ब्राह्मण – मराठ्यांना सांगायचेय की,

तुमचे महापुरुष तुमच्याजवळच ठेवा. तुम्हाला हवे तसे ते प्रोजेक्ट करा....ज्यांनी ही बदनामी केली असे वाटते त्यांच्याशी खुशाल भांडा...

आम्ही इतिहासाच्या मुडद्याच्या विध्वंसक जिवंतपणाला श्रद्धांजलि वाहत राहू.

तसेही आम्ही तुमच्या ऐतिहासिक इतिहासात खिजगणतीतही नव्हतो आणि आजही नाही.

थोडक्यात मराठेशाहीचा विषय माझ्या दृष्टीने तरी बाद!''

१) जेम्स लेनने जेवढी शिवाजी महाराज व जिजाऊंची बदनामी केली नाही तेवढी या आपल्याच लोकांनी केली आहे. घराघरापर्यंत पुरंदरेंच्या लेखनाचा विपर्यास करत बदनामी नेली आहे. आम्हाला इतिहास पुढे न्यायचाय की, बदनामी?

२) समाजकारण नव्हे तर जातीय राजकारण या वादामागे आहे. समाजात उभी फूट पाडत, जातीय विखार निर्माण करत ध्रुवीकरण केले जात आहे.

३) आपल्याकडे हिंदुत्ववादी, ब्रिगेडी, कम्युनिस्ट असे इतिहासकार शिवाजी महाराजांचे आपापल्या आकलनानुसार चित्रण करत आलेत. खरा इतिहास कोणालाच नको आहे. शिवाजी किती हा प्रश्न निर्माण व्हावा असे वातावरण आहे.

४) इतिहासावरील मतभेदांवर सैद्धांतिक चर्चा होऊ शकते. करावी. कादंबऱ्यातल्या इतिहासावर चर्चा करायची झाली तर विश्वास पाटील, रणजित देसाई ते माझ्यासकट लोक बाद होतील. इतिहासकाराची भूमिका आणि कादंबरीकाराच्या भूमिकेतील फरक समजला पाहिजे.

५) महाराष्ट्रभूषण पुरस्कार महत्वाचा नाही. गेल्या वर्षी तो कोणाला दिला हे कोणाला धड आठवणार नाही. या वादाने पुरस्कार बदनाम झाला आहे. पुरस्कार देणारे सरकार आहे तर घेणारे अथवा नाकारणारे पुरंदरे आहेत. माझे व्यक्तिगत मत असे की त्यांनी हा पुरस्कार घेऊ नये!

– संजय सोनवणी

## 'अर्धसत्या'चा इतिहास

(दिव्य मराठी, बुधवार, दि.१९ ऑगस्ट, २०१५, नाशिक)

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरेंना 'महाराष्ट्रभूषण' द्यावा की देऊ नये, या मुद्यावरून राज्यात दोन तट पडले आहेत. पुरंदरे विरोधक-समर्थकांच्या त्यामागे भूमिका आहेत. आज पुरंदरे 'महाराष्ट्र भूषण' होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर त्यांच्यावरील आक्षेप आणि त्या आक्षेपांना दिलेली ही उत्तरे....

कोकाटे – शिवकालीन लढा म्हणजे हिंदू-मुस्लिम दंगल अशी पुरंदरेंनी मांडणी केली. मुस्लिम राजे हिंदूंना तेलात तळत, जिवंत जाळत असा जुलूम शिगेला गेला होता. (राजा शिवछत्रपती, पृष्ठ ५४.) या पुरंदरेंच्या लिखाणास कोणताही पुरावा नाही.

सोनवणी – वर्णन अतिशयोक्त पण मुस्लिम राजे हिंदू राजांशी क्रौर्याने वागले हे सत्य आहे. पुरंदरेंनी कादंबरी लिहिताना लोकश्रुती आणि वास्तव मिसळले, हे खरे असले तरी क्रौर्य होते हे वास्तव कोणताही इतिहासकार नाकारत नाही.

कोकाटे – 'सरदार मोठेपणासाठी स्वत:ची आई विकायला कमी करत नव्हते. लाचार, स्वार्थी गुलाम, पुरुष कसले हे?' (पृष्ठ ८३) पुरंदरे यांचे हे लिखाण म्हणजे शिवकाळातील सरदारांच्या मातांचे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न आहे. कोणत्या सरदाराने आई विकली, त्याचा पुरंदरे यांनी पुरावा दिलेला नाही.

सोनवणी – मूळ वाक्य आहे- ती असंतुष्ट होती. जहागीरदारांची, सरदारांची तिला चीड. यांना स्वाभिमान, कुळाशीलाची चीड नाही. आईसुद्धा विकायला कमी करणार नाहीत हे लाचार, स्वार्थी. पुरुष कसले हे? यात विकायला कमी

## विचारांची लढाई

विचारांची लढाई विचारांनीच लढली गेली पाहिजे, असे आपण म्हणतो. विशेषतः एखाद्या विचारवंताची हत्या झाल्यावर तर हा विषय प्रकर्षाने चर्चेत राहतो. या बाबतीत माझ्या मनाचा गोंधळ उडतो. विचारांची लढाई हा वाक्प्रचारच मला नीट समजत नाहीय, असे दिसू लागते. मुळात, शरीराशिवाय मन नसते आणि मनाशिवाय विचार नसतो. विचार ही या जगातली भौतिक गोष्टच असते. ती कोणती पारलौकिक, गूढ गोष्ट नसते. त्या अर्थाने विचारांची लढाईही शारीरिक लढाईच असते. विचारांची लढाई रणगाड्यांनी चिरडली जाणे, गोळीबाराने दडपली जाणे, युद्धाने, तात्पुरती का असे ना, मिटवली जाणे – हे सर्रास घडताना दिसते. राजकारणात, निवडणुकांत, कोणत्याही स्पर्धेत विचारांची लढाई विचारांनी लढली जातेय, असे दिसत नाही. निरनिराळ्या विचारवंतांच्या वादस्पर्धा आयोजित करून त्यांत जो अजिंक्य ठरेल त्याचे सर्वांनी मान्य करावे, असे कुठेच होताना दिसत नाही. आणि अशा वैचारिक स्पर्धांचा न्यायाधीश कसा निवडणार? त्या न्यायाचे निकष कसे ठरवणार? राजकीय, सामाजिक, व्यावसायिक वा कोणत्याही भौतिक क्षेत्रात जिथे सत्ताबदलाची शक्यता असते, कुणाच्यातरी स्वार्थाला धोका पोचणार असतो तेव्हा ती लढाई फक्त वैचारिक राहात नाही. आणि एकदा लढाई म्हटले की सर्व उपलब्ध मार्ग, विधिनिषेध न बाळगता, माणसे वापरत असतात, असेच दिसते. समजा काश्मिरचा प्रश्न आहे आणि आपली बाजू शंभर टक्के बरोबर आहे – तरीही, तो प्रश्न विचारांच्या लढाईने सुटू शकत नाही, हेच दिसते. एखाद्या गणिताचे तार्किक उत्तर जसे सापडू शकते तसे मानवी समस्यांच्या बाबतीत होताना दिसत नाही.
– हे सगळे पाहता, विचारांची लढाई म्हणजे काय, या विषयावर इथल्या फ्रेंडसशी चर्चा करावी, असे वाटले. मला हा विषय नीट समजत नाहीय – या चर्चेने त्यात क्लॅरिटी येऊ शकेल, असे वाटते. यावर खुलेपणाने चर्चा व्हावी, ही विनंती.

**– चं. प्र. देशपांडे**

प्रसिद्ध नाटककार

# नव्या लिहित्या लोकांसाठी

साहित्याच्या कोणत्याही मठापासून दूर राहा. मराठी साहित्याला मठांचा शाप आहे. एकदा तुम्ही काही मोहात किंवा लोभात पडून मठाच्या दावणीला गेलात की तुमचे निव्वळ पाळीव जनावर होते. तुमचे मोकळे माणूसपण आणि लेखकपण हरवते. कोणत्याही मठाचा कुणीही मठपती सर्वज्ञ नसतो. विश्व खूप मोठे आणि अगाध असते आणि ते कुणा एकाच्या मेंदूच्या आकलनात येणारे नसते. खूप सारे अभिव्यक्त होणारे मेंदू मिळून विश्व उलगडत राहते आणि ही प्रक्रिया अव्याहत सुरू राहते. कुणा एकच मेंदू म्हणजे विश्व नव्हे. पण मठाधिपती तसा आव आणतात. आपल्याला सगळेच कळते आणि आपल्याला कळते तेच अंतिम असा त्यांचा थाट असतो. त्यांच्या जगण्याची जी काही चिंचोळी बोळकांड असते तिच्यात ते सगळे विश्व कोंबू पाहतात आणि मठातल्या जनावरांनी अंधश्रद्धेने तेच विश्व ग्राह्य धरावे असा त्यांचा दुराग्रह असतो. त्यापल्याड विश्व अजून अफाट उरलेले असते, पण मठाधिपती आपल्या शिष्यांना तिकडे जाऊ देत नाहीत आणि गेलाच कुणी चुकून तर त्याला संपवण्याच्या मागे लागतात. मठात जगण्याचा आणि लिहिण्याचा वेगळा आणि मोकळा श्वास घेता येत नाही. जगणे आणि लिहिणे मठाधिपतीच्या चिंचोळ्या बोळकांडीच्या आवाक्यात आणि अनुकरणातच करावे लागते. त्याने लिहिणे आणि जगणेही बोळकांडबद्ध होते. ही गोष्ट स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाच्या आणि साहित्याच्या विकासाला मारक असते. बोळकांडीबाहेरचे विश्व आणि जगण्याची विविध परिमाणे आणि प्रतिमाने साहित्यात यायची राहून जातात. मठांनी साहित्य खुजे, कोते, भेदयुक्त, संकुचित होते. मराठी साहित्याचे अशा मठाधिपती माठांनी अपरिमित नुकसान केले आहे. त्यांना वाटते तेच मानवी जगणे आणि त्यांना वाटते तेच साहित्य असे ते वागतात. स्वत:चे आणि चांगले लिहायचे असेल तर कुणाचे भक्त होऊ नका, कुठल्या मठात जाऊ नका आणि संधी मिळाली तरी मठाधिपती होऊ नका. साहित्याच्या उत्तुंग आणि व्यापक भल्यासाठी ते आवश्यक आहे.

**– राजन खान**

करत नव्हते आणि कमी करणार नाहीत यातला फरक समजायला नको काय?

कोकाटे – जेम्स लेनच्या मांडणीची पाळेमुळे पुरंदरेंच्या लेखनात आहेत. शहाजीराजांना शिवचरित्रातून गायब करणे, कोंडदेव, रामदासांना झोतात आणणे, ही पुरंदरेंच्या मनातील विकृती लेनमुळे राज्याला समजली. पुरंदरेंनी सोलापूरच्या व्याख्यानमालेत (२००३) लेनचे कौतुक केले होते.

सोनवणी – लेनच्या मांडणीची पाळेमुळे पुरंदरेंच्या लेखनात आहेत हा जावईशोध झाला. पुरंदरेंनी लेनचे पुस्तक तळटिपांसहित वाचता त्याचे कौतुक करणे चुकीचेच होते. पण या पुस्तकावर बंदी घालावी ही मागणी करणाऱ्यांतही तेच होते हे कसे विसराल?

कोकाटे – तुळजापूरची मूर्ती अफजलखानाने फोडल्याचा ऐतिहासिक संदर्भ नाही. खान आला, सारा गाव सैरावैरा धावत सुटला. तुळजापुरात तोडफोडीला उधाण आले होते. मूर्ती खडाखडा फुटू लागल्या. (पृष्ठ २५३)आदी हिंदू-मुस्लिम संघर्षाला खतपाणी घालणाऱ्या बाबी पुरंदरेंनी शिवचरित्रात घुसडल्या.

सोनवणी – अफझलखानाने हिंदू देवळे तोडली हे वास्तव आहे. यात संघर्ष निर्माण करण्याचा प्रश्न येत नही. त्या काळचा संघर्ष आजच्या काळाशी ओढूनताणून लावण्यचा प्रयत्न चुकीचा आहे. अफझलखान शिवरायांना ठार मारण्यासाठीच आला होता. हे वास्तव नाकारण्यात काय अर्थ?

कोकाटे – पुरंदरेंनी जिजाऊंची बदनाम करण्यासाठी कपोलकल्पित मांडणी केली. 'तिला वाटे आपण नाही का कुंतीच्या पंगतीला बसू शकणार? मला कुंतीच्या पंगतीला बसायचेय?' (पृष्ठ ८४) कुंतीला मुले कशी झाली हे सर्वांना माहिती आहे. जिजाऊला कुंतीच्या पंगतीत नेऊन बसवून पुरंदरेंनी शिवाजीच्या पित्याविषयी संशय निर्माण केला आहे.

सोनवणी – कुंतीला वरदानाने देवांपासून मुले झाली. या विधानात कुंतीला दैवी वराने नव्हे तर प्रत्यक्ष नियोगाने अथवा व्यभिचाराने मुले झाली हे अलीकडचे आकलन तेथे लादून कसे चालेल? अर्थ एवढाच आहे की पांडवांपैकी पराक्रमी असलेल्या भीम आणि अर्जुनाप्रमाणे पराक्रमी मूल व्हावे. आताचा आधुनिक अर्थ तेव्हा कोणी घेत असेल तर करण-अर्जुन हा चित्रपट पहावा.

कोकाटे – शिवबांवर खुद्द शहाजीराजे यांचाही नसेल एवढा जीव पंतांचा (कोंडदेवांचा) होता. त्यांचे (पंतांचे) आईसाहेबांचे आणि शिवबाचे गोत्र एकच होते. (सह्याद्री, पृष्ठ १२६) अशी मांडणी करून कोंडदेव हेच शिवाजीचे पिता आहेत, हे पुरंदरे यांना अप्रत्यक्षपणे सांगायचे आहे.

सोनवणी – राजांच्या घरातले ते मानाचे, धाकाचे, दराऱ्याचे, मायेचे आणि ममतेचे वडीलधारे पुरुष होते. ते सर्वांवर हक्काने रागवत अन हक्काने प्रेम करत.' (पान १२५). असे म्हटल्यावर येणारे वरील अर्थाचे विधान आहे. अज्ञानातून अपमान शोधणे बरे नव्हे.

कोकाटे – रामदास स्वामी आणि शिवाजी यांची कधीही भेट झाली नव्हती. तसेच रामदास शिवाजीचे गुरू असल्याचा ऐतिहासिक पुरावाही नाही. तरीसुद्धा रामदास शिवाजीचा गुरू असल्याचे पुरंदरे यांनी रंगवले. कारण त्यामुळे शिवरायांच्या कर्तृत्वाचे श्रेय आपोआप ब्राह्मणाकडे जाते.

सोनवणी – राज्याभिषेकापूर्वी रामदासांची शिवरायांची भेट झालेली नव्हती हे पुरंदरेंनी स्पष्ट लिहिले आहे. ते गुरू होते असे लिहिलेले नाही. 'महाराज त्यांच्या दर्शनास केळशीस आले. जंजिऱ्याच्या मुकाबल्यास त्यांनी हात घातला.' (पान ९३८) असेही लिहिले आहे. हे असे असतांना द्वेषापोटी विरोध अक्षम्य आहे.

●


## कार्यकारणभाव : समाज आणि साहित्य

अर्जुन डांगळे

माझ्या समीक्षात्मक लेखनात नितळपणा जपण्याचा मी प्रयत्न करतो. माझी सावली त्या लिखाणावर पडणार नाही किंवा दुसऱ्याची सावली त्याच्यावर पडणार नाही याची मी दक्षता घेतो. आणि मला ते शक्य होते कारण मी कोणत्याही साहित्यिक कंपूत नाही. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारविश्व हाच माझा विचार कंपू होय.

**- अर्जुन डांगळे**

पाने : १८८ / किंमत : ₹ २२०



## रघुनंदन त्रिवेदी यांच्या कथा

अनुवाद : जयप्रकाश सावंत

रघुनंदन त्रिवेदींच्या कथांचा सूर विलक्षण समंजस, धीमा आणि हळुवार आहे. या कथांमधली पात्रं भय आणि कातरता घेऊनच जगणारी आहेत. त्रिवेदींच्या भावुकतेची, हळव्या मनाची आणि आंतरिक कळवळ्याची तुलना मराठीतल्या साने गुरुजींशीच होऊ शकते.

**- जयंत पवार**

पाने : १७६ / किंमत : ₹ २००

# लोकवाङ्मय गृह

## नवी पुस्तके

## गुरुदत्त : तीन अंकी शोकांतिका

अरुण खोपकर



रसिकमान्य, विद्वज्जनांनी वाखाणलेले, सिनेमावरील सर्वोत्कृष्ट लेखनाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळालेले पहिले मराठी पुस्तक. हिंदी, इंग्रजी, इटालिअन आणि फ्रेंच भाषांत अनुवादित. नवे लेखन व नवी छायाचित्रे यांसहित. शब्दार्थ आणि चित्रार्थ यांना नव्या लयीत बांधलेल्या देखण्या ग्रंथरूपातली नवी आवृत्ती.

पाने : २७८ / किंमत : ₹ ४५०

पुठ्ठाबांधणी

**पिपल्स बुक हाऊस :**
१५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
✆ २२८७ ३७६८

**लोकवाङ्मय गृह :**
भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
✆ २४३६ २४७४ / फॅक्स : २४३१ ३२२०.
E-mail : lokvangmayagriha@gmail.com

आमची निवडक पुस्तके
**BookGanga.com/newshunt.com**
वर उपलब्ध आहेत.

## मराठीतील स्त्रियांची कविता

प्रभा गणोरकर

कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात स्त्रिया लिहीत आहेत, त्यांच्या कवितेच्या आशयात, काव्यविषयक दृष्टिकोनात, शैलीत कसकसे बदल होत आले आहेत आणि मराठीच्या प्रदीर्घ काव्यपरंपरेत स्वत:चे स्वतंत्र स्थान निर्माण करणारी स्त्रियांची कविता आज कोणत्या टप्प्यावर उभी आहे याची चिकित्सा करणारा ग्रंथ.

पाने : २६८ / किंमत : ₹ ३२०



## भारतीय राजकारण : मर्म आणि वर्म

राम बापट

संपादक : डॉ. अशोक चौसाळकर

प्रस्तुत पुस्तकात प्रा. राम बापट यांनी मार्क्स आणि महात्मा फुले यांच्या विचारांच्या अनुरोधाने समकालीन प्रश्नांची चिकित्सा केली आहे. कालचे आणि आजचे भारतीय राजकारण चांगल्या प्रकारे समजावून घ्यायला ही चिकित्सा उपयोगी ठरेल. प्रा. राम बापट यांच्या लेखनाचा तिसरा खंड.

पाने : २७२ / किंमत : ₹ ३२५

# बेजबाबदार सहीबहाद्दर

## राजेश कुलकर्णी

**बा**बासाहेब पुरंदरेंना महाराष्ट्रभूषण पुरस्कार देऊ नये अशा मागणीच्या पत्रकावर नेमाडे व कोत्तापल्ले यांनी सही केल्याचे म्हटले आहे. यातले कोत्तापल्ले हे 'जातीय विद्वेषप्रसार ब्रिगेड'च्या (या संघटनेला संभाजीराजांचे नाव देऊन त्यांची बदनामी केली जाते याबद्दल कोणाला काही वाटत नाही हे वेगळेच) कार्यक्रमाच्या व्यासपीठावर दिसतात. त्यामुळे त्यांच्या सहीला महत्त्व देण्याचे कारण नाही.

सदर निवेदन काय म्हणते?

'पुरंदरे यांना हा पुरस्कार दिल्यास त्यांच्या विकृत लेखनास राजमान्यता मिळाल्यासारखे होईल, अशी भीती राज्यातील फुले-आंबेडकर-शाहूंचे विचार मानणाऱ्या वर्गास वाटत आहे', असे या निवेदनात म्हटले आहे.

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे हे 'तथाकथित इतिहास संशोधक' असून छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, तसेच बहुजन स्त्रियांबद्दल अत्यंत अवमानकारक लिखाण त्यांनी केले आहे, कोणतेही समकालीन पुरावे नसताना त्यांनी केलेले लेखन कट्टरवादाला खतपाणी घालणारे असून शिवरायांसारख्या युगपुरुषाची प्रतिमा ठराविक समाजासाठी मर्यादित करून मलीन करणारे आहे, असा आरोपही या नामवंतांनी निवेदनात केला आहे. कॉ. शरद पाटील, प्रबोधनकार ठाकरे, सेतुमाधवराव पगडी, कॉ. गोविंदराव पानसरे, डॉ. भालचंद्र नेमाडे, जगतराव सोनावणे, डॉ. इंद्रजित सावंत, डॉ. जयसिंगराव पवार, श्रीमंत कोकाटे, चंद्रशेखर शिखरे अशा नामवंत इतिहास संशोधकांनी त्यांच्या लिखाणातून पुरंदरे यांच्या अनैतिहासिक लेखनाचे सविस्तर खंडन केले असून, कोल्हापूर येथील न्यायालयात पुरंदरे यांच्या जातीयवादी लिखाणाविरुद्ध अब्रुनुकसानभरपाईचा खटलादेखील सुरू आहे, असे या निवेदनात म्हटले आहे. राज्यासाठी भूषणावह कामगिरी करणाऱ्या विविध क्षेत्रांसाठी दिला जाणारा हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पुरंदरे यांच्यासारख्या वादग्रस्त व्यक्तिमत्त्वास देणे हे त्या पुरस्काराचे अवमूल्यन तर ठरेलच, पण महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाच्या विकृतीकरणास पाठबळ देणारेही ठरेल, अशी भीतीही या पत्रात व्यक्त करण्यात आली आहे. या पुरस्कारासाठी पुरंदरे यांच्या नावाची शिफारस करणाऱ्या समितीत एकही इतिहासतज्ज्ञ संशोधक नाही पुरंदरे यांच्या इतिहासलेखनाची अथवा त्यांच्या ऐतिहासिक भूमिकांची तपासणी करण्यात आलेली नाही, असा आक्षेप या पत्रात घेण्यात आला असून, केवळ वाढलेल्या वयाचा विचार करून महाराष्ट्रभूषण पुरस्कार देणे गैर आहे, असा दावाही या नामवंतांनी केला आहे. जातीय तेढ निर्माण करणारे विचार व लेखन ही कोणत्याही अर्थाने समाजसेवा ठरत नाही. त्यामुळे पुरंदरे यांना हा पुरस्कार देऊ नये, अन्यथा राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवराय तसेच महाराष्ट्रातील बहुजन स्त्रियांची मानहानी होण्यास आपणही तितकेच जबाबदार असाल, असा इशाराही या पत्राद्वारे मुख्यमंत्र्यांना देण्यात आला आहे.

आता कोत्तापल्ले यांनी नंतर वेगळे निवेदनही प्रसिद्ध केलेले आहे. त्यात ते म्हणतात की, बाबासाहेबांनी काहीही अद्वितीय केलेले नाही, म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यास आपला विरोध आहे. आता हे विधान वरील निवेदनात कोठे आहे का? त्यावरूनच या सह्याबहाद्दरांचा उद्देश कसा भंपकपणाचा आहे किंवा त्यांना कसे फसवले गेले आहे, हे स्पष्ट व्हावे. ब्राह्मणद्वेषाने अंतर्बाह्य भरलेला श्रीमंत कोकाटे हा माणूस हा नामवंत इतिहाससंशोधक कधी झाला? त्याच्यासारख्या माणसाबरोबर व्यासपीठावर बसणाऱ्या कोत्तापल्ले यांनी आपली किंमत किती कमी केलेली आहे हे लक्षात यावे. शिवाय त्या यादीतील कितीजण खरे इतिहाससंशोधक आहेत? कसा कोणास ठाऊक, पण वरील निवेदन तयार करण्याचा उद्योग कोणी केला व ही सह्यांची मोहीम कोणी राबवली याचा या बातमीत उल्लेख नाही.

मुक्ता दाभोळकर आणि विद्या बाळ यांच्याही सह्या त्या निवेदनावर आहेत असे कळते. ते मात्र आश्चर्यकारक वाटते. निवेदनातील भाषेला त्यांची संमती आहे का व त्यातही बाबासाहेबांच्या लिखाणातून शिवराय, जिजाऊ व बहुजन समाजातील स्त्रिया यांची बदनामी झाली आहे का याबाबत त्यांनी सांगावे. सर्वच आक्षेपांना अनेकांनी उत्तरे दिलेली आहेत व बदनामीच्या दाव्यात काहीही तथ्य नाही हेही एव्हाना स्पष्ट झालेले आहे.

●

# आमची आगळी-वेगळी, संग्राह्य पुस्तके !

**● नवी प्रकाशने ●**





## तीर्थाटन

**लेखिका : उमा हर्डीकर**

धार्मिक पर्यटन हा सध्या खूप लोकप्रिय होत चाललेला प्रकार. भारतात तर अनेक धर्म आणि त्यांची असंख्य प्रार्थनास्थळं यांची समृद्धी पाहायला मिळते. त्यांचाच हा सखोल वेध.

**(पृष्ठे - २८८)**
**(₹-३००)**




## लोकशाहीची ऐशी तैशी

**लेखक : विभूती नारायण राय**
**अनुवाद : चंद्रकांत भोंजाळ.**

भ्रष्ट राजकारणी आणि गुंड यांच्या अभद्र युतीमुळे राजकारणाचे होत असलेले गुन्हेगारीकरण आणि त्यामुळे दुर्मीळ होत चाललेले सचोटीचे राजकारण आणि प्रशासन, याचे भेदक वास्तव मांडणारी ही कादंबरी!

**(पृष्ठे - १५२)**
**(₹-१६०)**




## सोशल डायरी

**- सई तांबे**

जग उंबरठ्यापलीकडचं...आपण पाहून न पाहिल्यासारखं केलेलं. प्रश्न तेच...त्यांचे आणि आपलेही. पण उत्तरं मात्र वेगवेगळी... याच वेगळेपणाचा वेध घेत वाचकाला नकळत उंबरठ्यापलीकडे घेऊन जाणारी ही सोशल डायरी.

**(पृष्ठे - १२८)**
**(₹-१२५)**




## सादर सप्रेम

**- रत्नाकर मतकरी**

विजया मेहतांपासून ते मेधा पाटकर व विजय तेंडूलकर यांच्यापर्यंत एकूण २१ असामान्य व्यक्तिमत्त्वांचा रत्नाकर मतकरींच्या सिद्धहस्त लेखणीने घेतलेला वेध.

**(पृष्ठे - १६०)**
**(₹-२००)**

**मैत्रेय बुक क्लबचे सभासद व्हा आणि अक्षर खजिना मिळवा!!**

फक्त **रु. ९९९/-** भरा आणि लगेचच **रु. १५००/-** किंमतीची पुस्तके घरपोच मिळवा व नोव्हेंबर २०१५ मध्ये **'प्रिय मैत्रीण'** व **'मस्त भटकंती'** हे दिवाळी अंक मोफत मिळवा, तसेच वर्षभर **'मैत्रेय प्रकाशना'**च्या सगळ्या पुस्तकांवर घसघशीत **४०% सूट.**

**आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती**

मैत्रेय प्रकाशन

पारधी हाऊस, ३ रा मजला,
एम.जी. रोड, विलेपार्ले (पू.),
मुंबई- ४०० ०५७.

फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८.
चेतन मोहकर (अमरावती) - ८३९०३३८६०८
E-mail : prakashanmkg@maitreyagroup.com
Website : www.maitreyaprakashan.com

टोल फ्री क्र.:
1800 222 613

**एम.ओ. करा / डी.डी. पाठवा. पुस्तकं आमच्या खर्चाने घरपोच मिळवा**

ऑन लाईन खरेदीसाठी:- www.granthdwar.com / www.majesticonthenet.com / www.infibeam.com

# १७ वे बीएमएम अधिवेशन : एक अनुभव

## प्रतिनिधी

*'मैत्र पिढ्यांचे जपे वारसा*
*कला-संस्कृती मायबोलीचा'*

हे ब्रीदवाक्य स्वीकारून यंदाचे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे १७ वे अधिवेशन लॉस एंजिलिस येथे ३,४,५ जुलै २०१५ रोजी भरवले गेले. १९८१ साली स्थापन झालेली बी.एम.एम. ही संस्था 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर चालणारी सांस्कृतिक संस्था आहे. याआधी १९९१ला या संस्थेचे अधिवेशन लॉस एंजेलिस इथेच भरले होते. त्यानंतर तब्बल २४ वर्षांनी हे अधिवेशन पुन्हा एकदा लॉस एंजेलिसच्या अनाहाईम सेंटरच्या भव्य प्रांगणात संपन्न झाले.

भारतीय चित्रपटसृष्टीला १०० वर्षे पूर्ण झाली आणि त्याच पार्श्वभूमीवर सिनेमाच्या माहेरघरात, कलेच्या राजधानीत, हॉलीवूडच्या पंढरीत २०१५चे अधिवेशन भरवले गेले, हा एक अभूतपूर्व असा योगायोग होता. या संस्थेच्या अंतर्गत एकूण ५६ स्थानिक मराठी मंडळे कार्यरत आहेत. या मंडळांच्या मदतीने तसेच भारतातील संस्थांच्या मदतीने यंदाचे भव्य अधिवेशन आयोजित केले होते. त्याचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

या अनाहाईम सेंटरला अनेक पंचतारांकित, सप्ततारांकित हॉटेल्सचा वेढा होता. त्यामुळे राहण्याची व्यवस्था जवळपासच उपलब्ध होती. या अधिवेशनाच्या निमित्ताने सर्व हॉटेल्स मराठी माणसांनी तुडुंब भरली होती. सर्वत्र पारंपरिक पेहरावातले स्त्री-पुरुष, मुले-मुली पाहून क्षणभर भारतात असल्याचाच भास होत होता. अमेरिकेच्याच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यातून मराठमोळी मंडळी जमा झाली होती. जणू तिथल्या मराठी बांधवांचा दिवाळी मेळाच! पावणेचार हजार मराठी बांधवांना एकत्र बांधणारा सेतू होता 'मराठी भाषा आणि मराठी संस्कृती'

परकीय भूमीवर समभाषिक लोकांनी एकत्र येणं, त्यानिमित्ताने आपली भाषा, संस्कृती टिकवणं, ती परंपरा पुढच्या पिढीपर्यंत समर्थपणे पोचवणे हे काम या अधिवेशनाच्या निमित्ताने सहज पार पाडताना दिसत होते. तीन दिवसांचे हे कार्यक्रम म्हणजे महाराष्ट्रापासून दूर सातासमुद्रापार असणाऱ्या रसिक मराठी मंडळींसाठी आपल्या भूमीचा आनंद परकीय भूमीवर घेण्याची मोठी संधीच होती.

आपल्या मातृभूमीपासून दूर असणाऱ्या प्रत्येकाच्या मनात आपली भाषा, आपली संस्कृती, आपली माणसं, आपली भूमी याविषयीचा एक हळवा कोपरा कुठेतरी जागृत असतोच. निमित्त मिळाले की, माणूस नॉस्टेल्जिक होऊन या आठवणींना पुन्हा उजाळा देण्याचा प्रयत्न करतो. आणि बी.एम.एम.सारख्या अधिवेशनांना उपस्थित राहून ही कमतरता भरून काढण्याचा प्रयत्न करतो हे प्रकर्षाने जाणवले.

सतत ३४-३५ वर्षे चाललेला हा मराठी बांधवांचा उत्सव व त्याचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत आहे हे मात्र खरं! या अधिवेशनाची कल्पना जेव्हा मांडली गेली तेव्हा अमेरिकेत स्थिरावलेली मंडळी बालपण, तारुण्याचा काही काळ भारतात जगून मग अमेरिकेत स्थिरावलेली, त्यामुळे साहजिकच महाराष्ट्राच्या संस्कृतीला - मराठी भाषेला मुकलेली, ही मातीची ओढ त्यांना अस्वस्थ करत असे. त्यामुळेच आपली मूळ परंपरा काही प्रमाणात का होईना परकीय भूमीवर साकारावी या भावनेतून हे अधिवेशन सुरू झाले. या मंडळींच्या पुढील पिढीचा जन्म हा खुद्द अमेरिकेतला. त्यामुळे त्यांचे संस्कार हे महाराष्ट्र-भारत-अमेरिका या परिघातले. खऱ्या अर्थाने ग्लोबल पिढी! या पिढीला महाराष्ट्राशी असलेली नाळ जुळवून ठेवण्यात स्वारस्य आहे की नाही हा कळीचा मुद्दा आहे. या मुलांना आपली मूळ माती काय आहे ते समजावून-अनुभवून देण्याचा प्रयत्न बी.एम.एम.च्या माध्यमातून होतो आहे ही आनंदाची गोष्ट आहे. नव्याने आय.टी.च्या निमित्ताने अमेरिकेत आलेली पिढी आता या सर्व घडामोडींमध्ये आवर्जून भाग घेत आहे. साहजिकच 'जुने' आणि 'नवे' असा संगम या अधिवेशनातील कार्यक्रमात पाहायला मिळाला.

काव्यवाचन, कथांचे अभिवाचन, नाटकं, संगीतनाट्य, शास्त्रीय संगीत, विनोदी प्रहसन, कीर्तन असा सांस्कृतिक नजराणा रसिकांच्या भेटीला होता. यातले काही कार्यक्रम तिथल्या स्थानिक मंडळींनी निर्माण केले होते तर काही कार्यक्रम भारतातील कलाकारांनी सादर केले.

'शब्द सुरांच्या हिंदोळ्यावर' हा नंदू अत्रे व स्वाती सुंरगळीकर यांनी केलेला काव्य सादरीकरणाचा प्रयोग रसिकांची वाहवा मिळवून

गेला. 'यदा कदाचित' हे संतोष पवार लिखित नाटक अमेरिकेतल्या स्थानिक मराठी बांधवांनी सादर केले. 'मराठी गझल – एक मुक्तालिफ अंदाज' हा गजलांवर आधारित कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण ठरला तर 'रस–बरसे' (नवरसांची ओळख करून देणारा हिंदी–मराठी गाण्यांचा कार्यक्रम, 'उभ्या उभ्या विनोद' (विनोदी प्रहसन), उदकशांती (वैचारिक नाटक), पडल्यावर प्रेमात (नृत्य–नाट्य, संगीत यांचा एकत्रित अविष्कार), 'वाटेवरच्या सावल्या' हा कुसुमाग्रजांच्या साहित्यावर आधारित कार्यक्रम, खेळ मांडियेला (लोककलांची संगीत, नृत्यमय झलक दाखवणारा कार्यक्रम) हे देखील कार्यक्रम मनोरंजनात्मक व वैचारिक दिशामंथन करणारे होते. संतूर आणि बासरीची जुगलबंदी 'कॉल ऑफ व्हॅली'मध्ये अनुभवायला मिळाली तर 'रारंगढांग' या प्रभाकर पेंढारकर यांच्या कादंबरीचे अभिवाचनही ऐकायला मिळाले. प्रीती ताम्हनकर या लहान मुलीने सादर केलेले शास्त्रीय संगीत उपस्थितांची विशेष दाद मिळवून गेले. 'कीर्तन प्रवास' या कार्यक्रमांतर्गत वारीचे दर्शन घडवले तर 'समीप रंगमंच' या अंतर्गत दोन एकांकिका सादर करण्यात आल्या.

याशिवाय भारतातील कलाकारांनी आपली कला तिथे सादर केली. मला भेटलेले लिंजड्स (द्वारकानाथ संझगिरी), कथा कोलाज (मराठी कथांचे वाचन) 'गोष्ट एका काळाची, काळ्या पांढऱ्या पडद्याची' हा मराठी चित्रपटांचा आढावा घेणारा कार्यक्रम, 'टी टाईम विथ हर्षा' (हर्षा भोगले), 'गोष्ट तशी गमतीची' (विनोदी नाटक), अवधूत गुप्ते व वैशाली सामंत यांची संगीत–रजनी, 'लग्न पहावे करून', 'गंधर्व' इत्यादी अनेक कार्यक्रम भारतातील कलाकारांनी सादर केले.

बी.एम.एम.ला ६० टक्के गर्दी असते ती जुन्या जाणत्या वयस्कर लोकांची, ज्यांनी भारतीय संस्कृती बाल्यावस्थेत व तारुण्यावस्थेत अनुभवून त्याच आठवणीत अमेरिकेत आपली पाळेमुळे रोवली होती. ही सगळीच मंडळी 'भारत' जगण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करतात. आज भारत बदलला आहे. सिनेमा–संगीत–साहित्य या सर्वच क्षेत्रात नवीन प्रयोग होत आहेत हे वास्तव लक्षात घ्यायला यापैकी बरेच जण तयार नव्हते. म्हणूनच अवधूत गुप्ते व वैशाली सामंत यांनी सादर केलेल्या नवीन ढंगातील गाण्यांना बऱ्याच जणांनी नाके मुरडली तर तरुण पिढी त्या तालावर थिरकायला लागली होती. हा पिढ्यांमधील भेद सर्वत्रच जाणवतो. बी.एम.एम. तरी त्याला कसे अपवाद असणार? 'Born and brought up in America' या पिढीला डोळ्यांसमोर ठेवून असे कार्यक्रम आखावेच लागतात, हे वास्तव जुनी पिढी लक्षात न घेता दुसऱ्या दिवशी जेवणाच्या टेबलावर आपली नापसंती व्यक्त करीत होती.

अर्थात आदल्या दिवशीचा हा कार्यक्रम भरकटला होता हेही तितकंच खरं आहे. दिग्गज गायकांचा आवाज लागत नव्हता. ज्युनिअर आर्टिस्टना जास्त गाणी म्हणायला दिली, त्यामुळे अवधूत गुप्ते व वैशाली सामंत यांना ऐकायला आलेल्या मंडळींनी हळूहळू सभागृह रिकामे करायला सुरुवात केली. गाण्यांच्या तालात थिरकायला लागलेली तरुण पिढी ऐन रंगात आली असताना लगेच संथ गाण्यांचा बाज सुरू झाला. म्हणजे ना धड वयस्कर मंडळींना समाधान ना धड तरुणांना आनंद असा हा कार्यक्रम निराशाजनक झाला. शेवटी शेवटी त्याने रंग पकडला, पण तोपर्यंत 'रटाळपणाचा बाण' भात्यातून निसटला होता.

दुसऱ्या दिवशी मग या फिस्कटलेल्या कार्यक्रमावरच गप्पांचे फड रंगले.

''भारतीय कलाकार आम्हाला गृहित धरतात. त्यांनी काहीही केलं तरी आम्ही त्यांना डोक्यावर घ्यावं अशी अपेक्षा करतात हे योग्य नव्हे. इथला रसिक चोखंदळ आहे हे लक्षात घेऊन पूर्ण तयारीनिशीच कलाकारांनी इथे यावे.'' असा सूर बहुतेक सर्व अमेरिकन मराठी माणसांचा होता. या बोलण्यात अगदीच तथ्य नव्हते असे नाही.

याच्याविरुद्ध काही कार्यक्रम अप्रतिम या पातळीतच मोडले. त्या सर्वांना रसिकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. कॅलिफोर्निया या राज्यात भारतीय लोकसंख्या लक्षणीय आहे. त्यामुळे रसिकांचा प्रतिसाद उत्तमच होता. या विविध प्रवृत्तीच्या लोकांना एकाच वेळी समाधान देऊ शकेल अशा कार्यक्रमांचे आयोजन करणे ही आयोजकांसाठी आव्हानात्मक गोष्ट ठरणार यात शंका नाही.

यंदा पहिल्यांदाच 'लेखन कार्यशाळा' हा साहित्याशी संबंधित कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अमेरिकेत स्थिरावलेले, तिथल्या अनुभवावर नव्याने लिहू पाहणारे अनेक लेखक या कार्यशाळेत सहभागी झाले होते. 'भारतीय प्रकाशक आणि हे सातासमुद्रापार असलेले लेखक यांच्यात नेमका दुवा कसा साधता येऊ शकतो?' या विषयावर मुख्यत: ही कार्यशाळा आधारलेली होती. त्यासाठी मॅजेस्टिक प्रकाशन (अनिल कोठावळे), ग्रंथाली (डॉ. लतिका भानुशाली) यांजबरोबर इ–साहित्याची सुरुवात करणारे दोन संस्थापक (अजय गल्लेवाले आणि नंदन होडावडेकर) शिवाय संहिता लेखनासाठी मार्गदर्शन करण्यासाठी जितेंद्र जोशी व चिन्मय मांडलेकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. मराठी साहित्याच्या दृष्टीने ही खूपच महत्त्वपूर्ण गोष्ट होती. या कार्यशाळेत मांडले गेलेले विचार हे नक्कीच महत्त्वपूर्ण होते. ''लेखकांनी लिहीत राहावे व त्यासाठी आधी दिवाळी अंक किंवा मासिकांकडे आपले लेखन प्रकाशित होईल यासाठी प्रयत्न करावेत'' असे अनिल कोठावळे यांनी मत मांडले तर ''इ–साहित्य ही काळची गरज आहे. प्रत्येक लेखकाला प्रकाशक वाचक मिळवणे जमेलच असे नाही पण ब्लॉग वर मात्र लेखकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होते. लिखाणाचे स्वामित्व हक्क सुद्धा लेखकाकडेच राहतात'' असे मत अजय गल्लेवाले व नंदन होडावडेकर यांनी व्यक्त केले. तर ''एकाच जीवनात तुम्हाला दोन जीवन जगायला मिळतात. एक तुमची मातृभूमी व दुसरी कर्मभूमी! या अनुभवांना जोरकसपणे मांडा. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात विखुरलेला नव्याने उदयाला आलेला वाचकवर्ग, त्याची ग्लोबलायझेशनची भूक या माध्यमातून

अंशत: पूर्ण करू शकतो. जेव्हा स्थलांतरितांचा इतिहास लिहिला जाईल तेव्हा तुमच्या साहित्याची दखल घ्यावीच लागेल असे अनुभवाची अस्सलता असणारे साहित्य निर्माण करा'' असा सल्ला लतिका भानुशाली यांनी उपस्थित लेखकांना दिला.

अशा प्रकारचे कार्यक्रम बी.एम.एम.च्या माध्यमातून सादर होणे ही मराठी साहित्यासाठी नक्कीच आनंदाची गोष्ट आहे.

उद्घाटनाच्या भाषणात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी थेट प्रधानमंत्री मोदींच्या शैलीत मराठी बांधवांना भावनिक आवाहन केले. ''भारतातील-महाराष्ट्रातील ग्रामीण भागांसाठी मदत करा. त्यासाठी कोणत्याही लाल फितीचा अडथळा येणार नाही. प्रशासकीय सहकार्य तुम्हाला मिळेल'' असे आश्वासन त्यांनी मराठी अमेरिकन बांधवांना दिले.

अतुल कुलकर्णी हे स्टेजवर जास्त वेळ न राहता महाराष्ट्रात त्यांनी दत्तक घेतलेल्या गावाला मदत मिळावी म्हणून दिवसभर स्टॉलवर उभे होते. कलाकार म्हणून ते श्रेष्ठ आहेतच पण त्यांच्यातील 'माणूस' या निमित्ताने अधिक श्रेष्ठ ठरला. अशीच सामाजिक बांधिलकी समाजातल्या सर्व थरात निर्माण झाली तर नक्कीच भारताचे चित्र बदलू शकते.

'जनरेशन गॅप' या विषयावर अच्युत गोडबोले यांनी मिस्कील शैलीत आपले विचार मांडले. त्यांच्या बालपणीतले वैयक्तिक विनोदी किस्से मांडत गंभीर विषयाला हलकेफुलके रूप देण्याचा प्रयत्न केला. विनोदी शैलीत विषयाचे प्रतिपादन करताना मूळ विषयापासून त्यांचे भाषण भरकटणार अशी भीती वाटत असतानाच भाषणाने वेगळी कलाटणी घेतली आहे आणि वैचारिक मुद्यांना स्पर्श करत भाषणाची परिसीमा त्यांनी गाठली. हा आगळावेगळा प्रयोग खूपच यशस्वी झाला आणि रसिकांची विशेष दाद मिळवून गेला.त्याचबरोबर बिझिनेस सेमिनार, शैक्षणिक मार्गदर्शन, विविध प्रकारच्या स्पर्धा अशा अनेक विषयांना यावर्षी बी.एम.एम.मध्ये स्थान मिळाले.

'सारेगामापा'ची अंतिम फेरी ही खूपच वैशिष्ट्यपूर्ण ठरली. सर्वच गायकांनी मैफिलीला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. यात अमेरिकेत जन्माला आलेली इंग्रजाळलेले मराठी बोलणाऱ्या पिढीचे विशेष कौतुक! कारण गाणे सादर करताना या उच्चारांचा कुठे मागमूसही नव्हता हे विशेष.

सामान्य विक्रेत्यांसाठी मात्र यावेळचे बी.एम.एम. व्यावसायिक पातळीवर म्हणावे तितके यशस्वी ठरले नाही. स्टॉलचे प्रमाण आधीच्या मानाने घटले होते. रजिस्ट्रेशन फी, प्रत्यक्ष विक्री, इतर खर्च यांची सांगड घालणे कठीण पडत असल्याचे जाणवत होते. तरीसुद्धा नेहमीप्रमाणे 'ज्वेलरी सेक्शन' अनेकांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्याला अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद लाभलाच.

पुस्तकांना आताच्या काळात लाभणारा वाचकवर्ग नंतरच्या काळात लाभणार नाही हे वास्तव प्रकाशकांनी स्वीकारायला हवे असे मनापासून वाटते. इथे जन्मलेली तरुण पिढी मराठी बोलू शकते, मराठी समजू शकते पण वाचू शकत नाही. भारतातून आय.टी.च्या माध्यमातून अमेरिकेत गेलेली पिढीसुद्धा बरीचशी इंग्रजी माध्यमातून शिकून तिथे गेलेली आहे. त्यांनाही मराठी उत्कृष्ट बोलता येतं पण मराठी वाचण्याकडे त्यांचा कल नाही. त्यामुळे छापील पुस्तकांबरोबर ऑडिओ स्वरूपातील पुस्तक पुढील काळाची गरज ठरणार हे नक्की. मराठी माध्यमातून शिकलेली चाळिशीच्या पुढच्या पिढीचा प्रतिसाद आणखीन वीस वर्षे या व्यवसायाला मिळू शकतो पण नंतर मग प्रकाशकांना पुस्तकाचे स्वरूप बदलावे लागेल असे प्रामाणिकपणे वाटते.

यंदाचे बी.एम.एम. अधिवेशन हे सर्वार्थाने बहुविध ठरले म्हटले तर वावगे ठरू नये इतकी विविधता आयोजकांनी कार्यक्रमाचे आयोजन करताना दाखवली. महाराष्ट्रात मराठी जगणार की वाचणार हा प्रश्न रबर तोंडात चघळावा तसा चघळत असताना सातासमुद्रापार मात्र मराठी ताठ मानेने झेंडा रोवून उभी आहे आणि मदतीला अनेक गोऱ्या हातांचाही हातभार लागतो आहे ही गोष्ट प्रेरणादायी आहे. मराठी वाहिन्यांची संख्या वाढते आहे. मराठी प्रेक्षक वाढतो आहे या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातच काही ठोस पावले मराठी संवर्धनाच्या दिशेने उचलली तर आपली भाषा टिकवण्यासाठी जीवाचा आटापिटा करायची गरज पडणार नाही हे निश्चित. मराठीच्या नावाने पोकळ वल्गना करणाऱ्यांना वास्तवाचे भान जेव्हा येईल तो दिवस महाराष्ट्रासाठी आणि मराठीसाठी सुदिन ठरेल यात वाद नाही. ●


॥ग्रंथाली॥




# कोलाज
## अमेरिकेच्या अंतरंगाचा
### डॉ. लतिका भानुशाली
### डॉ. गजानन सबनीस

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

अमेरिकेच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, ऐतिहासिक जीवनाचा हा कोलाज आहे. हे रूढ अर्थाने अमेरिका या देशाचे भौगोलिक प्रवासवर्णन नाही. हे पुस्तक म्हणजे अमेरिकेत ४०-५० वर्षे वास्तव्य करून त्या देशात स्वत:चे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलेल्या स्थलांतरितांचा जीवन इतिहास तर आहेच. पण त्याचबरोबर भारतातील वेगवेगळ्या क्षेत्रात अति महत्त्वाचे काम करणाऱ्या आणि अमेरिकेला वरचेवर भेट देणाऱ्या लोकाचा अमेरिकेसंदर्भात असलेला परखड दृष्टिकोन व्यक्त करणारे वास्तववादी पुस्तक आहे. विविध मुलाखतींच्या माध्यमातून अमेरिका या देशाचे अंतर्बाह्य चित्र स्पष्ट करणारा आगळवेगळा प्रयोग म्हणजे कोलाज : अमेरिकेच्या अंतरंगाचा!

# भारताचा खरा शत्रू कोण?

## डॉ. अनंत लाभसेटवार

असं म्हणतात की माणसानं मित्राला जवळ आणि शत्रूला अतिजवळ ठेवावं. या सामीप्यामुळे त्याच्यावर लक्ष ठेवता येतं. म्हणून आपला निश्चित शत्रू कोण याची जाण असणं आवश्यक असतं. आपल्या जनमानसात आपला पश्चिम शेजारी खरा शत्रू असं सारखं बिंबवलं जातं. म्हणून आपलं संरक्षण त्या मुस्लिम देशाच्या वागणुकीवरून ठरवण्यात येतं. भारताचं बहुसंख्य लष्कर त्यासाठी वापरण्यात येतं. पाकिस्तान व भारत यामध्ये शत्रुत्व आहे हे कुणी नाकारणार नाही.

मात्र तुलनेनं मोठा शत्रू उत्तरेला हिमालयापलीकडे आहे याची आपल्याला तेवढी जाण दिसत नाही. चीननं ५० वर्षांपूर्वी आपल्या देशाचा एक लाख चौरस कि.मी.चा भूखंड काबीज केला. याशिवाय तो वारंवार आपल्या देशात घुसखोरी करतो. उभा अरुणाचलप्रदेश आपला म्हणून त्यानं जाहीर केलं. त्या प्रांतातील लोकांना व्हिसा देणं बंद करून त्यांना स्टेपल्ड व्हिसा देण्यास सुरुवात केली. एवढंच कशाला, त्यांच्या नकाशात अरुणाचल चीनचा भाग आहे असं दाखवण्यात येतं. असं असूनही आपण काय करतो? आपले माजी संरक्षणमंत्री (ए.के. अँथोनी) व सरसेनापती सिंग लोचट हास्य करत 'परस्परविश्वासार्हता वाढवण्यासाठी' त्या देशाला भेट देत. ही वागणूक स्वाभिमानशून्य व लाचारीची आहे असंच म्हणावं लागेल. कारण चीन तसं कुठे करतो? चीननं आपल्या थोबाडीत मारली तरी आपण त्या देशाशी नॉर्मल राजनैतिक संबंध ठेवतो. त्या देशानं भारतावर आक्रमण करून आपला शिरोभाग ताब्यात घेतला व अतिरिक्त भूभागावर मालकी हक्क घोषित केला म्हणून आपण राजनैतिक नाखुशी कधीच व्यक्त केली नाही.

चीनशी करार करून दोन देशांत व्यापार सुलभ केला, पण त्याचा भारताऐवजी त्या देशालाच जास्त फायदा झाला. कारण तो पिवळा देश आपल्यापेक्षा कितीतरी पटींनी जास्त माल, आपल्या देशात पाठवतो. आता तोरणं, गणपतीच्या मूर्ती व कंदिलासारखी मराठमोळी उत्पादनंदेखील त्या देशातून आल्यामुळे हजारो मूर्तिकारांच्या पोटावर पाय पडला आहे.

मग आपण काय केलं? लोचट हास्य करणारे, रणगाडा व बैलगाडीतला फरक माहीत नसणारे माजी संरक्षणमंत्री चीनला पाठवून चीननं थोबाडीत मारली तरी दुसरा गाल पुढे केला. आपल्या शेजाऱ्याची ही वर्तणूक बघून चीनला हसावं की रडावं हे कळत नसेल. हे महत्त्वाचे आहे कारण रक्तरंजित क्रांती करून साम्यवादी चीन उदयाला आला तेव्हा तो देश पोरका होता. नेहरूंनी त्या देशाला मान्यता दिली. तिबेट गिळंकृत केला तरी भारतानं बोट उचललं नाही. उलट आपल्या पहिल्या पंतप्रधानांनी चीनला संयुक्त राष्ट्रसंघात प्रवेश मिळावा म्हणून आपली प्रतिष्ठा पणाला लावली. हे सर्व विसरून माऊनं आपल्या मित्राच्या छातीत खंजीर खुपसला. हा दारुण पराभव भारताला एवढा अवमानकारक होता की त्याच्या चौकशीचा अहवाल अजूनही सरकारनं गुलदस्त्यात गुंडाळून ठेवला आहे.

त्यापासून आपण काही शिकलो का? मुळीच नाही. लडाखला जाण्यासाठी आपण लष्करयोग्य रस्तेदेखील बांधले नाहीत. त्यामुळे पुन्हा युद्ध झालं तर चिनी सैन्य दिल्लीपर्यंत येईल की काय याची शंका येते. ते येणार नाही यामागे चीनची असमर्थता नसून दिल्ली जिंकून गरीब देशाचं काय करायचं हा त्यांना पडलेला प्रश्न आहे. हा निराशावादी सूर काढण्याचं कारण म्हणजे मला श्रीनगरमार्गे लडाखला जाणारा नॅशनल हायवे नंबर १ अलिकडेच बघण्याचा योग आला. उत्तरेला जाणारा हा एकमेव मार्ग आहे. त्याची दयनीय स्थिती बघून मला पोटतिडीक झाली. कारगील घुसखोरी व चिनी आक्रमण या भागात होऊनही हा राजमार्ग अनेक ठिकाणी एकपदरी, खड्डेयुक्त व लष्करास अयोग्य आहे. तो एकाच वेळी गाड्या, लॉरीज, पादचारी व मेंढ्या वापरतात. मग जागा मिळाली तर त्यावरून लष्करी वाहनं, रसद व इतर युद्धसामग्री उत्तरेला पाठवण्यात येते. महत्त्वाचं म्हणजे हा महामार्ग हिवाळ्यात बर्फाखाली अदृश्य होतो. या मोसमात चीननं आक्रमण करू नये म्हणजे झालं. हा व्यूहात्मक व संवेदनशील भूप्रदेश असूनही परिवहनाचा पर्यायी मार्ग आपण बांधला नाही, तो म्हणजे रेल्वे. हा सर्व भाग पर्वतमय असल्यामुळे इथे बोगदे खोदावे लागतील. ही अर्थातच खर्चिक बाब आहे.

मात्र आपल्याजवळ देशाच्या संरक्षणासाठी पैसे नाहीत असं म्हणणं चुकीचं ठरेल. मी मुंबईत असताना, १६ ऑगस्ट २०१४च्या वर्तमानपत्रात स्वातंत्र्यदिनी दिलेल्या मोदींच्या प्रेरणादायी

भाषणाबरोबरच एक महत्त्वाची बातमी वाचली. आपल्या नौदलातील भारतीय बनावटीच्या सर्वात मोठ्या विनाशिकेचं उद्घाटन करण्यासाठी पंतप्रधान जाणार होते. ही भूषणावह गोष्ट असली तरी इतिहासात किती देशांनी भारतावर जलआक्रमण केलं हा प्रश्न माझ्या मनात आला. त्यानंतर ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात संरक्षण व वित्तमंत्री अरुण जेटली आपलं अण्वपाणबुड्या बांधण्याचं अभियान मागे का पडलं म्हणून चौकशी करणार होते व अब्जावधी रुपये त्यात गुंतवणार अशी वार्ता नजरेस पडली. म्हणजे समुद्रावरून कुणी आक्रमण करत नसता नौदल बलशाली करण्यास आपल्याजवळ पैसा आहे, पण उत्तरेला चिनी आक्रमण रोखण्यास लागणाऱ्या पायाभूत सुविधा बांधण्यास भांडवल नाही असं कसं म्हणता येईल? आपला प्राधान्यक्रम चुकीचा आहे एवढंच.

आता चीननं चोरलेल्या भागात काय केलं ते बघा. हा भागही आपल्याएवढाच पर्वतमय आहे. तरीही त्या देशानं एक नव्हे तर अनेक बहुपदरी रस्ते बांधले. एवढंच नव्हे तर रेल्वेदेखील सुरू केली. त्यामुळे ते वेळ आली तर तत्परतेनं आपलं सैन्य सरहद्दीवर पाठवू शकतात. त्याचा सामना करण्यासाठी आपलं लष्कर रस्त्यावरच्या खड्ड्यांशी वाटाघाटी करत व मेंढ्यांशी लढत तिथे कुथत कुथत वेळेवर पोचेल की नाही हे सांगणं कठीण. हिवाळ्यात तर गोष्टीच सोडा.

हिमालयात रेल्वे बांधणं कठीण, पण चीननं जगातील सर्वात उंच रेल्वे बांधून विक्रम केला. प्रथम त्या देशानं तिबेटमध्ये ल्हासापर्यंत लोहमार्ग नेला. ही अशक्यप्राय गोष्ट आहे असं जगातल्या अभियंत्यांनी जाहीर केलं कारण इथला भूप्रदेश हिवाळ्यात गोठलेला असतो. उन्हाळ्यात तो दलदलीत होतो. अशा परिस्थितीत रेल्वे कशी बांधणार? त्यासाठी लागणारं तंत्रज्ञान जगात नव्हतं म्हणून आपल्या पार्श्वभागावर बसण्याऐवजी त्यांनी संशोधन करून ते ज्ञान निर्माण केलं आणि जगाच्या डोक्यावर रेल्वे बांधली. एवढंच करून ते थांबले नाहीत. त्याचा फाटा त्यांनी उत्तरेला लडाखपर्यंत पसरवून सैन्य आघाडीवर पाठवण्याचा मार्ग काढला. हे माहीत असूनही आपण आपला उत्तरेला जाण्याचा एकमेव मार्ग तसाच खड्डेयुक्त व एकपदरी ठेवला याला काय म्हणावं?

१६ ऑगस्ट २०१४ च्या वर्तमानपत्रात दुसरी बोटभर माहिती मला वाचण्यास मिळाली. ती मला महत्त्वाची वाटली. चिनी अध्यक्षांनी (किंवा पंतप्रधानांनी) ल्हासावरून भूतानपर्यंत दोन अब्ज डॉलर खर्च करून नवीन रेल्वे बांधण्याचा मानस जाहीर केला. म्हणजे त्या योजनेचं पूर्वआयोजन संपूर्ण झालं असून ती कार्यरत करण्यात आली होती. या संक्षिप्त वृत्तांचं व्यूहात्मक महत्त्व असं की, चीन आपलं सैन्य त्या चिमुकल्या देशाच्या सरहद्दीपर्यंत आणून भारताला शह देऊ शकतो. अरुणाचलप्रदेश समीप आपली लष्करी शक्ती आणण्यामागे दुसरा कुठला उद्देश असेल? मी अद्याप त्या पूर्व प्रांतात गेलो नाही. पण तिथल्या रस्त्यांची महामार्ग १ सारखी स्थिती असेल तर देवच आपलं भलं करेल.

चीनच्या उन्मत्त वागणुकीचा अनुभव अनेक देशांना आला आहे. त्याच्या विस्तारगंडाचे पडसाद आता दक्षिण चिनी समुद्रावर उमटले आहेत. तो देश हा जलप्रदेश आपल्या मालकीचा नसणं हा ऐतिहासिक अन्याय समजतो. सेनकाकू ही जपानच्या मालकीची बेटं. पण आता चीननं त्यावर मालकीहक्क घोषित करून आपलं नौदल तिथे पाठवलं. जपाननं प्रत्युत्तर म्हणून या निर्जन पण तेलसमृद्ध बेटांभोवती आपला पहारा वाढवला. एवढंच नव्हे तर चीनची आक्रमक भूमिका बघून गेल्या दहा वर्षांत प्रथमच लष्करावरचा खर्च वाढवला. जपानला अमेरिकन संरक्षण छात्र मिळालेलं आहे. म्हणजे चीननं त्या देशावर हल्ला केल्यास अमेरिकेला जपानच्या संरक्षणार्थ पुढे येणं अपरिहार्य आहे हे माहीत असूनही चीनच्या आक्रमक पवित्र्यात फरक पडला नाही.

मग मे २०१४ मध्ये चीननं तेलाचा शोध लावणारी अवजड यंत्रणा व्हिएटनामपासून २२२ किलोमीटर दूर आपल्या नौदलासह पाठवून त्या देशाचा रोष ओढवला. कारण व्हिएटनाम तो जलमार्ग आपला समजतो. चीनच्या या शक्तिप्रदर्शनामुळे व्हिएटनामी लोकांनी दंगे करून देशातील चिनी कारखान्यांना आग लावली आणि दोन देशातमधील वैरत्व अजूनच वाढलं. व्हिएटनामला मी गेलो आहे. तो देश स्वाभिमानी आहे. आपल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसारखं लोचट हास्य करत कपोलकल्पित 'परस्परविश्वासार्हता' निर्माण करण्यासाठी बेजिंगची वारी करत नाही. असोसियन ऑफ साऊथ अशियन नेशन्स (ASEAM) या १० देशांच्या संघटनेनं अमेरिकेच्या पुढाकारानं नुकत्याच झालेल्या सभेत चीनचा निषेध करणारं विधेयक मान्य करून घेतलं व एकेकाळच्या शत्रूनं अमेरिकेशी जवळीक साधली.

याशिवाय चीननं दक्षिण चिनी समुद्राच्या दक्षिण भागात असलेल्या फिलिपाईन्सच्या बेटांवरही मालकीहक्क जाहीर केले. एवढंच नव्हे तर बेटांवर आपलं सैन्य आणण्यास विमानाची धावपट्टी बांधण्यास सुरुवात केली. फिलिपाईनमध्ये एके काळी म्हणजे दुसऱ्या महायुद्धात व व्हिएटनाम युद्धाच्या वेळी अमेरिकेची भलीमोठी छावणी व नौदल असे. परदेशी लष्करामुळे देशाच्या स्वातंत्र्याला धोका पोचतो म्हणून फिलिपाईननं अमेरिकेची हकालपट्टी केली. पण आता चीनचा भस्मासूर दारावर येताच तो देश अमेरिकेच्या काखेत जाऊन बसला. ऑस्ट्रेलिया चीनपासून बराच दूर, पण त्या देशानंदेखील चीनच्या विस्तारगंडाचा निषेध केला.

चीनचा प्रतिकार एकच शक्ती करू शकते. ती म्हणजे अमेरिका. पण त्या देशानं या महासत्ताक राष्ट्रालादेखील चीननं डिवचलं. २०१४ च्या सुरुवातीला चिनी समुद्रावर आपले मालकी हक्क गाजवण्यासाठी चीननं त्याला मर्यादित हवाईक्षेत्र (Limited Flying Zone) जाहीर केलं. या क्षेत्रातून उडताना विमानानं आपली पूर्वपरवानगी घेतली पाहिजे अशी घोषणा केली. तसं करणं म्हणजे चीनच्या मालकी हक्कांना मान्यता देण्यासारखं होतं. म्हणून अमेरिकेनं त्या क्षेत्रात आपलं लढावू विमान पाठवलं. जपाननंही तसंच केलं आणि चीनची परवानगी घेण्यास नाकारलं. चीन तूर्त तरी दोन पायांत शेपटी घालून गुपचूप बसला, पण या कलहाचा

उद्रेक केव्हाही होऊ शकतो.

मग चीननं खुद्द अमेरिकेला छेडण्यास सुरुवात केली. अमेरिकेची हेरगिरी करणारी निशस्त्र विमानं चीनच्या किनाऱ्यापासून १००-२०० मैल दूर धावून चीनच्या लष्करी हालचालींवर व संकेतांवर लक्ष ठेवतात. त्यापासून बरीच माहिती मिळू शकते. प्रत्येक देशाचा भौगोलिक विस्तार किनाऱ्यापासून फक्त १२ मैल असतो असा आंतरराष्ट्रीय नियम आहे. त्यामुळे अमेरिकन विमानं या कायद्याचा आदर करत होती. पण या हेरगिरीचा चीनला राग आला व त्यानं आपली शस्त्रधारी लढाऊ विमानं अमेरिकेच्या हवाई जहाजासमीप पाठवून विरोध दर्शवला. दोन विमानातलं अंतर फक्त २० फूट होतं. ताशी शेकडो मैल वेगानं धावणाऱ्या विमानातलं हे द्वैत म्हणजे ती एकमेकांना खेटून मार्गक्रमण करत होती असं समजायला हरकत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय घटना घडण्याची शक्यता. असं अनेकदा झालं. यातून चीनला आपण अमेरिकेची बरोबरी करू शकतो हे जगाला दाखवायचं होतं. याचं अगदी अलिकडचं उदाहरण २२ ऑगस्ट २०१४ रोजी घडलं.

या शिरजोर वागणुकीचे दुसरे पैलूही नुकतेच उघडकीस आले. दक्षिण चिनी समुद्र आपला आहे असं चीननं जाहीर केलं. त्या समुद्राच्या तळात असलेलीत खनिजसंपत्ती आपली आहे हे या घोषणेत अभिप्रेत आहे. त्या समुद्रात फिलिपाईन्सपासून २०० व चीनपासून ६०० किलोमीटर दूर असलेला एक लहान बेटांचा समूह आहे. फिलिपाईन्स, बोर्निओ, व्हिएतनाम व मलेशिया या देशांनी तो भाग आपला आहे असं वारंवार जाहीर केलं. पण तिकडे दुर्लक्ष करून चीननं तिथे नवीन कृत्रिम मोठं बेट बांधण्यास सुरुवात केली असं फेब्रुवारी २०१५ मध्ये उघडकीस आलं. ते एवढं मोठं की त्यावर विमानासाठी धावपट्टी व हेलिकॉप्टरसाठी हेलिपॅडही आहेत. म्हणजे चीन तिथे आपली लष्करी छावणी उभारणार हे उघड आहे.

दरवेळी भारताच्या पंतप्रधानांनी अरुणाचलचा दौरा आखला की चिनी परराष्ट्र मंत्रालयाची पोपटपंची सुरू होते. तो भूप्रदेश वादग्रस्त असल्यामुळे भारताच्या मुख्य नेत्याला तिथे जाण्याचा अधिकार नाही या विधानाची पुनरावृत्ती केली जाते. यावेळी मोदी फेब्रुवारी २०१५ मध्ये तिथे गेले तेव्हा तेच पडघम वाजवण्यात आले. असा मनोवैज्ञानिक (Psychological) खेळ खेळण्यास चीन निपुण आहे. यावरून त्याच्या विस्तारगंडाची चांगली कल्पना येते.

ही चिनीवृत्ती लक्षात घेऊन आपण रणनीती आखणं आवश्यक आहे. सरहद्दीवरील तटबंदी सुदृढ केली पाहिजे. अजूनही अरुणाचलमध्ये व्यूहात्मक ठिकाणी पुरेसे रस्ते बांधले नाहीत. समित्या त्यांचा विचार करत आहे. हे समितीराज बाजूला सारून कृतिशील झाल्याशिवाय चीनला योग्य संदेश मिळणार नाही.

म्हणून आपला खरा शत्रू कोण हे ओळखून आपण पावलं उचलणं आवश्यक आहे.

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
2 Second Street, #2001,
Jersey City, NJ 07302, USA
latalabh@aol.com

ग्रंथाली

# पराकाष्ठा

**डॉ. अनंत लाभसेटवार**




"जेरी, अशी आश्चर्यचकित होऊ नकोस. या देशात मुलामुलीचा परिचय व प्रेम लग्नानंतर होत असलं तरी त्यांचा डिव्होर्स रेट आपल्यापेक्षा फार कमी आहे. म्हणून लग्नाच्या आधी सहजीवन जगल्यानं परिचय वाढतो. एकमेकांचे स्वभाव कळतात हे जे अमेरिकेत म्हणतात ते मला एक थोतांड वाटतं." माईक म्हणाला, "तुमच्या देशात खूप प्रगती होत आहे. तुम्ही प्रत्येक क्षेत्रात अमेरिकेचं अनुकरण करता. पण असं करताना तुम्ही आमच्या चुका करून नका म्हणजे झालं. इंडियामधे लग्नविधी हा पवित्र समजतात. ते मांगल्य अमेरिकेत राहिलेलं नाही. म्हणूनच अमेरिकेतील ४२% संतती लग्नबाह्य संबंधातून निर्माण होते. विभक्त कुटुंबव्यवस्थेमुळे अशा मुलात बेशिस्तीचं, गुन्हेगारीचं व कारावासात जाण्याचं प्रमाण वाढलेलं आहे. तुम्हा लोकांना लग्नाचं महत्त्व व त्याचं सामाजिक स्थान चांगलं कळतं. म्हणून तुम्ही अमेरिकेची घोडचूक करू नका." माईक म्हणाला.

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत २०० रु.**

# जयवंत चुनेकर म्हणजे मराठीची आस्था असलेला अभ्यासक

**प्रतिनिधी, बदलापूर**




**श्याम जोशी, चुनेकर, श्रीधर पाटील, सुदेश हिंगलासपूरकर, सु.रा. चुनेकर, रविप्रकाश कुलकर्णी, नीलेश गायकवाड, सुहास लिमये आणि चांगदेव काळे**

जयवंत चुनेकरांना मराठी भाषेची खरी आस्था होती. म्हणूनच त्यांनी भाषेच्या संवर्धनासाठी 'माय मराठी'सारख्या ग्रंथासाठी मोलाचे संशोधन केले, असे मत 'ग्रंथाली' या पुस्तक प्रकाशन संस्थेचे संचालक सुदेश हिंगलासपूरकर यांनी व्यक्त केले. ग्रंथसखा वाचनालय व व्यास क्रिएशन्सच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात मराठी भाषेचे अभ्यासक जयवंत चुनेकर यांच्या 'निवडक चुनेकर' या पुस्तकाच्या पहिल्या भागाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. दादरहून बदलापूरात स्थायिक झालेल्या जयवंत चुनेकर यांच्या १३ ऑगस्ट या प्रथम स्मृतीदिनानिमित्त १५ ऑगस्टला हा कार्यक्रम पाटील मंगल कार्यालय येथे पार पडला. यावेळी व्यास क्रिएशन्स यांनी प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन हिंगलासपूरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रसिद्ध कोशकार सु.रा. चुनेकर, रविप्रकाश कुलकर्णी, मराठी भाषेचे अभ्यासक सुहास लिमये, व्यास क्रिएशन्सचे नीलेश गायकवाड, ग्रंथसखा वाचनालयाचे श्याम जोशी, चांगदेव काळे व चुनेकर कुटुंबीय उपस्थित होते.

हिंगलासपूरकर पुढे म्हणाले की, गेली ३५ वर्षे चुनेकरांशी माझा स्नेह होता. मराठी भाषेची आस्था असणारे चुनेकर यांच्याशी अनेक विषयांवर चर्चा होत असे. ग्रंथालीची संकल्पना असलेल्या पाच खंडांच्या संकल्पना कोषांचे संपादन करण्याची वेळ आली तेव्हा या खंडांच्या संपादनाचे शिवधनुष्य माझ्या विनंतीवरून चुनेकर यांनी लिलया पेलले. त्यानंतरही त्यांनी अनेक पुस्तकांच्या संपादनात मला मदत केली, जी कदापि न विसरण्यासारखी आहे.

चुनेकरांसारख्या माझ्या जवळच्या मित्राने केलेल्या लेखनाचे संपादन करण्याचे मला भाग्य लाभल्याने मी धन्य झालो असून त्यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या पुस्तकाचे संपादन व प्रकाशन केल्याने त्यांचे वाङ्मयीन श्राद्ध केल्यासारखेच आहे. अशा भावना लेखक रविप्रकाश कुलकर्णी यांनी यावेळी व्यक्त केल्या.

**माय मराठीच्या आठवणी**


मुंबई विद्यापीठाने परप्रांतीय व अन्य भाषीय विद्यार्थ्यांसाठी मराठी शिकणे सोपे जावे, या हेतूने माय मराठी या मराठी भाषेच्या अभ्यासक्रमावर आधारित पुस्तकाची निर्मिती केली. या पुस्तकासाठीचे संशोधन हे जयवंत चुनेकर व मी केले. हे माझे भाग्य आहे. असे मराठी भाषेचे अभ्यासक व अमीर खानला मराठीचे धडे देणारे शिक्षक सुहास लिमये यांनी सांगितले. या माय मराठीच्या प्रकाशन सोहळ्याच्या आदल्या रात्रीच चुनेकर निवर्तले. त्यावेळी या माय मराठी पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याची जबाबदारी असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाच्या प्रमुख वि. भा. सुराणा यांनी चुनेकर गेल्याचे रात्री ऐकून हंबरडा फोडून आपल्या भावनांना वाट करून दिल्याची भावस्पर्शी आठवण लिमये यांनी यावेळी सांगितली.

## ग्रंथपान

## देशभरातील प्रार्थनास्थळांचा समृद्ध खजिना

भारत हा सर्वार्थाने समृद्ध देश आहे. त्याला नैसर्गिक सौंदर्याचं, अमाप खनिज संपत्तीचं वरदान जसं लाभलंय तसंच वैविध्यपूर्ण रुढी-परंपरांचं, असंख्य धर्म- जाती- भाषा यांचंही वरदान लाभलंय. आपल्या देशभर विखुरलेली सर्वच धर्मांची प्रार्थनास्थळं ही त्याची जिती-जागती प्रतीकं आहेत; आणि त्यांना अभ्यासपूर्ण रीतीने एकत्र गुंफण्याचं काम सौ. उमा हर्डीकर लिखित 'तीर्थाटन' या मैत्रेय प्रकाशनाच्या पुस्तकाने केलं आहे.

आपण पर्यटक म्हणून वेगवेगळ्या प्रांतात जातो तेव्हा तिथल्या निसर्गरम्य पर्यटन स्थळांबरोबर, तिथल्या बगिच्यांबरोबरच तिथली धार्मिक श्रद्धास्थानंही आवर्जून पाहतो. पण त्या प्रत्येक धर्मस्थळाची आपल्याला पूर्ण माहिती असतेच असं नाही. किंबहुना नसतेच. त्यामुळे मग अनेकदा ते स्थळ पाहणे हा निव्वळ उपचार होऊन बसतो. तसं होऊ नये, तिथे जाण्यापूर्वीच त्या-त्या स्थळाची, अगदी त्यामागच्या कथेपासून ते वास्तूवैशिष्ट्यापर्यंत सगळी माहिती आपल्याला असावी व त्यायोगे आपल्याला त्या-त्या ठिकाणचा परिपूर्ण आस्वाद घेता यावा या उद्देशाने लेखिकेने हे पुस्तक लिहिलेले असल्याचे जाणवते.



लेखिकेनेच मनोगतात म्हटल्याप्रमाणे तिने देशभर खूप भ्रमंती केली आहे. 'ट्रेकिंगच्या काळात अनेक मंदिरांनी आसरा दिला तर अन्य अनेक धार्मिक स्थळांनी त्यांच्या शिल्पसौंदर्याने, भारलेल्या वातावरणाने वेगळीच अनुभूती दिली. त्या वास्तुंचं ऋण या पुस्तकाच्या रूपाने फेडायचा मी प्रयत्न करते आहे.' असं लेखिकेने म्हटलंय. ते ऋण फेडण्यात लेखिका पूर्णांशाने यशस्वी झाली आहे असं पुस्तक वाचल्यावर लक्षात येतं.

या धार्मिक स्थळांची माहिती देताना पुस्तकात मंदिरांची विभागवार वर्गवारी केलेली दिसते. ती करताना भारताचे पूर्व- पश्चिम- उत्तर- दक्षिण व ईशान्य भारत असे ५ भाग करून त्या-त्या विभागात येणाऱ्या मंदिरांची राज्यवार माहिती देण्यात आली आहे. पुस्तकाची जवळ-जवळ २०० पानं तर मंदिरांचीच माहिती आहे. त्या व्यतिरिक्त भारतात हिंदू धर्माच्या बरोबरीने सुखेनैव नांदत आलेल्या जैन, बौद्ध, शीख, इस्लाम, ज्यू, ख्रिस्ती व पारशी या अन्य धर्मांच्या प्रमुख धर्मस्थळांची माहितीही पुस्तकात वाचायला मिळते. ही सारीच माहिती विस्मयचकित करणारी आहे. भारताच्या या समृद्ध खजिन्याची जाणीवही मन समृद्ध करणारी, अभिमानाने उर भरून येईल अशी आहे; आणि त्याबरोबर अतृप्तीची आस लावणारीही आहे. कारण भारतात नुसती मंदिरंच घेतली तर ती इतकी अफाट आहेत की त्यावर एखादा कोष तयार व्हावा. लेखिकेने पुढील काळात त्यावर काम करायला हरकत नाही.

**देशभरातील प्रार्थनास्थळांचा समृद्ध खजिना**
**लेखक- उमा हर्डीकर**
**मैत्रेय प्रकाशन**
**पृष्ठे - २८८, मूल्य - ३०० रु.**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत २४० रु.**

**शमिन भोसले**

स्फोटक विषयावरील लक्षवेधी कादंबरी

## लोकशाहीची ऐशी तैशी

'राजकारणाचं गुन्हेगारीकरण' हा सध्याचा सर्वात स्फोटक विषय. सगळ्यांनाच सलणारा, अस्वस्थ करणारा पण हाताळायला अत्यंत कठीण असा हा विषय. त्याची कारणं अनेक. त्याचे कंगोरे अनेक. पण तो विभूती नारायण राय या ज्येष्ठ लेखकानी अत्यंत संयतपणे, जबाबदारीने पण त्याच वेळी त्याची दाहकता मात्र वाचकांपर्यंत पोहोचेल याची पुरेपूर खबरदारी घेत 'लोकशाहीची ऐशी तैशी' या कादंबरीत मांडलेला दिसतो. चंद्रकांत भोंजाळ यांनी त्याचा तितकाच समर्थ अनुवाद केला असून 'मैत्रेय प्रकाशना'ने तो अतिशय देखण्या रूपात प्रकाशित केला आहे.

राजकारण हे देशसेवेसाठी असतं ही संकल्पना कधीच मागे पडलीय. राजकारण हे सत्तेसाठीचं, झटपट पैसे कमावण्यासाठीचं साधन आहे या भावनेने या क्षेत्रात येणाऱ्यांचीच संख्या जास्त आहे. त्यामुळे राजकारण प्रवेशाची भावनाच ही असल्याने मग मार्गाचा विधीनिषेध राहणं हे अशक्यच. त्यातूनच मग गुन्हेगारांशी हातमिळवणी करणं, सत्ता अबाधित राखण्यासाठी गुन्हेगारी मार्गांचा अवलंब करणं, विरोधकांचा या गुन्हेगारांच्या मदतीने काटा काढणं हे सगळं ओघाने येतं. राजकारण्यांसाठी हे सगळं करता-करता मग त्या गुन्हेगारांनाही सत्तेचं सामर्थ्य लक्षात येतं. संभावितांचं जिणं जगण्यासाठी राजकारणाचा मार्ग सोयीचा वाटू लागतो... यात बळी जातो तो लोकशाहीचा! हेच सारं भेदक वास्तव 'लोकशाहीची ऐशी तैशी' ही कादंबरी आपल्या डोळ्यांपुढे उभं करते.



ज्याने 'डोंगरी टू दुबई', 'शांताराम'सारखी पुस्तकं वाचली आहेत त्याच्यासाठी कदाचित हे जग नवीन नसेल. पण आम वाचकासाठी निश्चितच हे नवीन आहे; आणि शेवटी गुन्हेगारी जग तेच असलं तरी प्रत्येक लेखकानुसार, लेखन प्रकारानुसार त्याची मांडणी वेगळी असते. विभूती नारायण राय यांनी कादंबरीचा फॉर्म निवडला असल्याने त्यांनी या विषयाला भावनात्मकतेची डूब देऊन विषय अतिशय उत्कंठावर्धक रीतीने मांडला आहे. हा भेदक विषय त्याच्या पूर्ण भेदकतेसह वाचकांपर्यंत, त्यांना भिडेल अशा रीतीने पोहोचविण्यात ते तसंच अनुवादक चंद्रकांत भोंजाळ हे यशस्वी झाले आहेत हे निश्चित.

**लोकशाहीची ऐशी तैशी**
**लेखक- विभूती नारायण राय**
**अनुवादक - चंद्रकांत भोंजाळ**
**मैत्रेय प्रकाशन**
**पृष्ठे- १५२, मूल्य - १६० रु.**
**'ग्रंथाली' येथे सवलतीत १३० रु.**

**आर्या येतकर**

# ग्रंथपान




'ग्राफिक डिझाइनचं गारूड' या त्यांच्या नव्या पुस्तकात दृश्यकलेत महत्त्वाचं मानल्या गेलेल्या ग्राफिक डिझाइन या विषयाबद्दलचं अभ्यासपूर्ण सखोल विवेचन आहे. ग्राफिक डिझाइन ही कला व्यवसायाची एक गरज आहेच, शिवाय ते डिझायनर्ससाठी एक उत्पन्नाचं साधनही आहे. उद्याच्या डिझायनर्ससाठी-त्यांच्या सर्जनाला वाव देणाऱ्या नि त्यांच्या पुढे नवी आव्हानं उभी करणाऱ्या या विषयावर मराठीत तुलनेने अत्यल्पच लिहिले गेले आहे.

वेगवेगळ्या कलांच्या शास्त्रावरची विविध पुस्तकं वाचताना पुन्हा पुन्हा जाणवत गेलेलं ग्राफिक डिझाईनचं स्थान, इतर क्षेत्रांशी असणारा त्याचा संबंध या पुस्तकात यशोदा भागवतांनी उद्धृत केला आहे. संस्कृती, परंपरा, कलाकौशल्य यांचा वारसा आपल्याला एकीकडे लाभला असताना पाश्चिमात्य डिझाईनचाही आपल्यावर प्रभाव अधोरेखित होतो आहे. या पार्श्वभूमीवर ग्राफिक डिझाइनच्या मूलतत्त्वांची, संकल्पनांची, रचनातंत्राची कलेच्या चौकटीपलीकडे जाऊन या पुस्तकाद्वारे करून दिलेली ही व्यापक ओळख ! जाणकारांना ग्राफिक डिझाईनकडे पाहण्याची वेगळी दृष्टी देता देता, डिझायनर्सना अधिक आत्मविश्वासाने डिझाइन साकार करण्यासाठी दिशाही देणारी...

मूल्य ५०० रु. ग्रंथाली येथे सवलतीत ३०० रु.




पंचवीस वर्ष स्वत:ची जाहिरात एजन्सी यशस्वीरीत्या चालवणाऱ्या आणि छायाचित्रण कलेबद्दल मार्मिक आणि आस्वादक विवेचन करणाऱ्या 'मौज प्रकाशन गृहा' ने प्रकाशित केलेल्या 'बोलका कॅमेरा' या पुस्तकाच्या लेखिका यशोद भागवत यांचं हे सहावं पुस्तक.

छायाचित्रणकला आणि जाहिरातकला या परस्परसंवादी कलाशिवाय ज्योतिष शास्त्रातही गती लाभलेल्या यशोदा भागवत यांनी व्यवसाय म्हणून 'जाहिरातीचं जग' जवळ केलं. 'जाहिरात' हा आजच्या जागतिकी करणाच्या युगाचा यशस्वी मंत्र, जितका व्यावहारिक, व्यावसायिक तितकीच त्यामागची सर्जनशीलताही चकित करणारी. योजना आणि कल्पकता या बळांवर जाहिरातींचं हे विश्व दिवसागणिक समृद्ध आणि अधिकाधिक व्यापक बनत प्रतिष्ठा पावत आहे. जाहिरातक्षेत्रात वावरताना यशोदा भागवत यांना विविधरंगी अनुभव आले आणि त्यांतून त्यांच्या मनात या क्षेत्राचा एक प्रभावशाली माध्यम या नात्याने विचार सुरू झाला. या विचारातून साकारलं हे 'जाहिरातीचं जग'.

यशोदा भागवत यांच्या साध्या, सुलभ आणि ओघवत्या, जिवंत शैलीमुळे एखाद्या रंजक नि प्रभावी जाहिरातीसारखंच ते कुणाही वाचकाच्या मनाचा चटकन कब्जा घेतं.

मूल्य २०० रु. ग्रंथाली येथे सवलतीत १६० रु.


लोकवाङ्मय प्रकाशन

# ग्रंथपान

सतीश काळसेकर हे आपणा सर्वांना कवी म्हणून परिचित आहेतच. 'वाचणाऱ्याची रोजनिशी' या त्यांच्या साहित्य अकादमी पुरस्कृत ग्रंथामुळे एक चांगले वाचक म्हणूनही ते आपल्या ओळखीचे आहेत. 'आपले वाङ्मय वृत्त' या मासिकातून हे सदर ते आजही नियमितपणे लिहीत आहेत. त्यांचा सांस्कृतिक चळवळीतला वावर अनेक नव्या लिहिणाऱ्यांना उमेद आणि आधार देणारा आहे. मित्र, पुस्तकं, संगीत, कविता या अन्न–पाण्याइतक्याच महत्त्वाच्या बाबींत त्यांच्यासाठी आणखी एक न टाळता येणारी बाब आहे ती म्हणजे भटकंती. त्यांच्या या भटकंतीला कोणताही प्रदेश वर्ज्य नाही. प्रवासासाठी अमुकच साधन हवे आणि तमुकच सोयी–सुविधा हव्यात असा आग्रह नाही. जात, धर्म, भाषा, पंथ ही बंधनं त्यांच्या प्रवासात कधीही आडवी आली नाहीत. त्यांच्या ठायी असलेल्या मानवतावादी दृष्टिकोनामुळेच त्यांना हे शक्य झाले असावे. आणि डाव्या विचारांवर प्रखर निष्ठा असल्यामुळे प्रवासासाठी सर्वसामान्य जी साधनं वापरतात त्याच साधनांतून प्रवास करताना त्यांच्या कपाळावर कधी आठ्या आल्या नसाव्यात. जवळपास पन्नास वर्षांहून अधिक काळ त्यांनी आपल्या देशातल्या निरनिराळ्या भागांत भटकंती केली आहे. कधी मित्र तर कधी कुटुंबासोबत. त्यांच्या या भटकंतीवरले लेख त्या त्या वेळी वर्तमानपत्रं आणि नियतकालिकांतून प्रकाशित होत होते. आता 'पायपीट' या संग्रहात ते सर्व लेखन एकत्रित आले आहे. त्यासोबतच काही अप्रकाशित लेखनही परिशिष्टात समाविष्ट करण्यात आलं आहे.

**पायपीट**

सतीश काळसेकर




सतीश काळसेकर यांनी माथेरान, महाबळेश्वर या भागांपासून थेट दक्षिणेकडल्या भागांत केलेल्या भटकंतीवरले लेख या संग्रहात आहेत. पण बहुतांश लेख हे हिमालयातल्या प्रवासावरले आहेत. एखाद्या सच्च्या धार्मिक यात्रेकरूला जशी तीर्थस्थळांची ओढ असते तशी काळसेकरांना हिमालयाची ओढ आहे. किंबहुना हिमालय त्यांना साद घालत असतो असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. आपल्या या हिमालयातल्या प्रवासातील अनुभवाविषयी ते लिहितात, ''तुम्ही एकदा हिमालयाच्या प्रेमात पडलात की नंतर ते प्रेम तुम्हाला तुमच्या शहरात, गावात फार काळ स्वस्थ बसू देत नाही. हिमालयातल्या पायपिटीची ही सवय किंवा व्यसन नंतर तुम्हाला त्या भटकंतीचे नाना मार्गही दाखवते.'' काळसेकरांनी या नाना मार्गांवरून हिमालयात भटकंती केली आहे. अनेक भागांना एकापेक्षा अधिक वेळा भेटी दिल्या आहेत तर ज्या भागांत त्यांना एकदाही जाता आलेलं नाही अशा न पाहिलेल्या स्थानांना भेट देण्यासाठी ते पुन्हा प्रवासाला निघतात. असं प्रत्येक प्रवासात काही ना काही राहून जातं आणि त्यांना प्रवासाचा पुढचा बेत आखण्यासाठीचं निमित्त आपसूकच गवसत जातं. अनेक वेळा ते प्रवास करताना कर्जबाजारीही झाले आहेत. अगदी विम्याच्या पॉलिस्या गहाण टाकूनही त्यांनी प्रवास केला आहे. हिमालयाची त्यांना इतकी ओढ वाटण्याचं कारण काय असावं? हे समजून घेण्यासाठी मुळात त्यांना प्रवासच का करावासा वाटतो हे पाहणं महत्त्वाचं आहे. आपण का भटकतो याविषयी ते लिहितात, की ''भटकता भटकता समज वाढते. ज्ञानात भर पडते. कुतूहल शमतं; हे सगळं आलंच, पण मला सगळ्यात महत्त्वाचं वाटतं ते म्हणजे आपला समजूतदारपणा वाढतो. माणसामाणसांतल्या संबंधाचा गुंतागुंतीचा गोफ समजून घेता येतो. सोशिकपणा वाढतो. खरं गरजेचं काय आणि केवळ मिरवायचे काय याचा थांग लागतो.'' तेव्हा, समजून घेण्याच्या मिषानं जो भटकतो त्याला एक–दोन प्रवास पुरे पडणारे नसतातच आणि ठरलेल्या प्रदेशांतच प्रवास करणंही त्याला रुचणारं नसतं.

सतीश काळसेकर यांनी आपल्या सर्वच लेखांतून माणूस आणि निसर्ग यांविषयी आत्मीयतेनं लिहिलं आहे. निसर्गाच्या सान्निध्यात वावरताना आपण आपल्या शहरी सवयींना मुरड घालायला हवी असं त्यांना वाटतं. त्यामुळे निसर्गाचा खऱ्या अर्थानं आस्वाद तर घेता येतोच, शिवाय त्याचं सौंदर्य आणि पावित्र्यही अबाधित ठेवता येतं. या संदर्भात काळसेकरांनी आपल्या लेखांत प्रवासाविषयी ज्या काही सूचना दिलेल्या आहेत त्या फारच महत्त्वपूर्ण आहेत. तसंच त्यांनी प्रसंगोपात आपल्या लेखांत अनेक पुस्तकांचेही संदर्भ दिले आहेत. राहुल सांकृत्यायन, धर्मानंद कोसंबी, विनोबा भावे या जातिवंत भटक्यांनी लिहिलेली पुस्तकं तसंच महाभारतापासून थेट आताच्या काळातील रस्किन बाँड यांची पुस्तकं असे अनेक संदर्भग्रंथ त्यांच्या लेखांत सापडतात.

प्रवास करताना आलेल्या सुखद अनुभवांविषयी तर त्यांनी लिहिलं आहेच, पण फसवल्या जाण्याच्या घटनाही त्यांनी सविस्तर आणि मोकळेपणानं सांगितल्या आहेत. अंदमानच्या प्रवासात बोटीतील सहप्रवाशांचा चांगुलपणा, बिकानेरच्या वाळवंटातील रात्र, हिमालयातल्या हरमिश चौधरीशी झालेली ओळख अशा अनेक चांगल्या अनुभवांविषयी लिहिताना त्यांनी कोठेही गमजा मारण्याचा आव आणलेला नाही. तसंच माथेरान आणि आसाममधील माजोली बेटावर आलेल्या वाईट अनुभवाविषयी लिहिताना कुठलाही आडपडदा ठेवलेला नाही. किंबहुना आपली समज वाढण्यासाठी असे अनुभव आवश्यकच असतात, असं त्यांना वाटतं. फसवल्या जाणाऱ्या घटना घडल्यानंतरही माणसांवर विश्वास ठेवण्याच्या त्यांच्या वृत्तीत काहीही फरक पडलेला नाही. त्यांचे हे प्रवासातले बरे–वाईट अनुभव वाचक म्हणून आपल्यालाही समृद्ध करून जातात. परिशिष्टात समाविष्ट केलेले लेख हे त्यांच्या 'डायरी आणि आठवणी'सारखेच आहेत. सगळ्या अनुभवांविषयी मोकळ्याढाकळ्या वृत्तीनं लिहिलेले हे लेख अत्यंत वाचनीय झालेले आहेत. हिंदीत अशा तऱ्हेनं आपल्या समकालीनांविषयी आणि इतर अनुभवांविषयी कसलाही आडपडदा न ठेवता लिहिण्याची चांगली परंपरा आहे. काळसेकरांनीही आपल्या लघुनियतकालिकांच्या चळवळीच्या काळातील अनुभवांविषयी अजून लिहायला हवे. त्यांनी परदेशातही भटकंती केलेली आहे, तेही अनुभव पुढे–मागे ग्रंथबद्ध व्हायला हवेत. तूर्तास त्यांनी देशांतर्गत केलेल्या 'पायपिटी'च्या अनुभवातून जाणं वाचक म्हणून आपल्यासाठी आनंददायी आणि प्रगल्भ करणारं आहे.


**– विकास पालवे**


**पृष्ठ २३६, मूल्य २५० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रु.**

रोहन प्रकाशन

# ग्रंथपान

स्त्रीजीवनाचा अभ्यास करताना भारतीय समाजातील पुरुषी मनोवृत्तीच्या अनेक खुणा, पितृप्रधानतेचे अनेक पैलू सातत्यानं पुढे येतात आणि त्यातील केंद्र बहुधा पुरुषांनी केलेले अत्याचार, स्त्रीचं शोषण हेच असतं. 'ती'चं अवकाश या पुस्तकात मात्र बाराजणींच्या अशा बारा कहाण्या आहेत, ज्यातून स्त्रियांनी स्वत:चा वेगळा मार्ग तर शोधला आहेच, शिवाय इतरांना विचारप्रवृत्त करणाऱ्या हकीगतीही सांगितल्या आहेत. आपापल्या कुटुंबातील नातेसंबंधांचा शोध घेताना त्यांनी; विशेषत: आपल्या आधीच्या तीन पिढ्यांमधील स्त्रियांनी आपल्या अस्तित्वासाठी केलेला संघर्ष आणि स्वत:साठी मिळवलेला पैस यांचं चित्रण केलं आहे. जवळजवळ एका शतकातील स्त्रियांचं कुटुंबातील स्थान, त्यांची सामाजिक स्थिती यांचं वास्तव प्रतिबिंब यात दिसतं. वैयक्तिक अनुभवांवर आधारित या कथनांमध्ये सामाजिक इतिहासाबरोबर भावनिक बंधही गुंतलेला आहे व त्यामुळे त्या कहाण्या अधिक रोचक व हृद्य झाल्या आहेत. आजी,



आई, आपण स्वत: व आपल्या मुली यांच्या नात्यांमधील हा गोफ सामाजिक इतिहासाचं एक अस्सल साधन तर आहेच, शिवाय स्त्रीअभ्यासाचा एक लक्षणीय पैलू म्हणूनही त्याचं महत्त्व आहे.

या बाराजणींचं कर्तृत्व कोणत्या भक्कम आधारावर उभं आहे व त्यांच्या स्वातंत्र्यासाठी कोणती किंमत दिली गेली आहे याचं सम्यक् दर्शन या कथनांद्वारे घडतं. या साऱ्या कहाण्या यशस्वितेच्याच आहेत असं नाही, तर आईचा वा आजीचा अयशस्वी संघर्षही पुढच्यांना प्रेरक ठरणारा आहे. वेगवेगळ्या प्रदेशांतून, भिन्न आर्थिक स्तरांतून व भिन्न सांस्कृतिक वातावरणातून आलेल्या या लेखिका स्वानुभवकथनाबरोबरच सांस्कृतिक बदलांचंही दर्शन घडवतात. स्त्रीजीवनाच्या, स्त्रीसमस्यांच्या अभ्यासकांना या पुस्तकानं नवी सामग्री पुरवली आहे.

**'ती'चं अवकाश...**

रुढी–परंपरांची चौकट मोडून स्वत:चं क्षितीज शोधणाऱ्या तीन पिढ्या


**संपादन : लीला गुलाटी, जसोधरा बागची**

**अनुवाद : मीना वैशंपायन**

**पृष्ठे ३१२, मूल्य २५० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत २०० रु.**

'ते' आणि मी हे शकुंतला पुंडे यांचं एक अनोखा आविष्कार असणारं आगळंवेगळं ललित पुस्तक. या पुस्तकातल्या 'ते'शी लेखिकेचं एक भावनिक नातं तिच्या नकळत निर्माण होत गेलेलं आहे. ते नातं



इतकं उत्कट, मधुर अन् जिवाभावाचं झालेलं आहे की, कोकणातला मुक्त, घनदाट, विस्तीर्ण निसर्ग असो वा शहरातल्या घराच्या गॅलरीतला बंदिस्त मंच किंवा गॅलरीबाहेरचा 'हिरवा रंगमंच' असो, हे नातं जणू तिच्या जगण्याचाच एक धागा होऊन जातं. 'ते' आणि लेखिका यांचं जगणं एकमेकांत गुंतलेलं, एकमेकांशी बांधलेलं, जणू सलग घट्ट वीण असलेल्या रेशमी वस्त्रासारखंच कसं होऊन जातं याचं एक मनोज्ञ दर्शन या पुस्तकात सर्वत्र, सतत घडत राहतं.

आपल्या बालपणापासून आजपर्यंत 'ते'शी अलगद जुळत गेलेले भावबंध लेखिकेनं सरळसाध्या तरीही वेधक अशा शैलीत मांडलेले आहेत. त्यामुळे वाचकही स्वत:च्या नकळत लेखिकेच्या आनंदविश्वाचा वाटेकरी होतो. 'ते' आणि मी हे पुस्तक वाचणं म्हणजे निखळ आनंदाचा अनुभव आहे अन् निखळ अनुभवाचा आनंदही आहे!

**'ते' आणि मी**

**शकुंतला पुंडे**

**पृष्ठे १९६, मूल्य २०० रु. 'ग्रंथाली' येथे सवलतीत १६० रु.**


पद्मगंधा प्रकाशन

# ग्रंथपान

## डॉ. ढेरे यांच्या त्रिखंडात्मक ग्रंथाचा नवा प्रकल्प

गेली पासष्ट वर्षे सातत्याने चालू असलेला डॉ. रा. चिं. ढेरे यांचा ज्ञानयज्ञ अजूनही धगधगत आहे. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, सरदार आबासाहेब मुजुमदार यांच्यासारख्या ज्ञानक्षेत्रातील मातब्बर व्यक्तींच्या साक्षीने आणि आशीर्वादाने सुरू केलेला त्यांचा हा प्रवास हा एखाद्या व्रतस्थ संशोधकाचा आहे. अण्णा (डॉ. रा. चिं. ढेरे) एकदा गप्पांच्या ओघात म्हणाले होते की, 'संशोधक जी सामग्री गोळा करतो, त्यापैकी थोडीच ग्रंथरूपात येते, बहुतांशी तशीच राहते.' त्यांच्या ह्या म्हणण्याचा अर्थ आता त्यांच्याच संदर्भात लक्षात येत आहे. आपल्या आयुष्यभराच्या संशोधनप्रवासात त्यांनी अनेक हस्तलिखिते, दुर्मीळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ जमा केले. प्रवास केला. त्यांतून त्यांचा व्यक्तिगत ग्रंथसंग्रह पन्नास हजारांच्या जवळपास झाला आहे. संशोधनासाठी जी हस्तलिखिते वा साधनसामग्री गोळा केली, त्यातून बरेच संशोधनपर ग्रंथ तयार होऊ शकतात. त्या अपेक्षेने ही सामग्री त्यांनी जपून ठेवली असणार, पण आता प्रकृतिस्वास्थ्याअभावी ते भविष्यात फार शक्य होईल असे वाटत नाही. ह्या पार्श्वभूमीवर त्यांनी पूर्वी लिहिलेल्या काही लेखांचे पुनर्व्यवस्थापन करून तीन नवीन पुस्तके डॉ. ढेरे यांच्या पंच्याऐंशीव्या वाढदिवशी 'पद्मगंधा प्रकाशना'ने प्रकाशित केली आहेत.







या तीन पुस्तकांपैकी 'श्रीपर्वताच्या छायेत' ह्या ग्रंथात शिवोपासनेविषयीचे लेखन एकत्र गठित केले आहे. महाराष्ट्राच्या भूमीवर शिवोपासना प्राचीन काळापासून गाजत राहिली आहे आणि तिचा मूलस्रोत आंध्रातला श्रीपर्वतच आहे. नागार्जुनाची जन्मभूमी विदर्भ; पण कर्मभूमी श्रीशैल पर्वतच होती. महानुभावपंथाचे श्रीचक्रधर यांनी श्रीपर्वतावर एकांतात एक तप काढले. श्रीचक्रधर, श्रीज्ञानदेव आणि श्रीमुकुंदराज या तिघांच्याही कार्य व विचारविश्वाशी श्रीपर्वताचा थेट संबंध असणे, याचा संबंध महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीशी आहे.

ह्या त्रिखंडात्मक प्रकल्पातील दुसरा ग्रंथ आहे – 'त्रिविधा'. ह्यात प्राचीन मराठी साहित्याच्या तीन साहित्यधारांवर प्रकाश टाकला आहे. प्राचीन मराठी साहित्यावर विविध धर्मसंप्रदायांचा प्रभाव होता. ह्या संप्रदायात अनुयायी होते तसेच ग्रंथकारही. त्यांपैकी ज्यांचा प्रभाव होता, त्या गाणपत्य आणि जैन ग्रंथकारांनी प्राचीन मराठी वाङ्मयात मौलिक भर घालून ते समृद्ध केले. ह्या ग्रंथकारांची आणि ग्रंथकृतींची चर्चा करणारे, त्यांचा मागोवा घेणारे लेख ह्या ग्रंथात समाविष्ट झाले आहेत. मराठी आणि महाराष्ट्राची आदिकालीन वाङ्मयीन समृद्धी यातून समजण्यास मदत होते. ह्या संस्कृतीच्या प्रारंभकाळापासून आजपर्यंत चालू असलेल्या गाणपत्य साहित्यनिर्मितीकडे दुर्लक्ष करता येत नाही. त्या गाणपत्य साहित्यनिर्मितीप्रमाणेच जैन साहित्याकडेही दुर्लक्ष करता येत नाही. ह्या दोन्ही परंपरांतील ग्रंथकारांचा आणि ग्रंथांचा ह्या पुस्तकात मागोवा घेतला आहे.

तिसरे पुस्तक आहे – 'श्रीनामदेव, जनी आणि नागरी'. प्राचीन मराठी वाङ्मयाप्रमाणेच संतसाहित्य हा डॉ. ढेरे यांच्या आत्मीय जिव्हाळ्याचा विषय आहे. हे लेखन किंवा त्यासंबंधीची टिपणे त्यांनी आपल्या प्रारंभीच्या संशोधनकाळातच केलेली आहेत. हे पुस्तक नव्या संशोधकांनाही मार्गदर्शक ठरेल; कारण ह्या पुस्तकाच्या आधारे मौलिक साहित्याच्या अपपाठांची प्रवृत्ती समजून घेणे, मूळ ग्रंथलेखकाचा आशयव्यूह समजून घेणे, विवेचनाच्या संदर्भांना समजून अर्थनिश्चिती करणे आणि देशी भाषेची उत्तम जाण असणे या गोष्टींचा वस्तुपाठ ह्या लेखांतून मिळतो. राजकीय व सामाजिक अस्थिरतेच्या काळात वारकरी संप्रदायाची पताका पंजाबात पोचविणाऱ्या आणि वारकरी कीर्तनपरंपरेचे प्रवर्तक असलेल्या नामदेवाचे ऋण महाराष्ट्राची भक्ती–परंपरा व महाराष्ट्र कधीच विसरू शकत नाही.

ह्या पुस्तकाचे आणखी महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे नागी किंवा नागरीचे आठ अभंग. नागरी ही नामदेवांची पुतणी. डॉ. ढेरे यांनी कष्टपूर्वक मिळविलेल्या एका बाडातील हे अभंग म्हणजे केवळ नागरीची आत्मकथा एवढेच त्याचे वैशिष्ट्य नाही तर ते पहिले मराठी स्त्रीचे आत्मकथन आहे. मूळ अभंगाच्या संहितेसह त्यांचे नागरीसंबंधीचे लेखनही येथे समाविष्ट केले आहे.

नामदेवांची दासी म्हणून जनीची ओळख आहे. तिचे लौकिक आणि वाङ्मयीन चरित्र ह्या पुस्तकात दिले आहे.

व्यासंग आणि संशोधनाच्या सतत नव्या दिशा शोधण्याची वृत्ती, यांमुळे डॉ. ढेरे यांनी मोठी ग्रंथनिर्मिती केली आहे. गेल्या २० वर्षांत 'पद्मगंधा प्रकाशना'ने डॉ. ढेरे यांचे १८ ग्रंथ प्रकाशित केले. ते सर्व ग्रंथ आज उपलब्ध आहेत. डॉ. ढेरे यांना शतायुषी होण्यासाठी शुभेच्छा!

**१. श्रीपर्वताच्या छायेत**
**किंमत : ३१० रुपये**
**पृष्ठसंख्या : ३००**

**२. त्रिविधा**
**किंमत : २०० रुपये**
**पृष्ठसंख्या : १८४**

**३. श्रीनामदेव, जनी आणि नागरी**
**किंमत : १३० रुपये**
**पृष्ठसंख्या : १२४**

**तीन पुस्तके 'ग्रंथाली' येथे सवलतीत ५०० रु.**

# 'ग्रंथाली'ची नवी प्रकाशने




## आनंदयात्री

**मोहन गोरे**

कष्टातून कळसाकडं कसं जाता येतं, ते या कहाणीतून उलगडत जातं. आयुष्याचा आलेख अधोरेखित करणारं हे लेखन सहृदयतेनं सुगंधित झालेलं आहे. आयुष्यातली छोटी छोटी पर्व पर्वणीच्या पायथ्यापासून उंच शिखरापर्यंत नेऊन सोडतात. त्याचाही हा जागतिक नकाशा आहे. बारीक-सारीक गोष्टीतूनही मोठमोठ्या आकलनाची इंद्रधनुष्यं उभी राहतात. सूर्योदयाचं सोनं करून दाखवणारा हा संसार सर्वार्थानं समाधानी आहे. गरिबीपासून गौरवापर्यंतचा हा प्रवास कमालीचा करुणामय आणि कमालीचा कणखर आहे. हे आत्मचरित्र नाही आणि आत्मकथनही नाही; आहे ते फक्त आत्मचिंतन! अडचणीतून आनंदाकडं घेऊन जाणाऱ्या संवेदनांचा हा दृष्टांत आहे!

**– फ.मुं. शिंदे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**





## प्रपंचाचे ज्ञान तेच विज्ञान

**डॉ. रवीन थत्ते**

इतके सविस्तर विवेचन वाचून वाचकांना असेही वाटेल, की ह्या मंडळींत एकमत कमी आणि वाद-प्रतिवाद अधिक होते की काय? पण वस्तुस्थिती तशी अजिबात नव्हती. ह्या सर्व विचारांच्या आदानप्रदान प्रक्रियेतून आपली मते संस्कारित होतात, हा आमच्या दृष्टीने सर्वात मोठा फायदा आहे. स्वतःच्या मतांवर ठाम असतानाही विरुद्ध मते तिथेच नोंदवू देणे, असा सहलेखनाचा अभूतपूर्व प्रकार शक्य झाला, हा डॉक्टरांच्या मोठेपणाचा एक दाखला आहे. हा मोठेपणा त्यांच्याठायी रुजलेल्या ज्ञानेश्वरप्रेमाचे द्योतकच म्हणावे लागेल! वाङ्मयदृष्ट्या मराठीभाषेचा मानदंड ठरलेली ज्ञानेश्वरी, तत्त्वज्ञानदृष्ट्या वारकरी संप्रदायास कालातीत जीवनमूल्यांचा पाया घालून देणारा ग्रंथ, ज्ञानेश्वरांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचे दर्शन घडवणारे काव्य, खरे तर तत्त्वज्ञानाचा प्रतिभावान भावोद्गार, असा हा ग्रंथ आहे.

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २२५ रुपये**




## आटपाटनगरीच्या कथा

**डॉ. द.ता. भोसले**

या कथा म्हणजे लोककथांचे तंत्र वापरून, ती आविष्कार पद्धती स्वीकारून, आजचे प्रश्न, आजचे समाजमन, समाजाची आजची स्थितीगती, जीवनमूल्यांचा त्यांचा अग्रक्रम आणि मानवी स्वभावाची गूढ आणि व्यामिश्र गती-विकृती साकार करणारी निर्मिती आहे.

या आटपाटनगरीच्या कथा जेव्हा विविध मासिकांच्या दिवाळी अंकांतून प्रसिद्ध झाल्या; तेव्हा त्यांची कथनपद्धती, त्यातले नावीन्य आणि त्या कथांतून झालेले जीवनभाष्य व त्यातील मौलिकता अनेक वाचकांना मनापासून भावली होती.

काही जाणकारांनी या कथांचा संग्रह प्रसिद्ध करावा, असा सातत्याने आग्रह केला होता.

या आटपाटनगरीतील सारे प्रजानन आणि त्यांची सुखदुःखे मराठी वाचकांना उच्च दर्जाचा आनंद देतील.

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**

## चिकित्सा आरोग्यसेवांची

**डॉ. श्याम अष्टेकर**




वैद्यकीय क्षेत्रात प्रचंड तांत्रिक प्रगती बरोबरच खर्च आणि इन्शुरन्स वगैरे व्यवस्थाही वाढत चालली आहे. मात्र सरकारतर्फे सर्वांना सर्व सेवा संपूर्णपणे मोफत देणे हे अर्ध्या उडीत दरी ओलांडण्यासारखे कठीण आहे, मधे पडून कपाळमोक्ष होण्याचीच त्यात जास्त शक्यता आहे. हे प्रचंड खर्चिक दुस्साहस सुरू केलेच तर कोणत्याही सरकारला ते धड चालवणे किंवा बंद करणे शक्य नाही. यापेक्षा सामाजिक सहभागी आरोग्य योजना प्रांतोप्रांतीचे खाचखळगे काळजीपूर्वक ओळखून क्रमशः विकसित करता येतील.

सध्याच्या परिस्थितीत गुंतागुंतीच्या आरोग्य-वैद्यकीय क्षेत्राचे दहा मुख्य विभाग कल्पून महाराष्ट्रातील नवीन सरकार काय काय करू शकेल याचा आराखडा मी या पुस्तकात मांडला आहे.


**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

## मराठा मुलगी

**डॉ. शैलजा वाडीकर**

आयुष्य अंगणाशी जोडूनच ठेवावं लागतं. कोणाच्या वाट्याला कोणत्या घराचं अंगण येईल, याची पायांनाही कल्पना नसते. म्हणूनच प्राक्तनाच्या पायवाटेवरून प्रवास करताना पाय प्राणाशी पहाटेनं जोडून घ्यावे लागतात. मुख्यतः स्त्रियांच्या सोसण्याचा भाग असला, तरी एका मराठा मुलीनं साहस दाखवलं आणि ध्वजारोहण केलं; तीच ही मराठा मुलगी!

**– फ. मुं. शिंदे**




**मूल्य १८० रुपये**
**सवलतीत ११० रुपये**




## मृगतृष्णा

**लक्ष्मीकांत देशमुख**

लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'मृगतृष्णा' या कथासंग्रहातील वेगळी कथानकं आणि चिंतनगर्भ, आशयसूत्रांनी समृद्ध अशा दहा कथांमधून स्त्री-पुरुष संबंधांचे मराठी साहित्यात अभावानेच आलेले काही पैलू टिपण्यात आले आहेत.

'मृगतृष्णा' – वाचकांना भाव व विचारसंपन्न करणारा लक्ष्मीकांत देशमुख यांचा ताजा कथासंग्रह!

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

लेखन करताना लेखकाने काहीएक भूमिका घ्यायला हवी. तरच ते लेखन कसदार होतं, असे ८७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फ.मुं. शिंदे यांचे मत आहे. 'तिचं अवकाश' या पुस्तकातील लेख हे समाजातील विविध क्षेत्रातील महिलांचे चित्रण करतात. या महिला त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध केलेल्या आहेत. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा, आपल्या क्षेत्रावर ठसा उमटवण्याचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. जीवनात मिळवलेले यशाचे कमळ फुलवताना किती पाण्यात पोहावे लागले? त्यापाठची प्रेरणा काय होती? अपयश आले असेल तर ते लोखंडाचे चणे त्यांनी कसे पचवले? असे प्रश्न आपोआपच उपस्थित होतात. त्यांची उत्तरे पुस्तक वाचताना मिळत जातात. तरी एक प्रश्न शिल्लक राहतो, लेखिकेची भूमिका काय? तर त्याचे उत्तर आहे, स्त्रीशक्ती! तिची सक्षमता! या शक्तींचा शोध घेणे, त्यातून स्त्रीजीवनाची कणखर संकल्पना समजून घेणे.




शिरीष पै हे नाव आपल्या सगळ्यांच्या चांगल्या परिचयाचे आहे. कवितेची आवड असणारा रसिक चटकन त्यांच्या 'हायकू'ची आठवण काढील. होय, हा काव्यप्रकार मराठीत खऱ्या अर्थाने रूढ करण्याचे श्रेय जाते ते त्यांच्याकडेच. तशी त्यांची ग्रंथसंपदाही आपल्या चांगल्या परिचयाची आहे. कादंबरी, कथा, नाटक, ललितलेख, व्यक्तिचित्रे, अशा सर्व क्षेत्रांत त्यांची कलंदर लेखणी लीलया सफर करून आलेली आहे. तरी खरी ओळख आहे ती कवयित्री म्हणूनच. थोडेथोडके नव्हे तर, तब्बल सोळा कवितासंग्रह त्यांच्या नावावर आहेत! त्यांची पहिली कथा बक्षिसासह 'खेळगडी' मासिकात प्रकाशित झाली, त्यावेळी त्यांचे वय होते चौदा. पुढे 'नवयुग'ची जबाबदारी आली आणि एक लेखिका त्यातून आकाराला येत गेली. बालपणाचे कोवळे दिवस, त्यांची निसर्गाशी असलेली अलवार मैत्री आणि साहित्यावर असलेले निस्सीम प्रेम; त्याचवेळी व्यवहारिक जगाला खंबीरपणे दिलेला लढा; त्यांची आध्यात्मिक साधनेकडे असलेली आंतरिक ओढ आणि जगण्याचा अर्थ शोधण्याची दिलेली जाणीव; असा साऱ्या अंगांनही या पुस्तकात लेखिकेने त्यांच्या या दीर्घ प्रवासाचा मागोवा अतिशय संयतपणे घेतला आहे.

'माणूस हा एकच वर्ग आणि माणुसकी हा एकच धर्म' मानणाऱ्या लीना जोशी 'अपनालया'च्या माध्यामातून अविरत सेवेत स्वतःला झोकून देतात, एकाच दुर्दम्य आशेवर, 'वो सुबह कभी तो आयेगी'. सेवादलात एकरूप झालेल्या, एसएनडीटी विद्यापीठातून राज्यशास्त्रातील, स्त्रीअभ्यासात डॉक्टरेट मिळवलेल्या पहिल्या संशोधक डॉ. रोहिणी गवाणकरांच्या जिद्दीचा आलेख तसाच अचंबित करणारा. नाटक, दूरदर्शन आणि सिनेमा यासारख्या माध्यमांच्या संदर्भात ज्यांचे नाव आदराने घेतले जाते त्या प्रतिमा कुलकर्णी. स्वतःच्या प्रतिभेचा कस पाहणाऱ्या या क्षेत्रावर त्या आपली हुकमत गाजवत आहेत. स्वरप्रभा पद्मभूषण डॉ. प्रभा अत्रे, आशा जोगळेकर, सुमोना चटर्जी, पद्मा पुरोहित, कालिंदी मुझुमदार यांच्याही स्त्रीशक्तीचा शोध लेखिकेने तितकाच उत्कटतेने घेतला आहे.

पुस्तकात सुरुवातीलाच प्रत्येकाच्या अवकाशाचे यंत्र दिलेले आहे. तर शेवटी परिशिष्टे दिलेली आहेत. प्रभा अत्रे यांना मिळालेले सन्मान, त्यांच्याविषयीचे गौरवोद्गार, गाण्यांच्या रेकॉर्ड व कॅसेट यांची नावे, पुस्तके. शिरीष पै यांची साहित्यसंपदा, राहिणी गवाणकर यांची मानपत्रे व पुरस्कार यात दिलेले आहेत. 'घेऊ का मी शोध स्वतःचा' ही स्वःचा शोध घेण्यास उपयुक्त ठरणारी प्रश्नमंजुषा या परिशिष्टात दिलेली आहे.

लेखिका नीलिमा कानेटकर या स्वतः कायदेतज्ज्ञ आहेत. वक्तृत्वाइतकीच त्यांची लेखणीही काटेकोर आणि निर्भीड आहे. अशिलाला न्याय देण्याची, समुपदेशन करण्याची जी हातोटी त्या बाळगतात, तीच विषयाची मांडाणी करताना बाळगलेली दिसून येते. त्यामुळे घेतलेल्या मुलाखती 'तमसो मा ज्योतिर्गमय'इतकाच कसदार अनुभव देतात.

मनोज आचार्य यांनी मुखपृष्ठ सजवताना दाखवलेली कल्पकता विषयाइतकीच उत्कट आहे.

● **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

# ग्रंथपान




परीक्षा कुठलीही असो, तिची भीती वाटत नाही असे म्हणणारा सापडणे कठीणच. परीक्षा ही प्रत्येकाची परीक्षाच पाहत असते. त्याचे कारण साधे आहे. जिला सामोरे जायचे, ते कसे जायचे हेच कुणी सांगत नाही. सांगणारे तसे पुष्कळ असतात, पण त्यात शास्त्रशुद्धतेचा अभाव अधिक असतो. त्यामुळे विश्वास ठेवायला मन पटकन तयार होत नाही. त्यात एक आत्मविश्वास सोबत असतो, उत्तीर्ण नक्की होईन, पण अपेक्षित गुणांचे काय? हल्ली या 'गुणांच्या' टक्केवारीने सगळ्यांना झपाटून टाकलेले आहे. प्रत्येकजण धावतो आहे तो तिच्यामागे. त्यामुळे भीती आपोआपच पाठलाग करत राहते, सावलीसारखी. परंतु आता अशी भीती बाळगण्याचे कारण उरलेले नाही. मदतीला आले आहे,'परीक्षेची भीती कशाला?' हे पुस्तक. ऐन संकटात मदतीचा हात देणारा मित्र भेटावा, तसे. या पुस्तक मित्रावर विश्वास ठेवताना मनात कुठली शंका बाळगण्याचे कारण नाही. अनुभवाची सकस शिदोरी ज्यांच्याजवळ आहे, अशा प्रयोगशील शिक्षिका या पुस्तकाच्या लेखिका आहेत, अनुराधा गोरे. यांचा परिचय आपणास आहेच. 'वारस होऊ अभिमन्यूचे', 'आचंद्र सूर्य नांदो', 'गाऊ त्यांना आरती', 'कळी उमलताना', '१९७१ चा रणसंग्राम', 'उठा राष्ट्रवीर हो' ही त्यांची पुस्तके आपल्या आठवणीत असतीलच.

'परीक्षेची भीती कशाला?' या पुस्तकाची मांडणी तीन भागांत केलेली आहे. पहिला भाग आहे, समजून घेण्याचा. त्यात महत्त्वाचा विषय आहे, शिक्षणाचा आणि अभ्यासाचा. शिक्षण म्हणजे काय, या मूळ प्रश्नापासून याची सुरुवात होते. त्याची उकल लेखिका करतात, 'शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या क्षमतांचे विकसन. प्रेरणा निर्माण करणे, योग्य दिशेने, कार्यक्षमतेने काम करता येईल असे मनोबल निर्माण करणे म्हणजे शिक्षण. चैतन्याने मुसमुसलेले, चारित्र्य घडवणारे, पुरुषार्थ प्रदान करणारे ते शिक्षण. शेकडो ग्रंथ डोक्यात कोंबण्यापेक्षा तुम्ही अगदी थोड्या कल्पना खरोखर आत्मसात केल्यात आणि जगून दाखवल्यात तर ते शिक्षण.'

मोठा प्रश्न असतो, अभ्यास करायचा म्हणजे नेमके करायचे तरी काय? चांगल्या गुणांच्या टक्केवारीत उत्तीर्ण व्हायचे तर तोच प्रश्न प्रथम सुटायला हवा. त्यासाठी आवश्यक वाटणारे मार्गदर्शन दुसऱ्या भागात केलेले आहे. अभ्यास ही तीन टप्प्यांतली प्रक्रिया आहे. ज्ञान व माहितीचे 'संकलन', संकलित माहितीवर 'प्रक्रिया' आणि शेवटचा टप्पा 'सादरीकरणाचा'. स्वयंअध्ययन या प्रकरणात हा विषय अधिक स्पष्ट केलेला आहे.

'अभ्यास का करायचा?' या प्रकरणात विविध विषय एकमेकांना कसे पूरक आहेत, याचे विवेचन केलेले आहे. भाषा हा एक विषय घेतला तर त्याच्या अभ्यासात विविध शब्द, त्यांचे अर्थ, समानार्थी शब्द, विरुद्धार्थी शब्द यांच्या छटा माहीत हव्यात. त्यांचा वापर प्रभवीपणे करता यायला हवा. या भाषेतील शब्दप्रयोग, वाक्प्रचार, म्हणी, सुविचार, कविता यांचा साठा हवा.

गणितासाठी नमुनावही करावी. जी उदाहरणे पटकन सुटली त्यांचा परत परत सराव करण्याची गरज नाही. जी कठीण वाटली, चुकली, सोडवताना त्रास झाला, अशी उदाहरणे प्रश्नवहीत उतरवून ठेवावी. त्यावर खूण करून ठेवावी. अशी उदाहरणे परत परत वाचावीत, सोडवावीत. गणित इतरांनी समजावून सांगणे, गटात सोडवणे फायद्याचे असते. मित्रांच्यात स्पर्धा लावून गणिते सोडवावी. क्रमिक पुस्तकांच्याबरोबर इतर गणित पुस्तकांतील गणिते सोडवावी. गणिताशी मैत्रीच करण्याचा प्रयत्न करावा. गणित आपोआप सोपे वाटू लागेल. शंभर टक्के गुण मिळवून देणारा हा विषय आहे. लेखिका अशी प्रत्येक विषयाबाबत त्याची वैशिष्ट्ये नमूद करतात. त्यासाठी त्यांनी अभ्यासाची कार्यनीती, तंत्रे, सवयी, कौशल्ये, त्यातील समस्या यांचे विवेचन केलेले आहे. आणि मानसिक आरोग्याचा मंत्र दिला आहे, 'रोज यशस्वी झाल्याची स्वप्ने पाहा. पद्मासन वा वज्रासन घालून सूर्याकडे तोंड करा. पाठीचा कणा ताठ ठेवून मन शांत करा. शंभरपासून शून्यापर्यंत आकडे उलट क्रमाने मनातल्या मनात मोजा. शांतपणे पण ठामपणे निश्चयाने म्हणा. मी यशस्वी होणार आहे... यंदाच्या परीक्षेत मला उत्तम यश मिळू दे...'

तिसऱ्या भागात पाचवी ते आता व्यावसायिक असलेल्या विद्यार्थ्यांच्या निवडक प्रतिक्रिया शेवटी दिलेल्या आहेत. वाचनवेग, स्वयंअध्ययन, वाचनकौशल्य अशा लेखिकेने केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगमय वर्गांचा कसा फायदा झाला, या विषयीच्या प्रेरणादायी अशा या प्रतिक्रिया आहेत.

विद्यार्थी , पालक आणि शिक्षक अशा सर्वांनाच उपयुक्त ठरावे असे, सुटसुटीत, मुद्देसूद आणि सोप्या पद्धतीने लिहिलेले हे पुस्तक आहे.

सतीश भावसार यांनी देखणे मृखपृष्ठ केले.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

॥ग्रंथाली॥


# ग्रंथपान

एक आटपाटनगर होतं. तिथं एक राजा राज्य करीत होता. त्याचं नाव....

घरात आजी गोष्ट सांगायची, तेव्हा पहिलं वाक्य कानावर पडायचं ते हेच. पुढे वाचनाकडे वळलो, तेव्हा पहिली भेट झाली ती याच वाक्यानं. त्यानंतरही बराच काळ हेच वाक्य सोबत करत राहिलं. त्याप्रमाणे या नगरात भरपूर भटकंती केली, अगदी मूळ निवासी असल्यासारखी. त्यात राजा भेटायचा. प्रधान भेटायचा. राजपुत्र, राजकन्या, महाराणी यांच्याही भेटी व्हायच्या. वातावरण कसं शाही थाटाचं. अद्भुत. आपण राजमहालात असल्याचा भास बराच वेळ आपली सोबत करायचा. परंतु आटपाटनगर असतं कसं, याचा कधी विचार केला नाही. त्या नगराचं नावचं आटपाट आहे, असं समजून चालायचो. वास्तविक, आटपाट म्हणजे आठ पेठा असलेलं नगर, ते आटपाटनगर. ही व्याख्या कुणी उघड केली ठाऊक आहे? डॉ. द.ता. भोसले यांनी. 'आटपाटनगरीच्या कथा' या त्यांच्या कथासंग्रहात.

**आटपाटनगरीच्या कथा**

डॉ. द.ता. भोसले




'आटपाटनगरीच्या कथा' या कथासंग्रहात एकूण अकरा कथा आहेत. या कथा आटपाटनगरात घडणाऱ्या कथा आहेत. म्हणजे त्या बालकथा किंवा इसापनीतीच्या कथा आहेत, असा समज होण्याची शक्यता जास्त नाही. या साध्याभोळ्या समजुतीच्या कथा नाहीत. ना पारंपरिक पठडीतल्या. त्या आहेत... आपण कथाच पाहूया. उदाहरणार्थ 'प्रजेच्या सुखासाठी' ही कथा. सर्व सुखसोयी, संपन्नता, वैभवशाली नगरातील जनतेच्या तक्रारी राजापुढे पेश होत आहेत. जनतेला आपल्या तक्रारी राजापुढे मुक्तपणे मांडण्याची मुभा आहे. आणि राजा त्याप्रमाणे जनतेला सुखी करण्यासाठी तत्परतेनं न्याय करतोदेखील. आश्चर्य वाटतं ना! ऐका तक्रारी. ब्रह्मवृंदांचा एक जमाव. त्यांना धार्मिक विधी यथासांग पार पाडण्यात मोठी उणीव भासते आहे ती फुलं आणि तुळशीदलांची. त्यासाठी त्यांची राजाकडे मागणी आहे, राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी फुले आणि तुळशीची शेती करावी. किमान एकरभर तरी. दुसरा जमाव मागणी करतो, श्रावणातल्या सोमवारच्या शिवपूजेचं महत्त्व पुण्याचं. तेव्हा सर्व प्रजाजनांनी त्यांच्याकडे असलेलं दूध वासरांना, बालकांना, वृद्धांना थेंबभरसुद्धा न पाजता शंकराच्या अभिषेकासाठी मंदिरात आणावं. चुलीला सरपण, इमारतीला लाकूड, आणि स्मशानाला लाकूड मिळत नाही म्हणून जंगल तोडण्याची परवानगी हवी, असा तिसरा जमाव मागणी करतो. चौथा जमाव मागणी करतो, शेतीला पाणी देण्याऐवजी आम्हाला गावात दिवसभर पाणी वापरण्यासाठी मिळालं पाहिजे. खुद्द राजाचं लष्कर दुप्पट करावं लागत आहे, त्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतःकडे जनावरं पाळण्याऐवजी चारा शेतात पिकवावा व तो लष्कराला पुरवावा. राजानं जनकल्याणास्तव सर्व आदेश जारी केले. आणि...

तशीच दुसरी कथा– 'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार'. तिथे तक्रार आहे, शेजारचा सद्‌गृहस्थ रात्रभर खोकतो, त्याचा खोकला तरी बंद करा, नाहीतर त्याची चिलीम. चोर तक्रार करतो, चोरी करण्यासाठी एकाच्या घराच्या खिडकीला लोंबकळलो, तर भिंतच कोसळली अंगावर. हात मोडला माझा. चोरी करता येईना, खिसा कापता येईना. तेव्हा घरमालकाकडून नुकसानभरपाई मिळावी...

अशी प्रत्येक कथा वेगळा विषय घेऊन आलेली आहे. हे विषय, यातले प्रसंग, मानवी स्वभावातले बारकावे, अनुभव, हे कुठून ओढून ताणून आणलेले नाहीत. आपल्या भोवतीचा हा सगळा गोतावळा आहे. फक्त त्याकडे पाहण्याची आपली नजर कशी असावी, हे लेखकानं दाखवलं आहे. नुसती नजर नाही, भाषा सुद्धा किती सहजपणे आपल्या अदाकारीनं भुलवते, तिचा अनुभव घेण्यासारखा आहे, पाहा. महाराजांचा नेम अचूक नाही, त्यामुळे शिकार होत नाही. हा अनुभव सांगताना लेखक लिहितात, '...तुमचा नेम अचूकच आहे. पळणारे जनावरच तुमची गोळी चुकवते, त्याला तुम्ही काय करणार म्हणा?'

'चोरीचं म्हणत असाल तर जगातला प्रत्येकजण चोर आहे. त्याचं काय? तुम्ही वासराचं दूध चोरून स्वतः वापरता. तुम्ही दुधाची चोरी करता. भुंगा मधाची चोरी करतो. शेतकरी फळा–फुलांची चोरी करतो... कराच्या रूपानं साऱ्या जगाकडून पैसा घेणारा राजा केवढा मोठा चोर म्हणावा?' यात विनोद आहे. उपहास आहे. विडंबन आहे. वर्मावर अचूक बोट ठेवण्याचं कसब आहे. त्यामुळे कथा वाचताना वाचक भुलत जावा, दूर जाता जाता हळूच वेशीवर आणून सोडावं, मनोरंजनाबरोबरच वास्तवाच्या उन्हाचं भान जागं व्हावं, हे सारं जुळवणं तसं अवघड. ते सहजी करताना लेखकाचं कसलेपण या कथांमधून जाणवतं.

कथा राजवाड्यात सुरू होतात. पण त्या वावरतात ग्रामीण भागात. तिथला संस्कार, शेती, शेतकरी, जनावरं, जंगलं, सोबत नित्याचे व्यवहार यांचं दर्शन यातून होतं. बोलण्यातही... सूर्य कासराभर वर आला... दुबार नांगरणी करावी तशी... इतका सहजपणा त्यात आलेला आहे. हा सगळाच बाज वेगळ्या पठडीतला आहे. कथेच्या फॉर्मबाबत लेखक स्वतः नमूद करतात, 'माझ्या कथा म्हणजे लोककथांचं तंत्र वापरून, ती आविष्कार पद्धती स्वीकारून, आजचे प्रश्न, आजचं समाजमन.... वर्तमानकाळाची स्पंदनं भूतकालीन साहित्यरूपातून व्यक्त करण्याचा पहिला प्रयोग आहे, असं वाटतं.

सतीश भावसार यांनी कथेचे भावसौंदर्य वर्धिष्णू करणारी चित्रे आणि देखणे मुखपृष्ठ केले.

- **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.**

॥ग्रंथाली॥

# ग्रंथपान

'आंदकोळ' हा शब्द आपल्याला अपरिचित. त्यामुळे कुतूहलाचा. शीर्षकाच्या स्थानावर कुंकवासारखा असा अनोळखी शब्द दिसला की आपली पंचाईत ठरलेली. ना अर्थ ठाऊक, ना कुतूहल गप्प राहू देत. बरं, मुखपृष्ठावरून काही बोध शोधावा, तर चित्रकारही मदतीचा हात देण्याऐवजी निबिड जंगलात सोडणारा. अशावेळी एकच पर्याय उरतो, ते पुस्तक चाळण्याचा, भावले तर वाचण्याचा. त्यातला पहिला पर्याय म्हणजे, लेखकाचे मनोगत. तिथे हे धगेदोरे सापडण्याची शक्यता जास्त. म्हणून पहिल्यांदा ते उघडले तर तिथेही ठेच बसावी असा प्रकार, 'बेड्या तोडताना...' झालं! म्हणजे शब्दाचा अर्थ राहिला बाजुला, आपणच बेड्यात कैद! सुटका होते, ती पुस्तक हातातून खाली ठेवल्यानंतर. त्यातून मोकळे होतात ते हात, पण विषण्ण होते ते मन. भिरभिरत राहते वादळाच्या एका भोवऱ्यात. पत्ताच सापडत नाही, आपण आहोत कुठे, एकविसाव्या शतकात की अश्मकाळात? जगतो आहोत ते काय म्हणून, माणूस की जनावर होऊन? आपण आलोत कुठून आणि जाणार आहोत कुठे? आम्ही उगाच का टेंभा मिरवतो आहोत आपल्या सुधारलेल्या पिढीचा? खाईतून खाईकडे असाच का प्रवास असणार आहे आमचा? भीषण वास्तवाचा विषण्ण काळाकुट्ट काळोख... आणि भणाण सुटलेला वारा. चहूबाजूने. उसकटून टाकणारा. त्याचे नाव आंदकोळ. विषमतेच्या लोळाने कोळसा केलेल्या लोखंडाचे वादळ म्हणजे आंदकोळ... मातीच्या कुशीत स्वतःचे अस्तित्व दडवीत टीचभर पोटाच्या खळगीसाठी पाषाणावर धडका देणारे मजबूत पंखांतले वादळ...




पारधी समाज म्हणजे चोर, हा अखिल समाजाचा समज. माळरानावर पालं पडली, हे कळले तरी हाकलून लावण्यासाठी सारा गाव धावत येतो, तो पारधी नावामुळेच. पंचक्रोशीत कुठेही चोरी झाल्याची तक्रार पोलीस ठाण्यात झाली की, प्रथम गुदरते ती पारधी जमातीवरच. अडाणी, अशिक्षित, शेतजमिनीपासून वंचित, गावापासून दूर फेकलेला, गावाने ओवाळून टाकल्यासारखा हा समाज. उदरनिर्वाहाची कुठलीच साधने नाहीत, कामधंद्यासाठी कुणी विश्वास ठेवायला राजी नाही. मग त्याने जगायचे कसे? आणि अशा जातीत जन्म घेतलेल्या सपुतांचे जगणे ते जगणेच असते का? की गाव आणि पोलीस यांच्या लाथांनी स्वतःला धन्य समजायचे? किसन चव्हाण यांच्या या 'आंदकोळ'ने विचारलेले हे प्रश्न नाहीत, वाचक म्हणून प्रत्येकाला पडतील, ते हेच प्रश्न.

चोरी करणे हा गुन्हा आहे, तो केला. बापाने केला, पूर्वजांनी केला. किसन आणि संजूने केला नाही. त्यांच्या हातात पाटी आणि पेन्सिल मिळाली. ते शिकले. नोकरीला लागले. हे मोठेपण त्यांच्या वाट्याला आले ते आईबापाने दिलेल्या पुण्याईमुळे. जवळून चोरी करणाऱ्यांचे आयुष्य पाहिले. न करणाऱ्याचे पाहिले. पालातल्या आया बहिणींचे हाल पाहिले. काय होते त्यात? पोलिसांचा बेदम मार. कैद. उपासमार. अब्रूचे धिंडवडे. पालात दिवा लावायचाच नाही. गावाला कळेल म्हणून, पोलिसांना कळेल म्हणून. म्हणून का पोलीस यायचे थांबत होते? ते येतच. करून जात, सारे काही. हे सारे जगणे पाहिले होते. त्यामुळे जगणे कळले. त्यातूनच स्फुल्लिंग पेटले, अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे. बेडरपणे. लक्ष्मण माने यांसारखे मार्गदर्शक भेटले, आणि अन्यायाला विरोध करणाऱ्या आवाजाला धार आली. एक नवीच लढाई सुरू झाली. पोलिसापासून, सम्राटांपर्यंत, शासनापर्यंत. किसन ही लढाई जिकण्यासाठी लढत राहिले, लढत आहेत.

लेखक स्वतःच्या जगण्याचे रडगाणे इथे गात नाही. बकरीच्या शेपटासारखी अवस्था झालेल्या पारधी समाजाची तरफदारी करत नाही. एकूण समाज, समाजमन, पोलीसयंत्रणा, राजकीय वरदहस्त, अशा पातळ्यांवर पारधी समाजाविषयीचा असलेला समज आणि त्याखाली भरडला जाणारा हा समाज, याचे दाहक चित्रण त्यांनी आपल्या आवाक्याप्रमाणे चितारण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात सारेच आले असे म्हणता येणार नाही. पण जे आले ते कल्पनेला हादरा देणारे आहे. जे मांडायचे ते मोजकेपणाने मांडले आहे. आपली आई फसगतीत सापडली, पण तिने त्यातून बाहेर येताना इतरांना बाहेर येण्याचा मार्ग दाखवला, हे वर्णन ममतेपोटी केलेले नसून तिच्या ठामपणाचे दर्शन घडवणारे आहे. बापाने केलेल्या चोऱ्या, विकलेली दारू, याचे चित्रण करताना हळवेपणात न हरवता नेमकेपणा जोपासला आहे. सुजाता काळेचा मृत्यू, पेट्रोलपंपावरील दरोडा, अशा कितीतरी घटना आणि आंदोलने, यात आली आहेत. त्यातून प्रत्येक टप्प्यावर भेटलेली माणसे किती प्रकारची होती, त्यांची वागण्याची तऱ्हा कशी मुरलेली होती, त्यांची मासलेवाईक वर्णने केली आहेत, ती निपक्षपातीपणे. आकस न ठेवता. त्यामुळे एकांगीपणाचा आळ या पुस्तकावर करता येणार नाही. त्याचप्रमाणे चोरी करताना पाळायचे संकेत, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्या आहारी जाण्याचा अतिरेक, इतक्या चोऱ्या करूनही भणंग अवस्थेत जगण्याचे वास्तव, याविषयी कोठे बोटचेपे धोरण न ठेवता परखडपणे लिहिले आहे. त्यात मधूनच म्हणीही येतात, 'अब्रू झाकता येईना आणि माश्याही मारता येईना.' 'घरच्या भाकरी खायच्या अन् फुकट लोकांची ढुंगणं धुवायची.' तर जगण्याचं सूत्र सांगतात, 'हक्क, अधिकार मिळवण्याची भाषा करायची तर ते याचना करून मिळत नसतात. याचना करून मिळते ती भीक... हक्क, अधिकारासाठी लढावंच लागतं... लढायचं तर काळीज खाटीकखान्यात टांगूनच यावं लागतं.'

स्वतःविषयीच्या उदोउदोपणाला वाव देणे शक्य होते, परंतु तसे घडलेले नाही. सच्चा कार्यकर्ता असतो तो इतरांत वावरत असतो. स्वतःकडे पाहण्याचे त्यातून राहून जाते. किसन चव्हाण यांच्याकडून तसेच झाले असावे.

षांताराम पवार यांनी अर्थपूर्ण मुखपृष्ठ तयार केले.

- **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

## ॥ग्रंथाली॥ ॥ १७ वे बीएमएम अधिवेशन लॉस एंजेलिस क्षणचित्रे




१७ वे बीएमएम अधिवेशन लॉस एंजेलिस येथे संपन्न झाले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'ग्रंथाली' स्टॉलला भेट दिली.




१७ वे बीएमएम अधिवेशन लॉस एंजेलिस येथे 'ग्रंथाली'च्या पुस्तकांचे आणि शब्द रुची मासिकाचे प्रकाशन करताना डॉ. लतिका भानुशाली, शोभा हिंगलासपूरकर, सुदेश हिंगलासपूरकर, धनश्री धारप, विद्या हर्डीकर सप्रे, अशोक सप्रे आणि डॉ. गजानन सबनीस




१७ वे बीएमएम अधिवेशन लॉस एंजेलिस येथे संपन्न झाले. त्यावेळी उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी 'ग्रंथाली' स्टॉलला भेट दिली.



१७ वे बीएमएम अधिवेशन लॉस एंजेलिस येथे लेखकांचे वर्कशॉप संपन्न झाले.
त्यावेळी बोलताना
अजय गल्लेवाले
डॉ. लतिका भानुशाली
अनिल कोठावळे
आणि नंदन होडावडेकर

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.

# 'ग्रंथाली' पुस्तक प्रकाशन समारंभ




मोहन गोरे लिखित
'आनंदयात्री' पुस्तक प्रकाशनसमयी
योजना शिवानंद गायन करताना.
सोबत सहकलाकार



मोहन गोरे लिखित
'आनंदयात्री' पुस्तक
प्रकाशनसमयी लतिका भानुशाली
सुदेश हिंगलासपूरकर
उषा मेहता
डॉ. नरेंद्र जाधव
लेखक मोहन गोरे
डॉ. अनिल काकोडकर
रवि दाते
आणि
नंदकुमार गद्रे




श्रीकृष्ण मराठे लिखित
'माझी आरोग्ययात्रा' पुस्तक
प्रकाशनसमयी दिनकर गांगल
लेखक श्रीकृष्ण मराठे
योगाचार्य श्रीकृष्ण व्यवहारे
आणि
प्रा. डॉ. श्रीराम आगाशे

मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.